नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २९४ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार, दि. १० ऑक्टोबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# द्रौपदी मुर्मू यांची भेट घेत राष्ट्रपती भवनात खासदारांचा ठिय्या

## ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्यासाठी राहुल गांधींसह 'इंडिया' आघाडी आक्रमक!

मुंबई : (स. गांवकरी)

मतदार याद्यांमधील गैरप्रकार आणि 'मतचोरी'च्या मुद्द्यावरून देशातील विरोधी पक्षांची 'इंडिया' आघाडी आक्रमक झाली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील १० नेत्यांच्या प्रतिनिधीमंडळाने शुक्रवारी रात्री राष्ट्रपती भवनात जाऊन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली आणि त्यांना निवेदन सादर केले.

दरम्यान, संसदेपासून राष्ट्रपती भवनाकडे मोर्चा नेणाऱ्या विरोधी पक्षांच्या इतर सर्व खासदार आणि वरिष्ठ नेत्यांना पोलिसांनी विजय चौकात बॅरिकेड्स लावून रोखले. त्यानंतर संतप्त झालेल्या काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी, कर्नाटकचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यासह अनेक प्रमुख नेत्यांनी विजय चौकातील रस्त्यावरच ठाण मांडत जोरदार ठिय्या आंदोलन सुरू केले.

'लोकशाही वाचवा'च्या घोषणा अन् विजय चौकात हायव्होल्टेज ड्रामा

शुक्रवारी रात्री सुमारे ८ वाजता 'इंडिया' आघाडीचे शेकडो खासदार हातात 'लोकशाही वाचवा' असे फलक घेऊन संसदेतून राष्ट्रपती भवनाच्या दिशेने शांततापूर्ण मार्गाने निघाले. मात्र, विजय चौकाजवळ दिल्ली पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात करत बॅरिकेड्स लावून त्यांना रोखले. पोलिसांनी रोखताच विरोधी खासदारांनी तेथेच रस्त्यावर बसून केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाविरोधात जोरदार घोषणाबाजी सुरू केली.



या ठिय्या आंदोलनात काँग्रेस खासदार प्रियंका गांधी वाड्रा, काँग्रेसचे संघटन सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल, तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा, गौरव गोगोई यांच्यासह विविध घटक पक्षांचे प्रमुख नेते सहभागी झाले होते.

राष्ट्रपती भवनाकडून आधीच निश्चित करण्यात आलेल्या १० प्रमुख नेत्यांच्या शिष्टमंडळाने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. या शिष्टमंडळात खालील नेत्यांचा समावेश होता:

- राहुल गांधी (विरोधी पक्षनेते)
- मल्लिकार्जुन खर्गे (काँग्रेस अध्यक्ष)
- ममता बॅनर्जी (तृणमूल काँग्रेस प्रमुख)
- सुप्रिया सुळे (राष्ट्रवादी काँग्रेस – शरदचंद्र पवार)
- ओमर अब्दुल्ला (जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री)
- एम. ए. बेबी (माकप सरचिटणीस)
- डी. राजा (भाकप)
- राजीव राय (समाजवादी पक्ष)
- मनोज झा (राष्ट्रीय जनता दल)
- थोल थिरुमावलवन (व्हीसीके)

आंदोलनस्थळी माध्यमांशी बोलताना काँग्रेसचे प्रवक्ते पवन खेरा यांनी विरोधकांच्या मुख्य मागण्या स्पष्ट केल्या:

१. मुख्य निवडणूक आयुक्तांची हकालपट्टी: कथित गैरप्रकारांची जबाबदारी स्वीकारून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी तात्काळ राजीनामा द्यावा.
२. विशेष पुनरीक्षण (SIR) मोहीम रद्द करा: मतदार याद्यांचे सुरू असलेले विशेष पुनरीक्षण तत्काळ थांबवण्यात यावे आणि ज्या १३.८ कोटी मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत, ती पुन्हा जोडण्यात यावीत.
३. बॅलेट पेपरवर निवडणुका: आगामी निवडणुका इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनऐवजी (EVM) पूर्वीप्रमाणे बॅलेट पेपरवरच घेण्यात याव्यात.

तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांनी यावर अधिक आक्रमक भूमिका मांडली. "केवळ ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवून प्रश्न सुटणार नाही. त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना तत्काळ अटक करण्यात यावी आणि तुरुंगात टाकण्यात यावे," अशी मागणी त्यांनी केली. राष्ट्रपती भवनावर मोर्चा काढण्यापूर्वी संविधान सदनाच्या सेंट्रल हॉलमध्ये 'इंडिया' आघाडीच्या खासदारांची एक अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राहुल गांधी यांनी खासदारांना संबोधित करताना भाजप सरकारवर थेट हल्लाबोल केला.

# MPSC अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी

### MPSC अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी:'पेपरफूटवेळी ते अध्यक्षपदी नव्हते, मग राजीनामा कसा घेणार? CM देवेंद्र फडणवीसांचा सवाल

मुंबई : (स. गांवकरी)



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पालघर येथे 'सेवा संकल्प अभियान 2026' या उपक्रमांतर्गत नागरिकांना विविध शासकीय सेवा योजनांच्या लाभांचे वितरण करण्यात आले. दरम्यान, एमपीएससीमार्फत घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकारांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून केली जात आहे. यासंदर्भात पत्रकारांनी प्रश्न विचारला असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली.

देवेंद्र फडणवीस पत्रकारांशी बोलताना म्हणाले, विद्यार्थ्यांना कळवण्यात आले होते की ते ज्या अध्यक्षांचा राजीनामा मागत आहेत, ज्यावेळी पेपरफूट झाली तेव्हा ते जॉईन झालेले नव्हते. पेपरफूटी झाल्यानंतर ते जॉईन झाले तर मागच्या काळाकरता त्यांचा राजीनामा आपल्याला कसा थेट घेता येईल, असा सवाल फडणवीस यांनी केला.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आम्ही सांगितले की न्यायाधीशांकडून न्यायालयीन चौकशी करायला तयार आहोत. त्या चौकशीत हे अध्यक्ष असतील, जुने कोणी असतील, अजून कोणी अधिकारी असतील, जे जे दोषी असतील त्या सर्वांवर आम्ही कारवाई करायला तयार आहोत. प्रश्न एवढंच आहे की जे त्या काळात नव्हतेच त्यांचा राजीनामा कोणत्या परिस्थितीत मागायचा आणि महत्त्वाचे म्हणजे पहिल्यांदा आपण लक्षात घ्यावे, राजीनामा घेण्याचा अधिकार शासनाला नाही. हे त्यांना माहिती आहे. समजा त्यांना काढायचे झाले तरी तो अधिकार राष्ट्रपतींना आहे, तो राज्य सरकारला नाही. जर त्यांच्या विरोधात चौकशी समितीने काही अहवाल दिला की अशा अशा पद्धतीने दोषी आहेत, जो पदावर नव्हताच त्याच्यावरही आम्ही चौकशी करायला तयार आहोत. त्यांचा काही दोष निघाला तर 317 प्रमाणे त्यांना हटवण्याची राष्ट्रपतींना शिफारस करू. हे जे आंदोलन चाललेले आहे ते सुरुवातीला एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे होते, आता ते राजकीय आंदोलन सुरु आहे. आता ते विद्यार्थ्यांचे आंदोलन राहिलेले नाही, ते पूर्णपणे राजकीय आंदोलन चाललेले असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. तसेच एका इव्हेंटसारखे ते सुरू आहे. तथापि आमचे सरकार चर्चेतून मार्ग काढायचा प्रयत्न करत आहे. माननीय उच्च न्यायालयाने बेकायदेशीर ठरवले आहे. तिथे बसता येणार नाही असे स्पष्टपणे सांगितले आहे, तरी देखील उच्च न्यायालयाचा अवमान करून ते तिथे बसलेले आहेत. आमचा प्रयत्न मुलांना न्याय कसा द्यायचा हे आहे, असे फडणवीस यांनी म्हटले.

## विद्यार्थ्यांवर दाखल झालेल्या एफआयआरमध्ये काय?

एमपीएससीच्या विद्यार्थ्यांवरील गुन्हेगारी कारवाईविरोधात रोहित पवारांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. पुणे आंदोलनातील विद्यार्थ्यांवर एफआयआरमध्ये गंभीर कलमं लादली असून, त्यात दगडफेक आणि रॉकेटचा उल्लेख आहे. एफआयआरमध्ये अनेक चुका, जसे की नावांमधील गोंधळ आणि अनुपस्थित विद्यार्थ्यांची नावे, उघड झाल्याने खळबळ उडाली आहे.

# राष्ट्रपतींनी मत चोरीचा इन्कार केला नाही

### राहुल गांधी म्हणाले, आमच्याकडे पुरावे मागितले, सोमवारी सुप्रीम कोर्टात जाऊ; 4 दिवसांतील तिसरा मोर्चा

नवी दिल्ली : (स. गांवकरी)



'इंडिया' (INDIA) आघाडीच्या १० खासदारांच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी रात्री राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

भेटीनंतर बाहेर पडताना राहुल गांधी म्हणाले की, देशात मते चोरली जात आहेत हे संपूर्ण देशाला माहित आहे आणि राष्ट्रपतींनीही याचा इन्कार केला नाही.

दरम्यान, खरगे म्हणाले, "आम्ही राष्ट्रपतींना मत चोरीबद्दल—विशेषतः ती कुठे झाली याबद्दल—माहिती दिली. राष्ट्रपतींनी पुराव्यांची मागणी केली आहे आणि आम्ही ते गोळा करत आहोत."

विरोधी पक्षाच्या खासदारांनी आज संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये सुमारे ३० मिनिटे चाललेली बैठक घेतली. ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात सुरू असलेल्या निदर्शनांमध्ये ममता बॅनर्जी पहिल्यांदाच सहभागी झाल्या. गेल्या चार दिवसांत ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात विरोधी पक्षाच्या खासदारांनी आयोजित केलेला हा तिसरा मोर्चा आहे. यापूर्वी, त्यांनी ६ ऑक्टोबर रोजी 'लोकशाही वाचवा' मोर्चा काढला होता. त्यानंतर, ७ ऑक्टोबर रोजी त्यांनी जंतरमंतर येथे निदर्शने करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना वाटेतच अडवण्यात आले. ८ ऑक्टोबर रोजी त्यांनी कनॉट प्लेस ते राजघाट असा मोर्चा काढला.

# प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरणातील मुख्य आरोपीला अटक

### संतोष कनोजिया उर्फ टल्लीसह हेल्मेटधारी आरोपी पोलिसांच्या ताब्यात



ठाणे : (स. गांवकरी)

ठाण्यातील शिवसेना ठाकरे गटाचे विभागप्रमुख प्रदीप (बाळा) पूर्णेकर यांच्या हत्या प्रकरणात महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी संतोष कनोजिया उर्फ टल्ली याला ठाणे गुन्हे शाखेच्या युनिट-5 आणि खंडणीविरोधी पथकाने प्रयागराज येथून ताब्यात घेतले आहे. त्याच्यासोबत एका अज्ञात हेल्मेटधारी आरोपीला देखील पोलिसांनी पकडले आहे. ठाणे क्राइम ब्रँचने ही कारवाई केली. प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी संतोष कनोजिया उर्फ टल्ली याला अटक करण्यात आली आहे. त्याच्यासोबत असलेल्या अन्य एका आरोपीला देखील पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. संतोष कनोजिया हाच या हत्येच्या कटातील मुख्य आरोपी असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. त्यामुळे या हत्येमागील नेमका उद्देश आणि कटात सहभागी असलेल्या इतर व्यक्तींबाबत तपासातून अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

ठाण्यात 29 सप्टेंबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास प्रदीप पूर्णेकर यांच्या कार्यालयात घुसून पाच हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळीबार केला होता. हल्लेखोरांनी पिस्तुलातून सात राऊंड फायर केले, त्यापैकी चार गोळ्या पूर्णेकर यांच्या शरीरात घुसल्या. घटनेनंतर त्यांचे कार्यकर्ते कार्यालयात पोहोचले असता ते रक्ताच्या थारोळ्यात पडलेले आढळले. त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. प्रदीप पूर्णेकर यांच्या कुटुंबीयांनी ठाण्याच्या माजी महापौर मीनाक्षी शिंदे आणि त्यांच्या पतीवर हत्येचा कट रचल्याचा आरोप केला आहे. या आरोपांबाबत तपास यंत्रणांकडून अधिकृत निष्कर्ष समोर येणे बाकी आहे. दरम्यान, हत्येच्या तपासासाठी पोलिसांनी विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना केली असून, आतापर्यंत काही आरोपींना अटक करण्यासोबतच वाहनांचीही जप्ती करण्यात आली आहे.

## हत्येच्या निषेधार्थ विरोधकांचा मोर्चा

प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्येच्या निषेधार्थ 9 ऑक्टोबर रोजी ठाण्यात विरोधकांकडून शांततापूर्ण मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवसेना ठाकरे गट, महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे), काँग्रेस आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते या मोर्चात सहभागी होणार आहेत. ठाणे महापालिका आयुक्त कार्यालयापासून पोलीस आयुक्तालयापर्यंत हा मोर्चा काढण्यात येणार असून, शहरातील वाढती गुन्हेगारी आणि अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात आक्रमक भूमिका मांडली जाणार आहे.



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी संपादकीय



डॉ. विश्वासराव आरोटे
संपादक - दै. समर्थ गांवकरी

# नानांच्या अभिनयाचे 'घराणे'...

काही कलाकार त्यांच्या कलेच्या चौकटीत मावत नाहीत. नाना पाटेकर हे अशा चहूबाजूंनी, चहूदिशांनी व्यक्त होत राहणाऱ्या मोजक्या कलावंतांतील एक. अभिनयाच्या क्षेत्रात विविध वैचारिक घराणी होऊन गेली. कोणी 'अभिनय जगणे' महत्त्वाचे मानले; तर कोणास ही कल्पना हास्यास्पद वाटली. श्रीराम लागू यांच्यासारखे बुद्धिमान कलावंत अभिनेत्यास 'लमाण' अशी उपमा देते झाले. म्हणजे लेखकाने जे लिहिले आहे ते उत्तमपणे सादर करणे इतकेच त्याचे काम, असे त्यांचे म्हणणे. अशा बुद्धिवादाअभावी श्रीकृष्णाची भूमिका साकारणारा खऱ्या जगण्यातही आशीर्वाद वाटत फिरताना दिसतो. त्यामुळे लागूंचे म्हणणे रास्तच. स्तानिस्लावस्कीपासून के. नारायण काळे, विजयाबाई मेहता ही सारी 'मेथड ॲक्टिंग'ची विद्यापीठे. तर या स्तानिस्लावस्कींचा पट्टशिष्य मिखाइल चेखॉव्ह (जगद्विख्यात लेखक अँतोन चेकॉव्ह यांचा पुतण्या ) याने तर शरीर हे तर अभिनेत्याचे वाद्य असे सांगून अभिनयास कलाकाराच्या आत्म्याचे वाद्यवादन म्हटले. म्हणजे एखादा सतारिया वा तबला-नवाज वा शहनाईवादक ज्याप्रमाणे आपल्या वाद्यांस जपतो त्याप्रमाणे अभिनेत्याने आपले शरीर जपायला हवे. अशा सर्व अभिनय घराण्यांचा संकर म्हणजे नाना पाटेकर. कै वसंतराव देशपांडे ज्याप्रमाणे 'हमारा घराना हमसे शुरू होता है' अशी मिजास (अर्थातच चांगल्या अर्थी) करू शकले त्याचप्रमाणे नाना पाटेकरही एका स्वतंत्र अभिनय-घराण्याचे संस्थापक ठरतात. रंगभूमी/पडद्यावरचा अभिनय जगण्यात घेऊन येणाऱ्या आणि जगण्यातील व्यामिश्रता अभिनयात सादर करणाऱ्या नाना पाटेकर यांचे जगणे हेच मूर्तिमंत सादरीकरण होते. त्यांचे आकस्मिक निधन हे धक्कादायक खरेच. पण नाना पाटेकर यांचे 'धक्कादायक नाही' असे काय होते?

अभिनयाचे रीतसर कोणतेही शिक्षण नाही, रंग नाही, रूप नाही आणि गोमटे म्हणावे असे व्यक्तिमत्त्वही नाही. तरीही नाना पाटेकर यांनी संपूर्ण हयातभर मनोरंजन क्षेत्रास झाकोळून टाकले. एरवी टळटळीत उन असतानाही एखादा ढगाचा चुकार तुकडा समोर यावा आणि जमिनीवर सूर्याचा प्रकाश नव्हे तर ढगाची सावली पसरून राहावी तसे नाना पाटेकरांचे व्यक्तिमत्त्व. हे असे म्हणणे रास्त कारण नाना पाटेकर ज्यावेळी पहिल्यांदा पडद्यावर चमकले तेव्हा नानांच्याच वजाबाकीच्या बाजू असलेले अमिताभ बच्चन स्थिरावलेले होते, त्यांच्या 'दीवार', 'जंजीर' वगैरेंनी रंगरूप नसलेलाही नायक होऊ शकतो, हे सिद्ध केलेले होते. इतकेच काय पण 'शोले' हे ७० एमएम महा-मनोरंजन चित्रपटगृहांच्या पडद्याप्रमाणे प्रेक्षकांचीही मने व्यापून होते. अशावेळी नाना पाटेकर यांचा 'गमन' आला. त्यातील नानांचा 'वासू' अगदीच लहानखुरा, पण लक्षवेधी. त्याच वर्षी रंगमंचावर 'हमीदाबाईची कोठी' आले. नानांचा लुक्कादादा शरीराने आडदांड नसूनही त्याची जरब बसली. त्यानंतर पाच वर्षांनी जयवंत दळवी यांचे 'पुरुष' आले आणि नानांच्या अभिनय पौरुषत्वाने सगळेच दिपले. 'पुरुष'मधला नानांचा गुलाबराव हा खलनायक. पण चंद्रकांत गोखले, रिमा लागू, उषा नाडकर्णी असे तगडे कलाकार असतानाही तोच लक्षात राहातो. त्यांचे रंगमंचावरचे 'कर्र... कर्र' वाजणाऱ्या वहाणा घालून चालणे हे त्यांच्या खऱ्या जगण्याचाच भाग होते, हे नंतरच्या त्यांच्या आयुष्यात दिसून आले. पण नानांच्या 'नाना-पणाची' खरी चुणूक पहिल्यांदा दिसली होती प्रेमानंद गज्वी यांच्या 'घोटभर पाणी' या एकांकिकेत. आणीबाणीचा काळ आणि छबिलदासची प्रायोगिक नाट्यचळवळ समकालीन. त्याच काळात नानांच्या 'घोटभर पाणी'तील आविष्काराने नानांनी समस्तांस भिजवून टाकले होते. हे 'स्टार' होण्याआधीचे नाना. उर्जेने भरलेले. त्याच जोशात त्यांनी गज्वी यांचे 'तन माजोरी' केले. त्याचा विषय लहानपणी धरणावर मजुरी करावी लागलेल्या गज्वींच्या स्वानुभवावर आधारित. मुद्दा वेठबिगारीचा. त्यात धोतर नेसलेले, हाती आसूड घेतलेले कराल, करकरीत जमीनदार नाना ज्यांनी अनुभवले त्यांना त्या जमीनदाराच्या छटा नानांच्या अभिनयात पुढे अनेकदा आढळल्या असतील. हे नानांचे मोठेपण जसे होते; तसेच ते तसे जगणे ही नानांची मर्यादाही होती. 'क्रांतिवीर' मधला त्यांचा देहात न मावणारा संताप, 'परिंदा'तील त्यांचा संयत खुनशीपणा, 'अग्निसाक्षी'तली मानसिक गुंतागुंत, 'प्रहार'मधली लष्करी शिस्तप्रियता, नियंत्रित क्रौर्याचे अंगावर शहारे आणणारे दर्शन घडवणारा पोलीस अधिकाऱ्याचा 'अब तक छप्पन'मधील साधू आगाशे, 'अपहरण'मधील धोरणी, भावनाशून्य राजकारणी ही नानांची विविध रूपे प्रत्यक्षात त्यांच्यातील एका रूपाचीच प्रतिबिंबे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### शिवसैनिकांना त्रास दिला तरी याद राखा; संजय राऊत यांची टीका!

आंबेगाव (स. गांवकरी) : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांचा जुन्नर आंबेगाव दौरा संपन्न झाला यावेळी कळंब येथे तिरंगा मंगल कार्यालय येथे आयोजित सभेत त्यांनी भारतीय जनता पक्षावर जोरदार टीका केली. राज्यात भाजप विरोधी वातावरण तयार झाले असून भाजप विरोधात जनता आक्रमक झाली आहे आंबेगाव तालुक्याचे लोकप्रतिनिधी दिलीप वळसे पाटील यांच्याकडून शिवसैनिकांना त्रास दिला जात असून खोटे गुन्हे दाखल केले जात आहे. एखादा विरोधी पक्षाचा कार्यकर्ता चांगले काम करत असेल मोठा होत असेल त्याला अडवण्याचा प्रयत्न केला जात आहे मात्र यापुढे शिवसैनिकांना त्रास दिला तर मी स्वतः आंबेगाव तालुक्यात येईल व त्यापुढे काय होईल याला तुम्ही जबाबदार असाल असे संजय राऊत म्हणाले. यावेळी जिल्हाप्रमुख सूरेश भोर, तालुका प्रमूख नितीन भालेराव, तालुका समन्वयक राजाराम बाणखेले, गणपत वळसे पाटील, युवासेना प्रमुख रोहन कानडे, कलावती पोटकुले यांसह पक्षांचे पदाधिकारी, शिवसैनिक, युवासेना पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.



### भानुदास चासकर यांना ' आदर्श मुख्याध्यापक महाराष्ट्र गौरव पुरस्कार '

आळेफाटा (स. गांवकरी) : शिवांजली ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित शिवांजली विद्यानिकेतन, चाळकवाडी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. भानुदास रामचंद्र चासकर यांना द युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने श्री क्षेत्र आळंदी येथे 'आदर्श मुख्याध्यापक महाराष्ट्र गौरव पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य व सामाजिक कार्याची दखल घेत हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. पुणे येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात हा सन्मान करण्यात आला. या सोहळ्यास शांतीब्रह्म संत एकनाथ महाराजांचे १४ वे वंशज श्रीनाथ महाराज गोसावी, संत शिरोमणी सावता महाराजांचे १८ वे वंशज ह.भ.प. रमेश महाराज वसेकर, समाज कल्याण अधिकारी श्री. मनोज विठ्ठल आचार्य, तुकाराम महाराज संस्थानचे विश्वस्त अध्यक्ष ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज मोरे, एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री. अनंत करंज, पत्रकार श्री. काशिनाथ आनंदराव, द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष शेखर अन्सार बाबासाहेब आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते चासकर यांना सन्मानचिन्ह, शाल व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.या पुरस्काराबद्दल शिवांजली ग्रामविकास प्रतिष्ठानचे पदाधिकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक, ग्रामस्थ व नातेवाईकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



### विद्यार्थी सहभाग परिसंवाद स्पर्धेचे भव्य आयोजन

आळेफाटा (स. गांवकरी) : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत, महारिया चॅरिटेबल ट्रस्ट संचलित सह्याद्री व्हॅली कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, राजुरी-पुणे येथे दोन दिवसीय 'भव्य विद्यार्थी सहभाग परिसंवाद (सेमिनार) स्पर्धा २०२६-२७' चे उत्साहात आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली, ही स्पर्धा ८ व ९ ऑक्टोबर २०२६ दरम्यान पार पडली. याप्रसंगी महारिया चॅरिटेबल ट्रस्टचे खजिनदार मा. श्री. सचिन चव्हाण, प्राचार्य मा. प्रा. डॉ. संजय झोपे व उपप्राचार्य मा. प्रा. पी. बालारामडू यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे संयोजन संगणक अभियांत्रिकी विभाग प्रमुख प्रा. तेजस नलावडे आणि प्रा. वैभव नांगरे यांनी केले आहे. स्पर्धेत 'शाश्वत विकास', 'महिला सुरक्षा', 'करिअरची ब्लू प्रिंट' आणि 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' यांसारख्या ६ महत्त्वपूर्ण विषयांवर विद्यार्थी आपले सादरीकरण करत आहेत. उत्कृष्ट सादरीकरणासाठी प्रथम ₹३,०००, द्वितीय ₹२,००० आणि तृतीय ₹१,००० ची रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत. प्रसंगी प्रमुख अतिथी प्रा. डॉ. रतिलाल रामचंद्र बाबेल (अध्यक्ष - जुन्नर तालुका विज्ञान अध्यापक संघ) आजच्या या तंत्रज्ञानाच्या युगात केवळ पुस्तकी ज्ञान मिळवणे पुरेसे नाही, तर आपल्यात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन आपल्या भाषणातून व्यक्त केले. प्रा. डॉ. केशव नामदेव बोरकर (कवी, निवेदक, व्याख्याते व सॉफ्ट स्कील ट्रेनर) यांनी आपल्या भाषणातून तांत्रिक शिक्षणासोबतच 'सॉफ्ट स्कील्स' , प्रभावी संवादकौशल्य आणि सकारात्मक विचारसरणी हीच तुमच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख निर्माण करते.

## दिव्यातील फेरीवाला अतिक्रमणावर कडक कारवाईचे महापौरांचे आदेश !



**ठाणे, दिवा : (स. गांवकरी)**

दिवा शहरातील वाढत्या फेरीवाला अतिक्रमणाच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी महापौर शर्मिलाताई पिंपळोलकर यांच्या अध्यक्षतेखाली महापौर कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. दिव्यातील मुख्य रस्ते, चौक आणि पदपथांवरील अतिक्रमणे हटवून शहर अतिक्रमणमुक्त करण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस कारवाई करावी, असे निर्देश महापौरांनी या बैठकीत दिले. दिवा परिसरातील प्रमुख रस्ते आणि चौकांमध्ये फेरीवाल्यांनी केलेल्या अतिक्रमणामुळे नागरिकांना तसेच वाहनचालकांना वाहतूक कोंडी आणि गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. स्थानिक नगरसेवकांनी बैठकीत हा प्रश्न उपस्थित करून प्रशासनाचे लक्ष वेधले. नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी अतिक्रमणांवर कोणतीही गय न करता तातडीने आणि सातत्याने कारवाई करावी, अशा स्पष्ट सूचना महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. या बैठकीला महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, सहाय्यक आयुक्त प्रवीणकुमार फड, माजी उपमहापौर व शहरप्रमुख नगरसेवक रमाकांत मढवी, बाबाजी पाटील, नगरसेविका अर्चना पाटील, शैलेश पाटील, नगरसेविका दर्शना म्हात्रे, साक्षी मढवी, स्नेहा पाटील, दीपाली भगत, विभागप्रमुख निलेश पाटील यांच्यासह अन्य स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीतून दिव्यातील फेरीवाला अतिक्रमणाचा प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**दिव्यातील फेरीवाल्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी महापौरांची भेट घ्यावी लागते हे दिवा प्रभाग समितीच्या ११ नगरसेवकांचे अपयश – ॲड. रोहिदास मुंडे, उबाठा**

## १९०० हून अधिक शेतकऱ्यांच्या पीक नुकसानीचे झाले पंचनामे

### दिवाळीपूर्वी तातडीने आर्थिक मदत देण्याची मैंदर्गीचे नगरसेवक मुतणा करजगी यांची मागणी

**अक्कलकोट : (स. गांवकरी)**

खरीप हंगामाला दुष्काळाचा फटका बसला असल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे; त्यामुळे नुकसानभरपाईची रक्कम तातडीने जमा करण्याची मागणी शेतकरी करीत आहेत. यंदा समाधानकारक पाऊस न झाल्याने मैंदर्गी शहरासह परिसरातील ग्रामीण भागातील हजारो शेतकऱ्यांना खरीप हंगामात मोठ्या पीक नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. पावसाअभावी उडीद, सोयाबीन, तूर, सूर्यफूल, मूग यांसह इतर पिकांचे मोठे नुकसान झाले असून, राज्य शासनाच्या निर्देशानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन पीक नुकसानीचे पंचनामे करण्याची मोहीम महसूल व कृषी विभागाच्या वतीने राबविण्यात येत आहे. मैंदर्गी शहरातील एकूण १,८५० खातेदारांपैकी १,१०० हून अधिक शेतकऱ्यांच्या खरीप पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यात आल्याची माहिती ग्राम महसूल अधिकारी विकास घंटे यांनी दिली. राज्यात यंदा पावसाने अपेक्षित साथ न दिल्याने अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शासनाच्या निर्देशानुसार



> वेळेत आर्थिक मदत मिळाल्यास रब्बी हंगामाच्या पेरणीसाठी भांडवल उपलब्ध होईल आणि पुढील हंगामाची तयारी करता येईल, त्यामुळे दिवाळीपूर्वी तातडीने आर्थिक मदत देण्यात यावे अशी मागणी केली जात आहे. शेतकऱ्यांची अपेक्षा म्हणजे लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळाली तर रब्बी हंगामाची शेतकऱ्यांना तयारी करण्यासाठी मदत होणार आहे.
>
> **- मुत्तण्णा करजगी, शेतकरी तथा नगरसेवक, मैंदर्गी नगरपरिषद**

खरीप हंगामातील नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करण्याचे काम सुरू आहे. अक्कलकोटचे तहसीलदार विनायक मगर यांच्या नेतृत्वाखाली मैंदर्गी शहरासह परिसरातील ग्रामीण भागात ही मोहीम राबविण्यात येत आहे. मैंदर्गीच्या मंडल अधिकारी शमशादबी शेख, ग्राम महसूल अधिकारी विकास घंटे आणि कृषी सहाय्यक अधिकारी महेश शंभूभैरे यांच्या पथकाने शेताच्या बांधावर जाऊन पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी संबंधित शेतकऱ्यांकडून नुकसानीची माहिती घेऊन पंचनाम्याची कार्यवाही करण्यात आली. नगरसेवक मुतण्णा करजगी, कोतवाल शब्बीर जमादार, गजानन कलमनी यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी या प्रक्रियेत सहभागी झाले होते. खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. खरीप पिकांवर केलेला खर्च वाया गेल्याने आगामी रब्बी हंगामासाठी शेतजमिनीची मशागत करणे, बियाणे व खते खरेदी करणे तसेच पेरणीचा खर्च भागविणे शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान ठरत आहे. त्यामुळे शासनाने पीक नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करून पात्र नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाईची रक्कम लवकरात लवकर थेट त्यांच्या बँक खात्यावर जमा करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## धडगावात तब्बल ३२ लाखांचा गांजा जप्त

- वनजमिनीवरील बेकायदेशीर शेती उद्ध्वस्त
- २६२ किलो गांजा जप्त; मांडवी बु. येथील रूपमाळपाडा शिवारात पोलिसांची मोठी कारवाई





**नंदुरबार : (स. गांवकरी)**

नंदुरबार जिल्ह्यात अमली पदार्थांची बेकायदेशीर लागवड आणि तस्करीविरोधात पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. धडगाव तालुक्यातील मांडवी बु. गावाच्या रूपमाळपाडा शिवारातील वनजमिनीवर बेकायदेशीरपणे करण्यात आलेली गांजाची शेती पोलिसांनी उद्ध्वस्त केली. या कारवाईत तब्बल २६२ किलो गांजा जप्त करण्यात आला असून, त्याची अंदाजे किंमत ३२ लाख ३१ हजार १५ हजार रुपये असल्याचे वृत्तात नमूद आहे. (रकमेचा अचूक आकडा मूळ वृत्तातून पडताळणे आवश्यक आहे. पोलिसांना स्थानिक गुन्हे शाखेमार्फत मांडवी बु. येथील रूपमाळपाडा परिसरात वनजमिनीवर गांजाची लागवड करण्यात आल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी स्वतंत्र पथक तयार करून संबंधित शिवारात पाहणी केली. पाहणीदरम्यान मोठ्या प्रमाणात गांजाची झाडे आढळून आली. त्यानंतर पोलिसांनी पंचनामा करून गांजाची झाडे उखडून जप्त केली. या प्रकरणी पिंटू ऊर्फ पिट्या मिठ्या पटले, रा. मांडवी बु., रूपमाळपाडा, ता. धडगाव याच्याविरुद्ध धडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याचे वृत्तात म्हटले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अभिनी सानप व अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस उपनिरीक्षक मुकेश पवार, विकास गुंजाळ, महेश निकम, दिनेश चिघे, स्वप्निल गोसावी, मुकेश तावडे, सुनील येवले, सचिन तस्मोडे, मनोज महाजन, अभय राजपूत, निखिलेश गावळी, हेमंत बारी, विनोद पाटील व राहुल पांढारकर यांनी सहभाग घेतला. दरम्यान, मांडवी शिवारात यापूर्वीही गांजाविरोधात कारवाई करण्यात आल्याचे वृत्तात नमूद आहे. वनजमिनीवर बेकायदेशीरपणे गांजाची लागवड होत असल्याचा प्रकार समोर आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास धडगाव पोलीस करीत आहेत.

## विकास चव्हाण यांचा कृषी क्षेत्रातील कार्यासाठी गौरव

**आळेफाटा : (स. गांवकरी)**

कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, कमी खर्चात अधिक उत्पादन, ऊस पाचट व्यवस्थापन, सुपर केन नर्सरी तंत्रज्ञान तसेच शाश्वत ऊस शेतीच्या प्रसारासाठी केलेल्या कार्याची दखल घेत स्मार्ट व्हिलेज पारगावचे सुपुत्र व श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे तज्ञ संचालक विकास हरिभाऊ चव्हाण यांचा जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीतर्फे सन्मान करण्यात आला. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या २४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेनिमित्त आयोजित कार्यक्रमात आमदार शरददादा सोनवणे यांच्या हस्ते चव्हाण यांना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाजार समितीचे सभापती ॲड. संजय शिवाजीराव काळे होते. चव्हाण हे ऊस शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतकऱ्यांसाठी कमी





खर्चातील उत्पादन पद्धतींच्या प्रसारासाठी कार्यरत आहेत. ऊस पाचट व्यवस्थापन, सुपर केन नर्सरी तंत्रज्ञान, उत्पादन खर्चात बचत आणि शाश्वत ऊस शेती याबाबत त्यांनी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती व मार्गदर्शन केले आहे.

या वेळी माजी आमदार अतुल बेनके, बाजार समितीचे उपसभापती एन. एम. काळे, माजी उपसभापती प्रकाश शेठ ताजणे, श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक घोलप, कृषिरत्न अनिल तात्या मेहर, पंचायत समिती सदस्य संभाजीदादा चव्हाण, बळीराम चव्हाण तसेच जुन्नर-आंबेगाव ऊस उत्पादक संघाचे सदस्य उपस्थित होते.

## पुलाच्या बांधकामामुळे सोनवद बसफेऱ्या बंद

**नंदुरबार : (स. गांवकरी)**

शहादा तालुक्यातील सोनवद परिसरात पुलाच्या कामामुळे एस.टी. बससेवा बंद झाल्याने विद्यार्थी, प्रवासी आणि ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः शाळेत शिक्षणासाठी जाणाऱ्या सुमारे ४५ विद्यार्थ्यांना दररोज आठ किलोमीटर पायपीट करून शाळा गाठावी लागत असल्याने पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी पर्यायी मार्गाने एस.टी. बससेवा तातडीने सुरू करावी, अशी मागणी पालक व प्रवाशांकडून केली जात आहे. सोनवद परिसरातील रस्त्याचे काम सुरू असल्याने या मार्गावरील वाहतुकीवर परिणाम झाला



आहे. शहादा–मोहिदा–सोनवद मार्गावर सुरू असलेल्या पुलाच्या बांधकामामुळे बसफेऱ्या बंद करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या मार्गावरून प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी पायी चालत जावे लागत आहे. बससेवा बंद असल्याने केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे, तर दैनंदिन कामानिमित्त प्रवास करणाऱ्या नागरिकांनाही गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

सोनवद गावातून शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एस.टी. बससेवा महत्त्वाची आहे. मात्र,

**४५ विद्यार्थ्यांची रोज ८ किलोमीटर पायपीट!**

बसफेऱ्या बंद झाल्यामुळे विद्यार्थ्यांना दररोज मोठे अंतर पायी पार करावे लागत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधीच विविध शैक्षणिक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यातच वाहतुकीची सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांच्या अडचणींमध्ये आणखी भर पडली आहे.

पावसाळ्याच्या दिवसांत रस्त्यावर चिखल, पाणी आणि वाहतुकीच्या अडचणी निर्माण होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना पायी प्रवास करणे अधिक त्रासदायक ठरू शकते. वेळेत शाळेत पोहोचणे, नियमित उपस्थिती राखणे आणि अभ्यासासाठी पुरेसा वेळ मिळणे यावरही त्याचा परिणाम होण्याची भीती पालकांकडून व्यक्त केली जात आहे. पुलाचे बांधकाम सुरू असल्याने संबंधित मार्गावरून बस चालविणे शक्य नसल्यास एस.टी. महामंडळाने पर्यायी मार्गाचा विचार करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. पर्यायी मार्गाने बसफेऱ्या सुरू केल्यास विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य प्रवाशांची गैरसोय कमी होऊ शकते. त्यामुळे एस.टी. महामंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करून तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

सोनवद परिसरातील नागरिकांच्या मते, पुलाचे काम पूर्ण होण्यासाठी वेळ लागणार असल्यास तोपर्यंत पर्यायी वाहतूक व्यवस्था करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये आणि प्रवाशांना दररोज त्रास सहन करावा लागू नये, यासाठी लोकप्रतिनिधी व संबंधित प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. पुलाचे काम पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांसाठी पर्यायी एस.टी. बससेवा सुरू करावी, अन्यथा विद्यार्थ्यांची पायपीट आणि शैक्षणिक नुकसान सुरूच राहण्याची भीती आहे. त्यामुळे एस.टी. महामंडळ आणि संबंधित प्रशासन यावर कोणती भूमिका घेते, याकडे सोनवद परिसरातील ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे

## आश्रम शाळेतील शिक्षकाने नानाचे वॉल तयार करून वाहिली श्रद्धांजली




अक्कलकोट (स. गांवकरी) : अक्कलकोट तालुक्यातील कोन्हाळी आश्रम शाळेतील संतोष जकापुरे या शिक्षकाने नाना चे रंगीत खडू ने वॉल तयार करून त्यांना आश्रम शाळेच्या आणि सर्व शिक्षक विद्यार्थी आणि कर्मचारी यांच्या वतीने आगळी वेगळी श्रद्धांजली वाहिली भारतीय चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, अभिनय क्षेत्रातील नटसम्राट नाना पाटेकर यांचे काल दि. ८ ऑक्टोबर २०२६ रोजी वयाच्या ७५ व्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले. अभिनय क्षेत्रातील दादा म्हणून प्रसिद्ध नाना पाटेकर यांनी आपल्या अभिनयासोबत विज्ञान, पक्षी नाना पाटेकर आज आपल्यातून निघून गेले. परंतु नाना पाटेकर यांच्या निधनामुळे सर्वांनाच‘ दुःख झाले आहे क्रांतिवीर’, ‘नटसम्राट’, ‘प्रहार’, ‘परिंदा सन्मान प्राण’ सारख्या चित्रपटांतून त्यांनी अभिनयाची नवी व्याख्या घडवली. ३ राष्ट्रीय पुरस्कार, ४ फिल्मफेअर आणि पद्मश्री सन्मान मिळवूनही ते कायम जमिनीवर राहिले. पडद्यावरचा रांगडा अभिनेता म्हणून त्यांनी नाव कमाविले आहे. त्यांच्या खऱ्या आयुष्यातही नाना तितकेच दिलदारही होते. अभिनयाचे तसेच दुःखाश्रयात शेकड्यांसाठी त्यांनी ‘नाम फाऊंडेशन’ स्थापन करून शेकडो कुटुंबांना आधार दिला. सिनेसृष्टीतील आपल्या अभिनयाने दमदार छाप पाडणाऱ्या ‘नटसम्राट नाना पाटेकर यांना काल शुक्रवारी अक्कलकोट तालुक्यातील कोन्हाळी येथील आश्रम शाळा चे कलाशिक्षक श्री संतोष जकापुरे सर यांनी दर्शनी फलकावर सुंदर चित्र रेखाटून संस्था व शाळेच्या वतीने श्रध्दांजली वाहिली आहे.




## शारदा मंदिर हायस्कूल शाळेत मराठी भाषा सप्ताह कार्यक्रम संपन्न

कल्याण (स. गांवकरी) : कल्याण शहरातील लालचौकी येथील शारदा मंदिर संस्थेच्या शारदा मंदिर हायस्कूल कल्याण शाळेत यावर्षी अभिजात मराठी भाषा सप्ताह निमित्ताने शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली देशमुख, पर्यवेक्षिका सुरेखा पाटील आणि ज्येष्ठ शिक्षिका अपर्णा कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रकारचे कार्यक्रम आणि स्पर्धा राबविण्यात आल्या. ५ ऑक्टोबर २०२६ पासून मराठी अभिजात भाषा सप्ताहाच्या कार्यक्रमाला या शाळेमध्ये सुरुवात करण्यात आली.त्यानिमित्ताने निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, अभिजात मराठी भाषेची प्रतिज्ञा मराठी भाषेचा इतिहास, संत साहित्य व्याख्यान तसेच विविध प्रकारची मराठी गीते, ओव्या, मराठी भाषेचे महत्त्व अशा प्रकारचे कार्यक्रम या शाळेत राबवण्यात आले. मराठी भाषेविषयी विद्यार्थ्यांमध्ये प्रेम निर्माण व्हावे, भाषिक जाणीव निर्माण व्हावी आणि त्यांच्या विविध भाषिक कौशल्यांचा विकास व्हावा यासाठी या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. वक्तृत्व स्पर्धेसाठी मातृभाषेचे शिक्षणातील महत्त्व , मराठी भाषा आणि तंत्रज्ञान हा विषय ठेवण्यात आला होता यामध्ये ९०विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमाचे संयोजन या शाळेच्या शिक्षिका स्वाती पालांडे, ज्योती घुगे, पंढरीनाथ रोकडे, कविता चिमूरकर,भरत दळवी, वंदना जुवळे, प्रतिमा कांबळे, अनिल कुमावत, ग्रंथपाल तपस्या मेहेंदळे यांनी केले. यावेळी निबंध आणि वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. "लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी" या अभिमान गीताने या सप्ताहाची सांगता करण्यात आली.

# अत्याचार प्रकरणाचा जुन्नरमध्ये निषेध

- आरोपीवर पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची नाभिक संघटनेची मागणी
- तहसीलदार रणजित भोसले यांना निवेदन



"अल्पद्यीन मुलींच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड नको; दोषींवर कायद्याच्या चौकटीत कठोर कारवाई झालीच पाहिजे.”
-जुन्नर तालुका नाभिक संघटनेची भूमिका

जुन्नर तालुका: (स. गांवकरी)

पुण्यातील विश्रांतवाडी परिसरात अल्पवयीन मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचारा च्या घटनेचा निषेध करत पीडितेला न्याय मिळावा,या मागणीसाठी महाराष्ट्र नाभिक महामंडळ संघटनेच्या जुन्नर तालुका कार्यकारिणीच्या वतीने गुरुवारी दि:-८ ऑक्टो रोजी जुन्नरचे तहसीलदार रणजित भोसले यांना निवेदन देण्यात आले.

अल्पवयीन मुली वर झालेल्या या घटनेनेसमाज मन हेलावले असून,अशा घटनांना आळा घालण्यासाठी कठोर कायदेशीर कारवाई होणे आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.पीडित भगिनीच्या पाठीशी समाज खंबीरपणे उभा असून,तिला न्याय मिळेपर्यंत कायदेशीर आणि लोकशाही मार्गाने पाठ पुरावा सुरू ठेवण्याचा निर्धार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

यावेळी संघटनेचे जुन्नर तालुका अध्यक्ष अरुण क्षीरसागर,कार्याध्यक्ष सुनिल खंडागळे,उपाध्यक्ष सचिन कालेकर,सचिव नित्यानंद नेवकर,तेजपाल रायकर,रविंद्र भोर,गणेश नायकोडी,शंकर डाके,ज्ञानेश्वर शिंदे,संदीप शिंदे,शरद क्षीरसागर, युवराज शिंदे,रविंद्र रायकर,रोहिदास रायकर,निलेश नेवकर,गणेश कोल्हाळ,जुन्नर तालुका नाभिक असोसिएशनचे पदाधिकारी,भीमाशंकर नाभिक देवस्थान ट्रस्ट, आळंदी नाभिक देवस्थान ट्रस्ट व तालुक्यातील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

१) आरोपीवर पोक्सो (POCSO) कायद्यान्वये गुन्हा दाखल करावा.
२) अल्पवयीन पीडितेचाजबाब बालमैत्रीपूर्ण वातावरणात, शक्य असल्यास महिला अधिकाऱ्यांमार्फत नोंदवावा.
३) पीडित मुलगी व तिच्या कुटुंबाला तातडीने पोलीस संरक्षण द्यावे.
४) प्रकरण फास्टट्रॅक न्यायालयात चालवून आरोपीला कठोरात कठोर शिक्षा मिळावी.
५) पीडितेला धमकावले जात असल्याच्या आरोपाची गंभीर दखल घ्यावी.
६) भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलावीत.
७) पीडित मुलगी व तिच्या कुटुंबाला तातडीने पोलीस संरक्षण द्यावे आणि प्रकरण फास्टट्रॅक न्यायालयात चालवून आरोपीला कठोरात कठोर शिक्षा मिळावी, अशा मागण्या करण्यात आल्या.

पीडितेला धमकावले जात असल्याच्या आरोपही निवेदनात करण्यात आला असून, भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी संघटनेने केली आहे.

# चैतन्य विद्यालयात वन्यजीव सप्ताह साजरा



- मानवी जीवनात पशु-पक्ष्यांना अनन्य साधारण महत्त्व : रमेश खरमाळे

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

महाराष्ट्र शासन सामाजिक वनीकरण विभाग, पुणे यांचे वतीने १ ऑक्टोंबर ते ७ ऑक्टोंबर हा सप्ताह वन्यजीव सप्ताह म्हणून दरवर्षी साजरा केला जातो.या सप्ताह अंतर्गत ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूरमध्ये सामाजिक वनीकरण परिक्षेत्र जुन्नर यांचे वतीने चित्रकला स्पर्धा व वनरक्षक रमेश खरमाळे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते अशी माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर यांनी दिली. सामाजिक वनीकरण परिक्षेत्र जुन्नरचे वनरक्षक रमेश खरमाळे मार्गदर्शन करताना म्हणाले की,पर्यावरणातील प्रत्येक घटक आपल्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. पशु-पक्षांचे महत्त्व प्रत्येकाने समजून घ्यायला हवे.पशु-पक्षी संपले तर पृथ्वी तलावरचे मानवाचे जीवन सुद्धा संपुष्टात येईल.आपल्या जीवनात पशु- पक्षांना अनन्य साधारण महत्त्व आहे पशु- पक्षी झाडे लावतात व आपण श्वास घेतोय.प्रत्येकानेजास्तीत जास्त झाडे लावून जंगलांचे संवर्धन करावे. त्यामुळे वन्य जीव संरक्षित राहतील आणि पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही म्हणून प्रत्येकाने वेळ न घालवता जास्तीत जास्त झाडे लावावीत. वन्यजीव सप्ताह निमित्त घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत क्रमांक मिळविलेल्या आरुष संतोष कांबळे (प्रथम), नचिकेत प्रदीप सूर्यवंशी द्वितीय,कार्तिक संजयगायकर ( तृतीय)या विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमा साठी ग्राम विकास मंडळ ओतूरचे सचिव प्रदीप गाढवे, पंकज घोलप,प्रतीक अकोल कर संजय हिरे,भाऊसाहेब खाडे,राजाराम शिंदे,विशाल चौधरी, मिलिंद खेत्री,संतोष सोनवणे,बाळासाहेब साबळे, मंगेश तांबे,सोनाली माळवे, आशा गाडेकर,लक्ष्मण दुडे, वनिता भोर,शिल्पा भालेराव, अजित डांगे,सोनाली कांबळे, आसावरी गायकर,देवचंद नेहे, सरस्वती भताने,प्रमोद जाधव, अनिल जवरे,रसिका शेळके, आशा डुंबरे,अश्विनी नलावडे, अनुराधा इसकांडे, निर्मला डोंगरे,साक्षी देशमुख, प्रसन्न तांबे,ईश्वर ढमाले, अरविंद आंबरे,आदी उपस्थित होते.

# माणुसकीच्या नात्याने टपाल कर्मचाऱ्यांचा सन्मान!



जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

काळ बदलला, संवादाची साधने बदललीमात्र माणसांना माणसांशी जोडणाऱ्या टपाल सेवेचे महत्त्व आजही कायम आहे.जागतिक टपाल दिना निमित्त जुन्नर येथील टपाल कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गुलाबपुष्पदेऊन सन्मान करण्यात आला. अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद,जुन्नर तालुका अध्यक्ष तथा कवी-लेखक यशवंत घोडे फोफसंडीकर यांनी हा स्तुत्य उपक्रम राबविला.ऊन,वारा,पाऊस यांची पर्वा न करता नागरिकां पर्यंत पत्रे,महत्त्वाची कागदपत्रे आणि विविध सेवा पोहोचविणाऱ्या टपाल कर्मचाऱ्यांच्या कार्याप्रति त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.कोरोना महामारी च्या कठीण काळातही टपाल कर्मचाऱ्यांनी आपली सेवा सुरू ठेवून नागरिकांनामोलाचे सहकार्य केले त्यांच्या कर्तव्य निष्ठेची आठवण ठेवून त्यांचा सन्मान करण्यात आला. डिजिटल युगात मोबाईल व इंटरनेटचा वापर वाढला असला,तरी ग्रामीण भागातील नागरिकांसाठी टपाल सेवा आजही विश्वासाचे महत्त्वाचे माध्यम आहे. " कोरोना काळात टपाल कर्मचाऱ्यांनी केलेले सहकार्य विसरता येणार नाही. त्यांच्या कार्याप्रति आदर व्यक्त करून त्यांचे मनोबलवाढविण्यासाठी हा छोटासा सन्मान केला आहे "अशी भावना यशवंत घोडे यांनी व्यक्त केली.यावेळी डाकपाल रोहिदास पारधी, क्लार्क आकाश श्रीवास्तव, रजनीदेवी व दीपक साळवे, पोस्टमन साबळे,किरण सोनवणे व संजय चौधरी, एमटीएस अंकुश फाफाळ तसेच जीडीएस मोढवे मॅडम यांच्यासह टपाल कार्यालया तील कर्मचारी उपस्थित होते.

# तामसात सार्वजनिक मुताऱ्यांचा अभाव; महिला-मुलींची मोठी गैरसोय

- तामसात सार्वजनिक मुतारीच नाही; महिला-मुलींची मोठी गैरसोय
- २५ हजार लोकसंख्या, ५० गावांशी दररोज संपर्क; बाजारपेठेत लघुशंकेसाठी आडोसा शोधण्याची वेळ..
- महिन्याकाठी लाखो रुपये कर वसुली असून ग्रामपंचायत ची तिजोरी रिकामीच..?



तामसा: (स. गांवकरी)

नांदेड जिल्ह्यातील महत्त्वाची बाजारपेठ म्हणून ओळख असलेल्या तामसा शहराची लोकसंख्या सुमारे २५ हजारांच्या घरात असून, दररोज परिसरातील जवळपास ५० गावांतील नागरिकांचा विविध कामानिमित्त तामसा येथे संपर्क असतो. मात्र एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात सार्वजनिक मुतारी आणि स्वच्छतागृहांची पुरेशी सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

तामसा येथील जुन्या बसस्थानक परिसरात एक सुलभ शौचालय व मुतारीची सुविधा आहे. मात्र शहरातील इतर प्रमुख ठिकाणी सार्वजनिक मुतारीची व्यवस्था नसल्याचे चित्र आहे. विशेषतः महिला व मुलींसाठी ही समस्या अधिक गंभीर बनली आहे.

तामसा बसस्थानक परिसरातही महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची सुविधा नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. बाजारपेठेत खरेदीसाठी अथवा विविध शासकीय व खासगी कामांसाठी येणाऱ्या महिला आणि मुलींना लघुशंकेसाठी आडोसा शोधण्याची वेळ येत आहे. अनेकदा उघड्यावर लघुशंका करण्याची वेळ येत असल्याने महिलांच्या सुरक्षिततेसह त्यांच्या मूलभूत गरजांकडेही दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

तामसा हे परिसरातील नागरिकांसाठी प्रमुख बाजारपेठेचे ठिकाण असून, ग्रामीण भागातून येणाऱ्या महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि प्रवाशांची संख्या मोठी आहे. अशा परिस्थितीत शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठ, बसस्थानक आणि गर्दीच्या ठिकाणी स्वच्छ, सुरक्षित व स्वतंत्र सार्वजनिक स्वच्छतागृहांची उभारणी करणे गरजेचे आहे.

‘स्वच्छ भारत’चा संदेश देताना प्रत्यक्षात सार्वजनिक स्वच्छतागृहांची सुविधा मात्र अपुरी राहणे, ही नागरिकांसाठी चिंतेची बाब आहे. संबंधित ग्रामपंचायत व प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तामसा शहरात ठिकठिकाणी सार्वजनिक मुतारी व महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे..@ चोकट @

ग्रामीण भागातून येणाऱ्या मुलींच्या सोयसुविधा नसल्याने मोठी कुंचुम्बना होत आहे विद्यार्थिनींना बस स्थानकात बसची वाट पाहताना तासोन तास वाट पाहावं लागत असून नैसर्गिक क्रिया साठी सुलभ शौचालया स्वच्छतागृह बस स्थानकात नसल्याने मोठी गैरसोयी होत आहे..

# दशरथ शांताराम चव्हाण : श्रमिक पत्रकारितेचा बुलंद आवाज !

**डॉ. विश्वासराव आरोटे, कळसुबाई शिखरावरून!**

**नवी मुंबईसारख्या आधुनिक, गतिमान शहरात पत्रकारितेच्या क्षेत्रात संघर्षातून आपले स्थान निर्माण करणारे दशरथ शांताराम चव्हाण हे नाव आज श्रमिक पत्रकारांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या आंदोलनाचे प्रतीक बनले आहे. सामान्य घरातून आलेल्या या पत्रकाराने नवी मुंबईतील पत्रकारांना शासन स्तरावर हक्क मिळवून देण्यासाठी, त्यांच्या समस्या शासन दरबारी पोहोचवण्यासाठी, तसेच पत्रकारितेला सामाजिक न्यायाचे भान देण्यासाठी अविरत कार्य केले आहे.**

त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या नेतृत्वाखाली दशरथ चव्हाण यांची नवी मुंबई जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली होती. या निवडीमुळे नवी मुंबईतील श्रमिक पत्रकारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रवासात त्यांना राज्य संघटक श्री संजयजी भोकरे, राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे आणि राज्य प्रसिद्धी प्रमुख श्री नयनाथ जाधव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. संघर्षमय बालपणातून पत्रकारितेकडे वाटचाल:शांताराम रामभाऊ चव्हाण पुणे जिल्ह्यातील शिवनेरीच्या पायथ्याशी असलेले वडज गांव सुभाषराव यांची वाडी मध्ये अत्यंत बिकट परिस्थितीमध्ये शेती व्यवसाय करणारे प्रत्येक वर्षी शेतीने साथ न देता आपला कुटुंबाचा उदरनिर्वाह अतिशय साध्या सोप्या पद्धतीने राहणे मनातून पुढे नेत यांना त्यांच्या शैलाबाई पत्नीने दोन भाऊ एक बहीण मोठा बंधू मंगेश चव्हाण प्रसिद्ध शेती तज्ञ दुसरे बंधू दशरथराव चव्हाण नामांकित कंपनीचे जनरेटरचे काम उत्तम रित्या पार पाडत आहे यांच्या या मुख्य व्यवसायामुळे आज खेडे गावातील तरुण मुलांना कला कौशल्य निर्मिती करून दिली आहे दशरथ चव्हाण यांचा वाढदिवस एक उत्तम दिवस मानला जातो.

दशरथ चव्हाण यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात, शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या वडज खेडे या छोट्याशा गावात, विजयादशमीच्या दिवशी झाला. मीना नदीच्या काठी, एका साध्या बैलगाडीत झालेला हा जन्म त्यांच्या जीवनाच्या संघर्षमय प्रवासाची पहिली पायरी ठरला. कष्टकरी आणि शेतकरी घरात वाढलेले दशरथ बालपणापासूनच कठीण परिस्थितीशी सामना करत शिक्षणाच्या मार्गावर चालत राहिले. सामाजिक विषमता, दारिद्र्य आणि अन्याय यांचा जवळून अनुभव घेतल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात संवेदनशीलता,





जिद्द आणि न्यायासाठी लढण्याची प्रेरणा रुजली.

पत्रकारितेतील प्रामाणिक आणि निर्भीड आवाज : दशरथ चव्हाण यांनी पत्रकारितेची सुरुवात स्थानिक बातम्यांपासून केली. पण फार काळ त्यांनी केवळ बातम्या देणारा पत्रकार म्हणूनच काम केले नाही; त्यांनी अन्यायाविरुद्ध लेखणी उपसणारा योद्धा म्हणून स्वतःला सिद्ध केले.

त्यांचे लेखन हे श्रमिक, कष्टकरी, उपेक्षित आणि सामान्य माणसांच्या जीवनातील वेदनांना आवाज देणारे ठरले.

समाजातील विसंगती, अन्याय आणि भ्रष्टाचार याविरुद्ध त्यांनी निर्भीड भूमिका घेतली. त्यांच्या लेखनात केवळ माहिती नव्हती, तर विचार आणि दिशा होती. त्यामुळेच आज ते नवी मुंबईतील श्रमिक पत्रकारांचे "बुलंद आवाज" बनले आहेत.

नवी मुंबई जिल्हाध्यक्ष म्हणून ठोस नेतृत्व : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या अंतर्गत नवी मुंबई जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर दशरथ चव्हाण यांनी पत्रकारांच्या हक्कांसाठी रचनात्मक चळवळ उभी केली.

त्यांनी पत्रकारांसाठी विविध सरकारी योजना, मान्यता, विमा आणि सुविधा या बाबींचे भान निर्माण केले. पत्रकारांचे संघटन अधिक बळकट व्हावे, श्रमिक पत्रकारांना आदराचे स्थान मिळावे या दृष्टीने त्यांनी अनेक बैठका, सल्लामसलती आणि कार्यक्रम आयोजित केले.

त्यांच्या नेतृत्वाखाली नवी मुंबईतील पत्रकार एकत्र आले आणि "एकता हाच हक्काचा मार्ग" हे तत्त्व त्यांनी रुजवले. शासन, प्रशासन आणि समाज यांच्यातील दुवा म्हणून त्यांनी पत्रकार संघटनेला अधिक परिणामकारक बनवले.

कुटुंब आणि उद्योजकतेतही ठसा : दशरथ चव्हाण यांच्या कार्यामागे त्यांचे कुटुंबाचे पाठबळ हे महत्त्वाचे बळ आहे. त्यांच्या पत्नी आणि दोन मुले त्यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून उभी आहेत. पत्रकारिता आणि सामाजिक कार्यासोबतच त्यांनी उद्योजकतेच्या क्षेत्रातही यशस्वी प्रयत्न केले.

प्रामाणिकपणा, मेहनत आणि संघटनकौशल्य या त्रिसूत्रीवर आधारित त्यांच्या कामामुळे आज त्यांचे कुटुंब समाजात एक प्रेरणादायी उदाहरण बनले आहे.

४६ व्या वाढदिवसानिमित्त - श्रमिक पत्रकारांचा अभिमान : आज दशरथ शांताराम चव्हाण यांच्या ४५ व्या वाढदिवसानिमित्त, नवी मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रातील पत्रकार आणि सहकारी त्यांना शुभेच्छा देत आहेत.

त्यांचा प्रवास हा श्रमिक पत्रकारांच्या संघर्षाची साक्ष देणारा आहे. त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून सामान्यांचा आवाज शासनापर्यंत पोहोचवला, सत्यासाठी उभे राहण्याचे धैर्य दाखवले आणि सामाजिक न्यायाच्या कार्यासाठी आपले जीवन वाहिले. दशरथ चव्हाण हे केवळ पत्रकार नाहीत, तर श्रमिक पत्रकार चळवळीचे मार्गदर्शक आणि प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या जिद्दीमुळे अनेक तरुण पत्रकारांना संघर्षातून उभे राहण्याची प्रेरणा मिळत आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली नवी मुंबईतील पत्रकारिता अधिक सशक्त, जागरूक आणि समाजाभिमुख बनत आहे.

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आणि सर्व सहकार्यांच्या वतीने त्यांना "अनंत कोटी शुभेच्छा आणि दीर्घायुष्याच्या हार्दिक शुभेच्छा!"**

# गीर गोवंश संवर्धनातून आधुनिक दुग्धव्यवसायाचा आदर्श निर्माण करा

## भोकर येथील 'अथर्व डेअरी'ची पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून पाहणी

## शास्त्रीय संगोपन व चारा व्यवस्थापनाचे केले कौतुक

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)



आधुनिक तंत्रज्ञान, शास्त्रीय पशुसंगोपन आणि नियोजनबद्ध व्यवस्थापनाच्या माध्यमातून दुग्धव्यवसाय अधिक उत्पादनक्षम व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर करण्यासाठी प्रगतिशील पशुपालकांचे प्रयत्न महत्त्वपूर्ण ठरत आहेत. या अनुषंगाने भोकर येथील प्रगतिशील पशुपालक चंद्रकांत भगवानराव चिंचाळकर यांच्या गीर गोवंश संगोपनावर आधारित 'अथर्व डेअरी' या दुग्धव्यवसाय प्रक्षेत्राची आज पाहणी करण्यात आली.

या वेळी जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. सखाराम खुणे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. प्रविणकुमार घुले, भोकरचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अविनाश बुन्नावार उपस्थित होते.

अथर्व डेअरी प्रक्षेत्रावर गुजरात राज्यातून निवडक पद्धतीने खरेदी केलेल्या गीर गोवंशाचे संगोपन करण्यात येत आहे. गीर ही देशी गोवंशातील महत्त्वाची दुग्धोत्पादक जात असून दूध उत्पादनक्षमता, स्थानिक हवामानाशी जुळवून घेण्याची क्षमता आणि आनुवंशिक वैशिष्ट्यांमुळे या जातीला विशेष महत्त्व आहे. उत्कृष्ट आनुवंशिक गुणधर्म असलेल्या गोवंशाची निवड करून त्यांचे शास्त्रीय पद्धतीने संगोपन करण्याचा चिंचाळकर यांचा प्रयत्न उल्लेखनीय आहे.

पाहणीदरम्यान गोठ्याची रचना, जनावरांच्या मुक्त हालचालीची व्यवस्था, पशुधनाचे आरोग्य आणि चारा व्यवस्थापनाची माहिती घेण्यात आली. प्रक्षेत्रावर मुक्त संचार गोठा पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून, त्यामुळे जनावरांना मुक्तपणे हालचाल करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध होते. तसेच हिरवा व वाळलेला चारा यांचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करण्यात आले आहे.

जनावरांच्या पोषणविषयक गरजा लक्षात घेऊन चाऱ्याचा कार्यक्षम वापर करण्यावर भर दिल्याचे दिसून आले. गीर गोवंशाचे संवर्धन आणि उत्कृष्ट आनुवंशिक गुणधर्म पुढील पिढीत संक्रमित करण्यासाठी चिंचाळकर यांनी भविष्यात भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे नियोजन केले आहे.

या तंत्रज्ञानाचा योग्य पशुवैद्यकीय मार्गदर्शनाखाली वापर केल्यास उच्च आनुवंशिक गुणवत्तेच्या गोवंशाची पैदास वाढविण्यास आणि दुग्धोत्पादन क्षमता सुधारण्यास मदत होऊ शकते. पारंपरिक दुग्धव्यवसायाला आधुनिक पशुसंगोपन पद्धतीची जोड देत गीर गोवंश संवर्धन, मुक्त संचार गोठा पद्धती, नियोजनबद्ध चारा व्यवस्थापन आणि आधुनिक प्रजनन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याच्या दिशेने चिंचाळकर यांनी केलेले प्रयत्न प्रेरणादायी आहेत. जिल्ह्यातील इतर शेतकरी व पशुपालकांनीही शास्त्रीय पशुसंगोपन, गुणवत्तापूर्ण गोवंशाची निवड आणि आधुनिक व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करावा. यामुळे दुग्धव्यवसाय अधिक शाश्वत, उत्पादनक्षम व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर होण्यास मदत होणार आहे.

## थोडक्यात बातम्या...



### काळा दिवस पाळत तहसील कार्यालयावर निषेध आंदोलन!

त्र्यंबकेश्वर (स. गांवकरी) : काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडीचे खासदार निवडणूक आयोगाकडे जाब विचारण्यासाठी जात असताना झालेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ त्र्यंबकेश्वर तालुका काँग्रेस कमिटीतर्फे काळा दिवस पाळून तहसील कार्यालयावर निषेध आंदोलन करण्यात आले. निवडणूक व्यवस्थेची निष्पक्षता आणि अखंडता अबाधित राखावी, तसेच निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटविण्याची मागणी मान्य करावी, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या. लोकशाहीचे रक्षण आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी काँग्रेसचा संघर्ष सुरूच राहील, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. यावेळी त्र्यंबकेश्वर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष गणेश कोठुळे, सागर चव्हाण, नबी काका शेख, दिनेश पाटील, रघुनाथ उजे, प्रभाकर गारे, बाळासाहेब लहांगे, राजू सिद, सोमनाथ भूतांबरे, काळू उजे, शिवराम झोले, सचिन घमे, महिला अध्यक्ष सुनीता चव्हाण यांच्यासह त्र्यंबकेश्वर तालुका व शहर काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. लोकशाहीच्या रक्षणासाठी संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

### अपघाताने फुटले गुटखा तस्करीचे बिंग; निंभोरा पोलिसांची धडक कारवाई



रावेर (स. गांवकरी) : महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांची अपघातग्रस्त कारमधून वाहतूक होत असल्याचा प्रकार निंभोरा पोलिसांनी उघडकीस आणला आहे. या कारवाईत दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, प्रतिबंधित गुटखा व पानमसाल्यासह कार असा एकूण ७ लाख ७० हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधाराचा शोध सुरू आहे. दि. ७ ऑक्टोबर रोजी पहाटे सुमारे ५.४५ वाजता रावेर तालुक्यातील वडगाव फाट्याजवळ एका सिल्व्हर गोल्ड रंगाच्या ह्युंदाई आय-१० कारने सोनालिका कंपनीच्या निळ्या रंगाच्या ट्रॅक्टरला मागून धडक दिली. अपघाताची माहिती मिळताच निंभोरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. यावेळी कारमध्ये महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा व पानमसाला असल्याचा संशय आल्याने पोलिसांनी वाहन ताब्यात घेतले. अपघातस्थळी नागरिकांची गर्दी होऊन वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याने तसेच सुरक्षेच्या दृष्टीने कारचालक व त्याच्यासोबत असलेल्या व्यक्तीला वाहनासह निंभोरा पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्यानंतर पंचांसमक्ष कारची झडती घेतली असता विविध प्रकारचा प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूजन्य पदार्थ आढळून आले.

### माळरानावर मुरूम माफियांचा घाला; प्रशासनाचे दुर्लक्ष?

रावेर (स. गांवकरी) : नायगाव तालुक्यातील अंतरगाव परिसरातील माळरानावर मुरूम माफियांनी कथितपणे मोठ्या प्रमाणात उत्खनन सुरू केल्याने परिसराच्या नैसर्गिक स्वरूपाला धोका निर्माण झाला आहे. मुरूमाच्या उत्खननासाठी माळरानावर मोठमोठे खड्डे पाडण्यात आल्याने जमीन विद्रूप झाली असून, या प्रकाराकडे संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये आहे. माळरान हे गावाच्या पर्यावरणीय समतोलासाठी महत्त्वाचे असताना त्याच ठिकाणी मोठ्या प्रमाणात मुरूम उपसा होत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. उत्खननामुळे पावसाचे पाणी साठवण्याची नैसर्गिक क्षमता कमी होण्याबरोबरच मातीची धूप आणि परिसराच्या पर्यावरणावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, मुरूम उत्खननासाठी आवश्यक परवानग्या आहेत का, उत्खननाचे प्रमाण नियमानुसार आहे का आणि शासनाचा महसूल भरला जात आहे का, याची प्रशासनाने तातडीने तपासणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

### आगामी दुर्गा महोत्सव शांततेत साजरे करा, पोलीस निरीक्षक अशोक जाधव

नवीन नांदेड (स. गांवकरी) : आगामी दुर्गा उत्सव सण शांततेत साजरा करण्यासाठी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन पोलिस निरीक्षक अशोक जाधव यांनी आयोजित आगामी दुर्गा महोत्सव मंडळ निमित्ताने शांतता समितीच्या बैठकीत केले, यावेळी दुर्गा महोत्सव मध्ये महिला व युवती यांना संरक्षण देण्यात येणार असल्याचे असल्याचे सांगून डिजे बंदी असल्याचे सांगितले. आगामी दुर्गा नवरात्र महोत्सव निमित्ताने ग्रामीण पोलीस स्टेशन येथे शांतता समिती , सार्वजनिक दुर्गा मंडळ पदाधिकारी पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी यांची बैठक 8 सप्टेंबर रोजी पोलिस निरीक्षक अशोक जाधव यांच्या उपस्थितीत संपन्न झाली यावेळी आगामी दुर्गा महोत्सव मंडळा संदर्भात सुचना देण्यात आल्या.

## घरफोडीच्या घटनांनी खळबळ; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण!

तामसा : (स. गांवकरी)



हदगाव तालुक्यातील तामसा येथील संभाजीनगर परिसरात घरफोडीची घटना उघडकीस आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ८ ऑक्टोबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी घराचे मुख्य गेट तोडून घरातील साहित्याची नासधूस केली. यावेळी सोन्या-चांदीचे दागिने आणि १० हजार रुपयांची रोकड चोरीला गेल्याची तक्रार शांताबाई बापुराव चंदनवार वय ६५, रा. संभाजीनगर, तामसा यांनी केली आहे. शांताबाई चंदनवार या आपल्या कुटुंबासह तामसा येथील संभाजीनगर परिसरात राहतात. नातीच्या शिक्षणासाठी त्यांची सून आणि नात मागील चार वर्षांपासून नांदेड येथे वास्तव्यास आहेत. त्यांचे पती बापुराव नारायणराव चंदनवार (वय ७२) हे देवदर्शनासाठी बाहेरगावी गेले असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, ८ ऑक्टोबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अंदाजे तीन ते चार अज्ञात व्यक्तींनी घराच्या मुख्य गेटची तोडफोड करून घरात प्रवेश केला. त्यानंतर मुख्य कपाटासह स्वयंपाकघरातील साहित्याची नासधूस केली. घरातील दोन खोल्यांमधील तीन कपाटांतील कपडे बाहेर फेकून देत चोरट्यांनी घरात उचकापाचक केली.

या घटनेत सुनेचा १२ ग्रॅम वजनाचा सोन्याचा नेकलेस, ३ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या कानातील वेल, पाच तोळे चांदीचे जोडवे, पाच तोळे वजनाचा चांदीचा ग्लास आणि १० हजार रुपये रोख रक्कम चोरीला गेल्याचे तक्रारीत म्हटले आहे.तेव्हा कै रवी चंदनवार ग्रामपंचायत सदस्य यांचे हे घर असून सो.शांताबाई चंदनवार यांच्या घराच्या हाकेच्या अंतरावर दयानंद चव्हाण यांच्या ही घरी चोरी झाली दयानंद चव्हाण हे संभाजीनगर या ठिकाणी काही दिवसापूर्वी गेले होते त्यांच्या ही घरी चोरी झाली या ठिकाणी नेमक्या कोणत्या वस्तू गेल्या हे स्पष्ट झाले नाही या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, रात्रीच्या वेळी घरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तेव्हा बीट जमदार व गस्त घालणाऱ्या पोलिस अधिकारी यांच्या विषयी रोष व्यक्त करण्यात येत आहे या प्रकरणातील अज्ञात चोरट्यांचा शोध घेऊन चोरीला गेलेले सोन्या-चांदीचे दागिने आणि रोकड परत मिळवून द्यावी, तसेच संबंधित आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी शांताबाई चंदनवार यांनी तक्रारीद्वारे केली आहे.दरम्यान, या घटनेचा तपास करून परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. या प्रकरणी पोलिसांकडून अधिकृत माहिती मिळाल्यानंतर पुढील तपशील स्पष्ट होऊ शकतील.तेव्हा तामसा पोलिसाना संपर्क साधला असता गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू असल्याचे सांगितले आहे.

## मुखेड तालुक्यात दुष्काळी सवलती लागू करा



मुखेड : (स. गांवकरी)

मुखेड तालुक्याचा समावेश 'ट्रिगर वन'मध्ये (Trigger-1) करून दुष्काळी सवलती तात्काळ लागू कराव्यात, या प्रमुख मागणीसाठी शेतकरी कामगार पक्षातर्फे (शेकाप) तहसीलदार अभयराज नंजुंडे यांना निवेदन दिले. दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी तहसील कार्यालयासमोर भव्य 'बोंम्ब मारो' आंदोलन करण्याचा इशारा शेकापने दिला आहे. तालुक्याचा समावेश 'ट्रिगर वन'मध्ये (Trigger-1) करावा यासाठी २ ऑक्टोबरला शेकापच्या वतीने एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले होते. मात्र, या आंदोलनानंतरही प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष केले. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप उसळला असून, त्याविरोधात आता तीव्र आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागल्याचे शेकापने म्हटले आहे. तहसीलदारांना निवेदन देताना शेकापचे मा.जिल्हा चिटणीस भाई अ‍ॅड. गोविंद पाटील डूमणे, पाळाचे उपसरपंच सुभाष पाटील डूमणे, तालुका चिटणीस राजू पाटील सुरनर, बजरंग पाटील जिगळे, बालाजी आईनवाड आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## ठाण्यात बेघर कुटुंबांना जागेवरच शासकीय योजनांचा लाभ !

ठाणे : (स. गांवकरी)



ठाणे जिल्हा दौऱ्यावर असताना राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी पुलाखाली हलाखीच्या परिस्थितीत राहणाऱ्या बेघर कुटुंबांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. या कुटुंबांची परिस्थिती लक्षात घेऊन त्यांनी आपला ताफा थांबवत संबंधित प्रशासनाला तातडीने मदत करण्याचे निर्देश दिले. त्यांच्या सूचनेनंतर स्थानिक प्रशासनाने या कुटुंबांना शासकीय कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी कार्यवाही सुरू केली. बेघर कुटुंबांना अन्नसुरक्षेचा लाभ मिळावा, यासाठी अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या माध्यमातून रेशन कार्ड आणि मोफत अथवा सवलतीच्या दरात धान्य उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून कुटुंबातील महिला, बालके आणि गरोदर मातांना पोषण आहार, अंगणवाडी सुविधा आणि इतर कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. याशिवाय या कुटुंबांची आरोग्य तपासणी, आधार कार्ड आणि सामाजिक सुरक्षा योजनांशी जोडण्यासाठीही प्रशासनाला निर्देश देण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्य भुकेमुक्त, भीकमुक्त आणि कुपोषणमुक्त करण्याचा संकल्प राज्य अन्न आयोगाने केला असल्याचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी यावेळी सांगितले. समाजातील बेघर आणि गरजू व्यक्तींना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी नागरिकांनीही पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. या प्रक्रियेत कोणतीही अडचण आल्यास थेट राज्य अन्न आयोगाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## डेंग्यूसदृश आजाराने पाच वर्षीय चिमुकलीचा मृत्यू

तामसा : (स. गांवकरी)

हदगाव तालुक्यातील तामसा येथे डेंग्यूसदृश आजारामुळे पाच वर्षे सहा महिन्यांच्या चिमुकलीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना ८ ऑक्टोबर रोजी घडली. जिन्नत सय्यद समीर असे मृत चिमुकलीचे नाव असून, तिच्यावर छत्रपती संभाजीनगर येथे उपचार सुरू होते. या घटनेमुळे तामसा गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. गावातील स्वच्छता, नालेसफाई, कचरा व्यवस्थापन आणि डास प्रतिबंधक उपाययोजनांकडे संबंधित यंत्रणांनी तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

तामसा येथील बिलालनगर परिसरात ऑटो चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे सय्यद समीर हे आपल्या कुटुंबासह वास्तव्यास आहेत. त्यांच्या पाच वर्षे सहा महिन्यांच्या जिन्नत या मुलीला अचानक ताप आल्याने सुरुवातीला तामसा येथे प्राथमिक उपचार करण्यात आले. मात्र, ताप कमी होत नसल्याने तिला पुढील उपचारांसाठी नांदेड येथील मराठवाडा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथेही तिच्या प्रकृतीत अपेक्षित सुधारणा न झाल्याने तिला छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले. मात्र, ८ ऑक्टोबर रोजी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. या घटनेने सय्यद कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### तामसा गावात भीतीचे वातावरण!



यापूर्वीही चिमुकल्याचा मृत्यू झाल्याचा दावा

तामसा गावात डेंग्यूसदृश आजाराचे रुग्ण वाढत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. काही दिवसांपूर्वी प्रभाग क्रमांक पाचमधील कोरे कुटुंबातील चार वर्षीय मुलाचाही अशाच आजाराने मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे. याशिवाय, अनेक पालकांना आपल्या लहान मुलांना उपचारांसाठी नांदेड येथील शासकीय रुग्णालयात तसेच खासगी रुग्णालयांत घेऊन जावे लागत असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.

सय्यद कुटुंबातील नागरिकांच्या म्हणण्यानुसार, तामसा परिसरात डेंग्यूमुळे मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या वाढेल का असा ही प्रश्न निर्माण केला आहे मात्र, या मृत्यूंचे अधिकृत वैद्यकीय निदान आणि डेंग्यूमुळे झालेल्या मृत्यूंची संख्या आरोग्य विभागाने तपासून स्पष्ट करणे आवश्यक आहे. तामसा गावात ताप, हिवताप, डेंग्यू आणि गॅस्ट्रो यांसारख्या आजारांचा प्रादुर्भाव चालू असुन आरोग्य विभागाकडून पुरेशी जनजागृती केली जात नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. आरोग्य कर्मचारी आणि परिचारिका नियमितपणे गावात भेट देत नसल्याचीही तक्रार स्थानिकांकडून केली जात आहे.

डेंग्यूचा प्रसार रोखण्यासाठी नागरिकांना आवश्यक माहिती देणे, तापाच्या रुग्णांचे सर्वेक्षण करणे, संशयित रुग्णांची तपासणी करणे, डासांची उत्पत्तीस्थळे नष्ट करणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे गरजेचे आहे. मात्र, या उपाययोजना प्रभावीपणे राबविल्या जात नसल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

नालेसफाई आणि कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर

तामसा ग्रामपंचायत हद्दीत नालेसफाई नियमित होत नसल्याचा तसेच कचरा वेळेवर उचलला जात नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. साचलेले पाणी आणि अस्वच्छ परिसरामुळे डासांची उत्पत्ती होण्यास पोषक परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे ग्रामपंचायत आणि आरोग्य विभागाने संयुक्तपणे स्वच्छता मोहीम राबवून गावातील संभाव्य डास उत्पत्तीस्थळे तातडीने नष्ट करावीत,आणि

गावातील घनकचरा व्यवस्थापन आणि वित्त आयोगाच्या निधीतून स्वच्छतेसाठी करण्यात येणाऱ्या खर्चाबाबतही नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

## आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा डोंबिवली प्रगती कॉलेजमध्ये उत्साहात संपन्न

ठाणे : कल्याण : (स. गांवकरी)




मुंबई विद्यापीठ क्रीडा समिती, ठाणे विभाग आणि प्रगती महाविद्यालय, डोंबिवली (पूर्व) यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच आमदार रविंद्र चव्हाण आणि छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा मंडळ, डोंबिवली (पूर्व) यांच्या सहकार्याने मुंबई विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन कबड्डी ठाणे विभाग स्पर्धा २०२६-२७ उत्साहात पार पडली. कबड्डी तपस्वी रमेश देवाडीकर कबड्डी प्रशिक्षण केंद्र, नेहरू मैदान, डोंबिवली येथे दि. ५ व ६ ऑक्टोबर रोजी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ठाणे जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमधून पुरुष व महिला गटातील सुमारे ६० ते ६५ संघ आणि ७५० ते ८०० खेळाडूंनी सहभाग घेतला.स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ठाणे जिल्हा आगरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. जगन्नाथ पाटील, जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार विजेत्या श्रीमती सिमरत सतीश गायकवाड, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते श्री. जितेश जोशी, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा मंडळाचे अध्यक्ष मा. नगरसेवक जितेंद्र भोईर, गणेश मंदिर संस्थांचे श्री. निलेश सावंत, संस्थेचे विश्वस्त, विविध मान्यवर तसेच प्रगती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय वानखडे उपस्थित होते. बिर्ला महाविद्यालय, कल्याण संघ विजयी ठरला. एस.एस.टी. महाविद्यालय उल्हासनगर द्वितीय क्रमांक तर डोंबिवलीचा वंदे मातरम् महाविद्यालयाने तृतीय क्रमांक मिळवला असून चतुर्थ क्रमांकाचा मांजरी भिवंडी येथील बी.एन.एन. महाविद्यालयांने मिळवला. महिला गटात विजेता देखील बिर्ला महाविद्यालय कल्याण संघाने बाजी मारली. द्वितीय क्रमांक ज्ञानसाधना कॉलेज, ठाणे तर तृतीय क्रमांकावरसोनूभाऊ बसवंत महाविद्यालय शहापूर यांनी मिळवला ठाणे येथील एन.के.टी. महाविद्यालयाने चतुर्थ श्रेणीत समाधान व्यक्त केले. ठाणे जिल्हा आगरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जगन्नाथ पाटील आणि शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते जितेश जोशी यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी समाजसेवक सुजित नलावडे, शैलेंद्र भोईर, प्रशांत जाधव, माजी कबड्डीपटू रितेश साटम (मुंबई पोलीस), आशिष पाटील, ठाणे पोलीस भूषण देवाडीगा,निलेश सावंत, गौरव माहीमकर, निलेश घाडीगावकर, सतीश मेढेकर,मनोज शिंदे आदी मान्यवर व कबड्डी क्षेत्रातील खेळाडू उपस्थित होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ पाटील यांनी विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाभावना, शिस्त, संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी अशा स्पर्धांचे महत्त्व अधोरेखित केले. ग्रामीण व शहरी भागातील अधिकाधिक होतकरू खेळाडूंना संधी मिळावी आणि त्यांनी ठाणे जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.प्राचार्य डॉ. धनंजय वानखडे यांनी आपल्या मनोगतात कबड्डी तसेच अन्य क्रीडा प्रकारांमध्ये प्रावीण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षण व रोजगाराच्या क्षेत्रात उपलब्ध असलेल्या क्रीडा आरक्षणाबाबत मार्गदर्शन केले. क्रीडेमुळे विद्यार्थ्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारण्याबरोबरच सामाजिक जीवनातही आत्मविश्वास व व्यक्तिमत्त्व विकास होतो, असे त्यांनी सांगितले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अ‍ॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)
कोकण विभागीय कार्यालय : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र, २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



## थोडक्यात पण महत्वाचे



### नांदेड महिला जिल्हाध्यक्ष पदीमिनाक्षी शिंदे यांची निवड

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाचे राज्य संपर्क प्रमुख अनिल धमने पाटील आणि सोशल मिडीया राज्यप्रमुख संजय कुसळकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवळे आहे की, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्य मंत्री एकनाथ भाई शिंदे यांच्या आदेशानुसार व शिवसेनेचे मुख्य सचिव संजय मोरे, खा .डॉ . श्रीकांत शिंदे, प्रशांत पालांडे, यांच्या मागदर्शनाखाली ओबीसी नेते तथा शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाचे प्रदेशाध्यक्ष अँड. डॉ पी बी कुंभार यांच्या नेत्तृत्वाखाली शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभाग नांदेड महिला जिल्हाध्यक्ष पदी मिनाक्षी शिंदे यांची मुंबई येथिल पक्षाचे मुख्य कार्यालय बाळासाहेब भवन येथे नियुक्ती पत्र प्रदेशाध्यक्ष अँड. डॉ पी बी कुंभार यांच्या सही निशी देण्यात आले असून या नियुक्ती पत्रावर वंदनीय हिंदू हृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण याचा आपण सक्रियपणे प्रचार प्रसार कराल व तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्व घटकांना सोबत घेऊन संघटन वाढवून कार्य कराल असा विश्वास व्यक्त करूण आपणास पुढील कार्यास शुभेच्छा देत असा उल्लेख नियुक्ती पत्रात केलेला आहे या नियुक्ती समयी शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाचे राज्य संपर्क प्रमुख अनिल पाटील धमने, सोशल मिडिया राज्य प्रमुख संजय कुसळकर, नांदेड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष राजु श्रीरामवार, नायगाव तालुकाध्यक्ष गुणवंत आदि पदाधिकारी, शिवसैनिकांनी निवनिर्वाचित पदअधिकारी त्यांच्यावर शुभेच्छा चा वर्षाव केला जात आहे.

### सर्वांचे हितचिंतक हितेशजी गायकवाड यांचा वाढदिवस उत्साहात साजरा!



मुंबई (स. गांवकरी) : सर्वसामान्य परिस्थितीतून मेहनतीच्या जोरावर असामान्य कामगिरी करत जनसामान्यांच्या मनात आपले स्थान निर्माण करणारे अभिनेता व समाजसेवक हितेशजी गायकवाड यांचा वाढदिवस माटुंगा येथील भव्य सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शिवसेनेच्या माध्यमातून सामाजिक आणि जनसेवेच्या क्षेत्रात सक्रिय असलेल्या हितेशजी यांनी आपल्या कार्यातून वेगळी ओळख निर्माण केली आहे. शिवसेना वैद्यकीय सहाय्यक मुंबई महानगर प्रमुख, पोलीस मित्र संघटनेचे अध्यक्ष तसेच 'समाजरत्न' आणि 'समाजवैभव' यांसारख्या सन्मानांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. त्यांचा मनमिळाऊ स्वभाव, मितभाषी व्यक्तिमत्त्व, नम्रता आणि सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची वृत्ती यामुळे त्यांचा मोठा चाहतावर्ग आहे. हितेशजी गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्राद्वारे शुभेच्छा देत आशीर्वाद प्रदान केले. तसेच त्यांचे विश्वस्त मंगेशजी चिकटे यांनीही आपल्या शिष्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा पाठवून त्यांच्याप्रती प्रेम व्यक्त केले. सध्या बहुचर्चित मराठी चित्रपट 'माया ममता' मध्ये हितेशजी महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार असल्याने त्यांच्या चाहत्यांमध्ये उत्सुकतेचे वातावरण आहे. समाजसेवा आणि अभिनय या दोन्ही क्षेत्रांत आपला ठसा उमटविण्याचा त्यांचा प्रयत्न कौतुकास्पद ठरत आहे. या वाढदिवस सोहळ्याला चित्रपट निर्माते वाघ साहेब, अभिनेता एम. नटराज, हास्यअभिनेता आशिष सातपुते, गायक अजय अटकाळे, नितीन नाकती, अशोक दसवते, चैतन्य खेडेकर, बिपीन भाई यांच्यासह हितेशजींचे चाहते आणि कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी त्यांना शाल व फेटा घालून सन्मानित केले, तर वाढदिवसाचा केक कापून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. शुभेच्छा, प्रेम आणि सदिच्छांनी भरलेल्या या सोहळ्यात हितेशजी गायकवाड यांच्या पुढील सामाजिक व चित्रपट क्षेत्रातील वाटचालीसाठी सर्वांनी शुभेच्छा दिल्या.

### नवरात्रोत्सवानिमित्त पोलिसांनी वाहतुकीत केले बदल

पुणे (स. गांवकरी) : शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त वाहतूक पोलिसांनी वाहतूक बदल केले आहेत. श्री तांबडी जोगेश्वरी मंदिर, श्री चतु:शृंगी मंदिर, भवानी पेठेतील श्री भवानी माता मंदिर, सारसबाग येथील श्री महालक्ष्मी मंदिर परिसर या भागातील रस्ते वाहतुकीस बंद करण्यात आले आहेत. यामध्ये रविवारपासून (ता. ११) अप्पा बळवंत चौक ते बुधवार चौकापर्यंतचा (हुतात्मा चौक) रस्ता वाहतुकीस बंद करण्यात येणार आहे. बुधवार चौक ते अप्पा बळवंत चौक दरम्यान एकेरी वाहतूक सुरू राहणार आहे. लक्ष्मी रस्त्यावरील गणपती चौक ते श्री तांबडी जोगेश्वरी दरम्यानचा रस्ता वाहतुकीस बंद राहणार आहे. तसेच 'सकाळ' कार्यालयापासून श्री तांबडी जोगेश्वरी मंदिराकडे जाणारा रस्ता अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळून अन्य वाहनांसाठी बंद राहणार आहे. सेनापती बापट रस्त्यावरील श्री चतु:शृंगी मंदिर परिसरात गर्दी झाल्यास सेनापती बापट रस्त्यावरील वाहतूक वेताळबाबा चौकमार्गे दीप बंगला चौक, ओम सुपर मार्केटमार्गे वळविण्यात येणार आहे. तर, भवानी पेठेतील श्री भवानी माता मंदिर परिसरात नेहरू रस्त्याने श्री भवानी माता मंदिराकडे जाणारी वाहतूक बंद करण्यात येणार आहे. गर्दी वाढल्यास नेहरू रस्त्यावरील वाहतुकीत बदल करण्यात येणार आहेत.

## वडपे-पडघा व पडघा-कल्याण रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत अण्णा बनसोडे यांना निवेदन

**धुळीचा त्रास, खड्डे व वाहतूक कोंडीच्या समस्येकडे वेधले लक्ष**

भिवंडी : (स. गांवकरी)

भिवंडी तालुका ग्रामीणमधील वडपे ते पडघा टोलनाका, समृद्धी महामार्ग जंक्शन तसेच पडघा–कल्याण मार्गाची झालेली दुरवस्था, धुळीचा वाढता त्रास आणि सातत्याने निर्माण होणारी वाहतूक कोंडी या गंभीर समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी, भिवंडी तालुका ग्रामीणचे अध्यक्ष दिलशाद सिकंदर शेख यांनी महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष तथा पिंपरी-चिंचवडचे आमदार अण्णा बनसोडे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.



वडपे ते पडघा टोलनाका मार्गावर मोठ्या प्रमाणात धुळीचे साम्राज्य निर्माण झाले असून, समृद्धी महामार्ग जंक्शन परिसरातील रस्त्याचे काम संथगतीने सुरू असल्याने नागरिकांसह दुचाकीस्वारांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून वाहनचालकांच्या सुरक्षिततेवरही परिणाम होत आहे. दरम्यान, पडघा–कल्याण मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने या मार्गाची दुरवस्था झाली आहे. खड्ड्यांमुळे वाहनचालकांना कसरत करावी लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे. या तिन्ही मार्गांवर विशेषतः सायंकाळच्या वेळेत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने नागरिकांना तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, धुळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमित पाणी फवारणीसह आवश्यक उपाययोजना कराव्यात आणि वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी संबंधित यंत्रणांनी प्रभावी नियोजन करावे, अशी मागणी दिलशाद शेख यांनी केली.

## प्रदेशाध्यक्षांच्या कार्यक्रमाला भाजप नगरसेवकांची दांडी

पुणे : (स. गांवकरी)

विधान परिषद निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फोडण्यासाठी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आलेले असताना या महत्त्वाच्या कार्यक्रमाकडे भाजपच्या अनेक नगरसेवकांनी पाठ फिरवली. काही जण आले आणि तोंड दाखवून काही वेळाने निघून गेल्याचे प्रकार घडले आहेत. याची पक्षाने गंभीर नोंद घेतली असून, पक्ष शिस्तीला फाटा देणाऱ्या नगरसेवकांची खरडपट्टी काढली जाणार आहे. पुणे महापालिकेत भाजपचे ११९ निवडून आलेले आहेत. तर स्वीकृत सात असे एकूण १२६ नगरसेवक आहेत. एवढी मोठी ताकद असतानाही पक्ष संघटनेच्या कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे निमंत्रण देऊनही नगरसेवक गैरहजर राहात आहेत.



नगरसेवकांनी या कार्यक्रमांना उपस्थित राहावे, सक्रियपणे सहभाग घ्यावा, पदवीधर निवडणुकीसाठी नगरसेवकांनी नोंदणी करून घ्यावी, अशा सूचना अनेकदा करूनही त्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे पुणे शहरात जास्त नोंदणी झालेली नाही. पुण्यात आज विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीचा शुभारंभ मॉडर्न महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडला. या कार्यक्रमासाठी नगरसेवकांनी उपस्थित राहणे अपेक्षित होते. बरेचसे नगरसेवक या कार्यक्रमाच्या आधी उपस्थित होते. कार्यक्रमाला सुरुवात झाल्यानंतर एक एक करून अनेक नगरसेवक सभागृहातून बाहेर पडण्यास सुरुवात केल्याचे पक्षाच्या नेत्यांच्या निदर्शनास आले.

## महान कलाकार नाना पाटेकर यांच्या माणुसकीला सलाम!

(स. गांवकरी)

चित्रपटसृष्टीत स्वतःच्या अभिनयाच्या जोरावर वेगळी ओळख निर्माण करणे, हे सोपे काम नाही. अभिनेते नाना पाटेकर यांनी आपल्या अफाट प्रतिभेने आणि अष्टपैलू अभिनयाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. त्यांच्या कर्तृत्वाच्या जोरावर त्यांनाही राजेशाही जीवन जगता आले असते, आलिशान सुखसोयींचा उपभोग घेता आला असता; मात्र त्यांनी प्रसिद्धीच्या झगमगाटापेक्षा माणुसकीला अधिक महत्त्व दिले. शेतकऱ्यांच्या वेदना, आत्महत्याग्रस्त कुटुंबांचे दुःख आणि ग्रामीण भागातील लोकांच्या हालअपेष्टा त्यांना अस्वस्थ करत होत्या. त्यामुळे त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन हजारो गरजू शेतकऱ्यांना मदतीचा हात दिला. जवळपास पाच हजार शेतकऱ्यांना मदत केल्याचा उल्लेख त्यांच्या सामाजिक कार्याच्या गौरवासाठी केला जातो. स्वतःच्या खिशातून मदत करून दुःखी माणसांच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्याचा त्यांचा प्रयत्न खऱ्या अर्थाने माणुसकीचे दर्शन घडवणारा आहे.



नानांचे मोठेपण केवळ त्यांच्या चित्रपटांतील भूमिकांमध्ये नाही, तर समाजाप्रती असलेल्या त्यांच्या संवेदनशीलतेत आहे. एका बाजूला चित्रपटसृष्टीतील प्रसिद्धी, पैसा आणि झगमगाट, तर दुसऱ्या बाजूला संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांचे दुःख—या दोन्ही जगांमधील अंतर त्यांनी आपल्या सामाजिक कार्यातून कमी करण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच नाना पाटेकर हे केवळ पडद्यावरील अभिनेते नव्हते, तर प्रत्यक्ष आयुष्यातही अनेकांसाठी आधार ठरले.

## अर्धापूरात छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात प्रमाणपत्र वाटप

अर्धापूर : (स. गांवकरी)

शासनाच्या सेवा संकल्प अभियान २०२६ अंतर्गत तहसील कार्यालय अर्थापूर येथे पुनम पाटील उपविभागीय अधिकारी यांच अध्यक्षतेखालीव तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय विभागांच्या सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यामुळे नागरिकांना शासकीय कामांसाठी विविध कार्यालयांमध्ये जाण्याची आवश्यकता कमी होऊन एकाच ठिकाणी सेवा मिळण्यास मदत झाली. शिबीराच्या अध्यक्षा उपविभागीय अधिकारी पुनम पाटील, तहसीलदार रेणूकादास देवणीकर,तालुका आरोग्य अधिकारी सुनील दासरे, तालुका कृषी अधिकारी विशाल बि-हाडे, साहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर कांबळे, नायब तहसीलदार राजेश शिंदे, वनपाल एस.आर. कवळे, सामाजिक वनीकरण एस.डी.बक्षी,डी. डी.बारेला,बी. जी.शिंदे, एच.बी.सुरवसे,एस. आर कांबळे, एस.आर.कन्ना, एस.पी.नंद आदींची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिरामध्ये महसूल विभागासह पंचायत समिती, नगरपंचायत, भूमी अभिलेख, कृषी, आरोग्य, पशुसंवर्धन, महावितरण, पुरवठा, नोंदणी व मुद्रांक, महिला व बालविकास, शिक्षण आदी विभागांचे स्टॉल उभारण्यात आले होते. शिबिरात प्रलंबित फेरफार नोंदींचा निपटारा, सातबारा व आठ-अ उतारे, स्वामित्व सनद, विविध महसूल प्रमाणपत्रे, विवाह नोंदणी, शिधापत्रिका, मालमत्ता हस्तांतरण, घरगुती वीज जोडणी, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, व महिला शेतकऱ्यांसाठी आवश्यक प्रमाणपत्रे तसेच इतर शासकीय योजनांशी संबंधित सेवांचा लाभ नागरिकांना देण्यात आला. सद्यस्थितीत पाणी टंचाई व चारा टंचाईच्या अनुषंगाने अवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत व जलतारा संधारण बाबत मार्गदर्शन केले तसेच शासनाच्या विविध लोक कल्याणकारी योजनांची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांनी योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन मा उपविभागीय अधिकारी व तहसीलदार अर्धापूर यांच्या वतीने करण्यात आले. या शिबिरास तालुक्यातील सर्व विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.




या शिबिरामुळे नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. शासकीय सेवा अधिक सुलभ, पारदर्शक व लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने सेवा संकल्प अभियान महत्त्वपूर्ण ठरत आहे. यावेळी विविध विभागांचे स्टॉल लावून नागरिकांच्या समस्या सोडविण्यात आल्या व विविध प्रमाणपत्रे देण्यात आली. या शिबिराच्या यशस्वी साठी उपविभागीय अभियंता पंकज देशमुख, सुनील देवकांबळे, पशुसंवर्धन अधिकारी डॉ.दिलीप उदगीरे, उपकृषीअधिकारी जी. पी वाघोळे, नायब तहसीलदार सूर्यकांत ताडेवाड, विस्तार अधिकारी पांडुरंग गर्जे, एस.पी गोखले, मंडळ अधिकारी राजू इंगळे, नवीन रेड्डी, रामदास दुधाटे, तलाठी बि.के वसमतकर, किरण मोरे, उज्वला वानखेडे, रवी पल्लेवाडे, तलाठी घुगे, ग्रामपंचायत अधिकारी, सुरेश पत्रे, संतोष गाडे, शिवकुमार देशमुख, शिक्षण विभागाचे शेख,के.पी खानसोळे आदी कर्मचाऱ्यांनी यावेळी परिश्रम घेतले.

## ३३ वर्षांची प्रदीर्घ पोलीस सेवा! नवाब खान पठाण यांची एएसआय पदी निवड; सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव

- नांदेड जिल्हा पोलीस दलातील कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्याच्या सेवाकार्याची चर्चा
- हिमायतनगर पोलीस स्टेशनअंतर्गत कार्यरत असताना महत्त्वाची कामगिरी

हिमायतनगर : (स. गांवकरी)

नांदेड जिल्हा पोलीस दलात तब्बल ३३ वर्षे प्रदीर्घ सेवा बजावणारे कर्तव्यनिष्ठ आणि धडाडीचे पोलीस अधिकारी नवाब खान पठाण यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (एएसआय) पदावर निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या प्रदीर्घ सेवाकार्याची दखल घेत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सहकारी, मित्रपरिवार आणि हितचिंतकांकडून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.



पोलीस दलात ३३ वर्षे सेवा करणे ही केवळ नोकरी नसून, जनतेच्या सुरक्षेसाठी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी दिलेल्या योगदानाची महत्त्वपूर्ण वाटचाल आहे. या दीर्घ सेवाकाळात पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना विविध आव्हानांना सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत संयम, शिस्त, प्रामाणिकपणा आणि कर्तव्याप्रती निष्ठा या गुणांना विशेष महत्त्व असते.

नवाब खान पठाण यांनी आपल्या प्रदीर्घ पोलीस सेवेतून अनुभवाची शिदोरी जमा केली आहे. हिमायतनगर पोलीस स्टेशनअंतर्गत त्यांच्या सेवाकार्याचा उल्लेख करताना त्यांच्या पुढील कारकिर्दीबद्दल शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत. एएसआय पदावरील निवड ही त्यांच्या सेवाप्रवासातील महत्त्वाची बाब असून, या नव्या जबाबदारीतून त्यांना जनतेची सेवा करण्याची आणखी एक संधी मिळणार आहे.

पोलीस दलातील वरिष्ठ पदावरील जबाबदारी पार पाडताना कायदा व सुव्यवस्था राखणे, नागरिकांच्या तक्रारींची दखल घेणे आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस प्रशासनाचे कामकाज प्रभावीपणे पार पाडणे महत्त्वाचे असते. नवाब खान पठाण यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा या जबाबदाऱ्या पार पाडताना निश्चितच उपयोग होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

३३ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर नवाब खान पठाण यांच्या एएसआय पदावरील निवडीबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील सेवाकार्यासाठी सर्वांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## अध्यक्षपदी ज्ञानेश्वर लिंगमपल्ले यांची निवड

हिमायतनगर : (स. गांवकरी)

तालुक्यातील नवतरुण युवकांमध्ये लोकप्रिय असलेले तसेच सामाजिक व धार्मिक कार्यात नेहमी सक्रिय सहभाग घेणारे ज्ञानेश्वर लिंगमपल्ले यांची बजरंग दल हिमायतनगर तालुका अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीची माहिती समोर येताच हिमायतनगर शहरासह तालुक्यातील युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. हिमायतनगर शहरातील असंख्य नव तरुण युवकांना परिचित असणारे, देव देश,धर्माची जाण असणारे ज्ञानेश्वर लिंगमपल्ले यांनी गेल्या काही काळापासून कावड यात्रा, रामनवमी, हनुमान जन्मोत्सव, रावण दहन, छत्रपती संभाजी महाराज बलिदान मास , सह असंख्य सामाजिक, धार्मिक आणि युवकांच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी होत आले आहेत. युवकांना संघटित करून समाजहिताच्या उपक्रमांना चालना देणे, धार्मिक व सांस्कृतिक परंपरांचे जतन करणे तसेच सामाजिक प्रश्नांबाबत जनजागृती करण्यासाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत हिमायतनगर वाढोणा मंडळाच्या बजरंग दलाच्या तालुका. अध्यक्ष पदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे या निवडीमुळे हिमायतनगर तालुक्यातील बजरंग दलाच्या कार्याला अधिक बळ मिळेल, असा विश्वास तालुक्यातील नव तरुण युवकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. आगामी काळात तालुक्यात युवकांना सोबत घेऊन विविध सामाजिक, धार्मिक आणि जनजागृतीपर उपक्रम राबविण्याचा मानस असल्याचेही यावेळी सांगण्यात आले ज्ञानेश्वर लिंगमपल्ले यांच्या निवडीबद्दल हिमायतनगर शहरासह तालुक्यातील हजारो नवतरुण युवक, मित्रपरिवार, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ५ । वर्ष : ४ थे । अंक : २९५ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई...
AVP NEWS
समर्थ गांवकरी NEWS
संपादक : डॉ.विश्वास आनंदराव आरोटे
न्याय, निष्पक्ष आणि निर्भीड पत्रकारिता... हीच आमची ओळख!
बातम्या, जाहिराती व सदस्यता साठी संपर्क साधा.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासून २००० के व्ही ए
जनरेटर विक्री | दुरुस्ती व देखभाल | तज्ज्ञ तंत्रज्ञ | विश्वासार्ह सेवा वेळेत काम
संपर्क
+91-8286562340 / 9004511593
8652653990 / 8286562350
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053, Sector - 5 Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com | Website: www.adarshengineering.net

शनिवार दि. १० ऑक्टोंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# एमपीएससीच्या विद्यार्थ्यांसाठी लवकरच दिलासादायक निर्णय?

## राज ठाकरे यांची मुख्यमंत्र्यांशी चर्चा; फडणवीस सकारात्मक असल्याचा दावा, विद्यार्थ्यांना संयम राखण्याचे आवाहन

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षार्थींच्या मागण्यांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सविस्तर चर्चा झाली असून, येत्या काही दिवसांत विद्यार्थ्यांच्या नोकऱ्यांसंदर्भात चांगली बातमी मिळण्याची अपेक्षा आहे, अशी माहिती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शुक्रवारी दिली. मुख्यमंत्र्यांची भूमिका सकारात्मक असल्याचे जाणवल्याचे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना संयम राखण्याचे आवाहन केले. पुण्यातील एस. एम. जोशी पुलावर एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू असून, शुक्रवारी या आंदोलनाचा नववा दिवस आहे. विद्यार्थ्यांच्या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी राज ठाकरे यांनी ५ ऑक्टोबर रोजी आंदोलनस्थळी भेट दिली होती. त्या वेळी विद्यार्थ्यांच्या रास्त अपेक्षांबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. त्यानुसार फडणवीस यांच्याशी चर्चा झाल्यानंतर राज ठाकरे यांनी समाजमाध्यमांवरील पोस्टद्वारे याबाबतची माहिती दिली.

नोकरीच्या शोधात स्वतःचा जिल्हा, तालुका, घर आणि कुटुंबापासून दूर राहून मेहनत करणाऱ्या तरुण-तरुणींना पाहून मनाला वेदना होतात, असे राज ठाकरे यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत मुख्यमंत्र्यांशी सविस्तर चर्चा केली असून, ते सकारात्मक असल्याचे जाणवल्याचे त्यांनी सांगितले. आगामी काही दिवसांत एमपीएससीच्या विद्यार्थ्यांच्या नोकऱ्यांसंदर्भात दिलासादायक निर्णय होईल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, आंदोलनातील विद्यार्थ्यांच्या मागण्या अद्याप पूर्ण झालेल्या नसल्याने आंदोलन सुरूच आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनीही आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली आहे. त्यामुळे राज ठाकरे आणि मुख्यमंत्र्यांमधील चर्चेनंतर सरकारकडून नेमका कोणता निर्णय घेतला जातो, याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.




# सुनेत्रा पवारांविरोधात भूमिका घेणाऱ्या सदस्यांची राष्ट्रवादीतून हकालपट्टी

## सोमेश्वर साखर कारखाना निवडणुकीत स्वतंत्र पॅनेल उभारल्याने कारवाई; पुरुषोत्तम जगताप यांच्यासह गटातील सदस्यांना पक्षातून काढले

मुंबई (समर्थ गांवकरी)

श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटापासून वेगळी भूमिका घेत स्वतंत्र पॅनेल उभारणारे कारखान्याचे विद्यमान अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप यांच्यासह त्यांच्या पॅनेलमधील सदस्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बंडखोरांना नाव न घेता इशारा दिल्यानंतर ही कारवाई जाहीर करण्यात आली. त्यामुळे सोमेश्वर कारखान्याच्या निवडणुकीतील राजकीय संघर्षाला नवे वळण मिळाले आहे.

सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत तीन पॅनेल आमनेसामने आले आहेत. अजित पवार गटाचे 'श्री सोमेश्वर विकासपुरुष अजितदादा पवार पॅनेल', 'लोकनेते अजितदादा सोमेश्वर विकास पॅनेल' आणि 'सोमेश्वर शेतकरी विकास पॅनेल' यांच्यात लढत होत आहे. विद्यमान अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप हे अजित पवार यांचे विश्वासू मानले जात होते. मात्र, अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांनी स्वतंत्र पॅनेल उभे केले. या पॅनेलला भाजपचा पाठिंबा असल्याचे समजते.

जगताप यांच्या भूमिकेच्या पार्श्वभूमीवर सुनेत्रा पवार यांनी दोन दिवसांपूर्वी नाव न घेता बंडखोरांना इशारा दिला होता. 'कुठल्याही चुकीच्या अफवेला बळी पडू नका. एकदा बाहेर ते कायमचे बाहेर, एवढे लक्षात ठेवा. दादा खूप मोठ्या मनाचे होते; दादांसारखी मी नाही,' असे त्या म्हणाल्या होत्या. त्यानंतर आता पक्षाने हकालपट्टीची कारवाई जाहीर केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोरेकर, संभाजी होळकर आणि बारामतीचे नगराध्यक्ष सचिन सातव यांच्या उपस्थितीत शुक्रवारी पत्रकार परिषद झाली. या वेळी तालुकाध्यक्ष संदीप बांदल यांनी पक्षाच्या भूमिकेपासून दूर जात स्वतंत्र पॅनेल उभारल्याच्या कारणावरून पुरुषोत्तम जगताप



यांच्यासह त्यांच्या पॅनेलमधील सदस्यांची पक्षातून हकालपट्टी केल्याचे जाहीर केले.

निवडणुकीतील चुरस वाढली

सोमेश्वर कारखान्याच्या निवडणुकीत तीन पॅनेल उतरल्याने आधीच चुरस निर्माण झाली आहे. त्यात विद्यमान अध्यक्ष जगताप यांनी स्वतंत्र पॅनेल उभारल्याने अजित पवार गटासमोर आव्हान उभे राहिले आहे. आता पक्षाने केलेल्या कारवाईचा निवडणुकीतील समीकरणांवर काय परिणाम होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# एसटीच्या जमिनींतून उत्पन्नाचा 'महामार्ग', ९८ वर्षांच्या भाडेपट्ट्याला मंजुरी

**आर्थिक उत्पन्नाचे स्रोत वाढवून एसटी महामंडळाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महामंडळाच्या अतिरिक्त जमिनींचा व्यावसायिक विकास करण्याच्या निर्णयाला राज्य शासनाने मंजुरी दिली आहे.**



मुंबई (समर्थ गांवकरी)

आर्थिक उत्पन्नाचे स्रोत वाढवून एसटी महामंडळाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महामंडळाच्या अतिरिक्त जमिनींचा व्यावसायिक विकास करण्याच्या निर्णयाला राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर या जमिनींचा विकास करता येणार असून, त्यासाठी ४९ अधिक ४९ वर्षे असा एकूण ९८ वर्षांपर्यंतचा भाडेपट्टा करता येईल. राज्यभरात एसटीच्या ताब्यात असलेल्या ८५० ठिकाणांवरील ३ हजार ५०० एकरांहून अधिक जमिनींच्या नियोजनबद्ध विकासातून महामंडळाला मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे.

परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली या प्रक्रियेसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. महामंडळाच्या स्वमालकीच्या जमिनींसह भूसंपादनातून मिळालेल्या, पूर्वीच्या रोड ट्रान्सपोर्ट विभागाकडून हस्तांतरित झालेल्या, भाडेकरारावरील तसेच बक्षीसपत्राद्वारे प्राप्त झालेल्या जमिनींवरही पीपीपी तत्त्वानुसार विकास प्रकल्प राबविता येणार आहेत.

या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी प्रत्येक जागेसाठी स्वतंत्र निविदा काढणे बंधनकारक करण्यात आले आहे. प्रकल्पांची व्यवहार्यता, निविदा प्रक्रिया आणि सवलत करारनाम्याला संबंधित समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे. तसेच प्रत्येक प्रकल्पाच्या अंतिम निविदेला मुख्यमंत्री स्तरावर मंजुरी घेणे आवश्यक असेल. अंतिम टप्प्यात असलेल्या व्यवहार्य प्रकल्पांसाठी महाराष्ट्र सार्वजनिक-खाजगी भागीदारी धोरण, २०२६ अंतर्गत काही सवलती देण्याची तरतूदही करण्यात आली आहे.

जमिनींचा वापर कशासाठी करणार?

एसटी महामंडळाच्या आर्थिक स्थितीचा विचार करून, आगाऊ प्रीमियमसह दीर्घकालीन भाडेपट्ट्याचा पर्याय अधिक फायदेशीर ठरू शकतो, अशी शिफारस सुबोधकुमार समितीने केली होती. त्यानंतर शासनाने भाडेपट्ट्याचा कालावधी ४९ अधिक ४९ वर्षे, म्हणजेच ९८ वर्षांपर्यंत वाढविण्यास मान्यता दिली आहे. मोक्याच्या ठिकाणी असलेल्या जमिनींचा व्यापारी, निवासी, औद्योगिक आणि अन्य व्यावसायिक कारणांसाठी विकास केल्यास महामंडळाला आगाऊ प्रीमियम मिळण्याबरोबरच विकसित व्यावसायिक संकुलांमधील हिस्स्याच्या माध्यमातून नियमित वार्षिक उत्पन्नही मिळू शकते. एसटीच्या जमिनी हा महामंडळाचा मौल्यवान ठेवा असून, त्यांचा वापर दीर्घकालीन आर्थिक सक्षमीकरणासाठी करण्यात येईल, असे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. पारदर्शक निविदा प्रक्रिया आणि योग्य व्यावसायिक नियोजनाच्या माध्यमातून या मालमत्तेतून अधिकाधिक उत्पन्न मिळविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या उत्पन्नाचा उपयोग एसटीची प्रवासी सेवा आणि सेवा-सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# सीएम देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून केलेल्या 'वारी' डॉक्युमेंट्रीचा जागतिक स्तरावर सन्मान

**पंढरपूर आषाढी वारीचा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा जगभरात पोहोचवण्यासाठी निर्मिती करण्यात आलेल्या 'पंढरपूर वारी- इन द फूट स्टेप्स ऑफ द सेंट्स' या डॉक्युमेंट्रीची भारताचा राष्ट्रीय विजेता म्हणून निवड झाली आहे.**

मुंबई (समर्थ गांवकरी)

**महाराष्ट्र:** पंढरपूर आषाढी वारीचा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यासाठी माहिती- जनसंपर्क विभागामार्फत निर्मिती करण्यात आलेल्या 'पंढरपूर वारी- इन द फूट स्टेप्स ऑफ द सेंट्स' या माहितीपटाची प्रतिष्ठित 'एशियन अकॅडमी क्रिएटिव्ह अवॉर्ड्स २०२६'मध्ये 'सर्वोत्कृष्ट ब्रँडेड कार्यक्रम' श्रेणीत भारताचा राष्ट्रीय विजेता म्हणून निवड झाली आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे हे जागतिक पटलावर उमटलेले प्रतिबिंबच आहे.

महाराष्ट्राचे वैभव असलेली पंढरपूर वारीची भक्ती मार्गातली समृद्ध परंपरा जगासमोर आणण्याच्या उद्देशाने या माहितीपटाची निर्मिती करण्यात आली. माहिती- जनसंपर्क विभाग आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कवरी यांनी निर्मिती केलेल्या ह्या माहितीपटाचे डिस्कवरीच्या जगभरातील विविध वाहिन्यांवरुन प्रसारण करण्यात आले आहे.

महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा, वारकरी संप्रदायाचा आणि शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या पंढरपूर वारीचा जागतिक प्रेक्षकांना परिचय करून देण्यासाठी २२ मिनिटांचा इंग्रजी भाषेतील माहितीपट तयार करण्यात आला आहे. संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांनी दिलेला भक्ती, समता, मानवता आणि बंधु भावाचा संदेश भाषेच्या मर्यादा ओलांडून आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर पोहोचवण्याच्या दृष्टीने हा माहितीपट महत्त्वपूर्ण ठरला आहे.

यासंदर्भात प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, पंढरपूर वारी ही भक्तीमार्गातील अतिशय प्राचीन परंपरा असून ती जात, धर्म, गरीब- श्रीमंत असा कोणताही भेद न करता सर्वांना विठुरायाच्या रंगात रंगवून एकत्र आणते. ही महान परंपरा, तिचे उद्दिष्ट आणि विचार जगभरात पोहोचवण्यासाठी माहिती- जनसंपर्क विभागामार्फत 'पंढरपूर वारी- इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' ही सुंदर डॉक्युमेंट्री तयार करून रिलीज करण्यात आली आहे. या डॉक्युमेंट्रीला 'एशियन अकॅडमी क्रिएटिव्ह अवॉर्ड्स २०२६' मध्ये भारत देशासाठीचा 'सर्वोत्कृष्ट ब्रँडेड कार्यक्रम' हा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. यासाठी माहिती- जनसंपर्क विभाग आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी यांचे मी अभिनंदन करतो. वारीची गौरवशाली परंपरा जगासमोर मांडणारी माहितीपट सर्वांनी पाहावा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

# मतदार यादीत नाव नोंदणीसाठी १२ ऑक्टोबरपर्यंतच मुदत

## १० व ११ ऑक्टोबरला राज्यभरात विशेष शिबिरांचे आयोजन!

**नवमतदारांसह ज्या पात्र नागरिकांचे नाव अजूनही मतदार यादीत नाही, त्यांना ही सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यासाठी १० आणि ११ ऑक्टोबर रोजी राज्यातील सर्व मतदान केंद्रांवर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.**

मुंबई (समर्थ गांवकरी)

मुंबई : राज्यात सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत प्रारूप मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, नाव वगळणे किंवा नोंदींमध्ये दुरुस्ती करण्यासाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत १२ ऑक्टोबर २०२६ ही असणार आहे. नवमतदारांसह ज्या पात्र नागरिकांचे नाव अजूनही मतदार यादीत नाही, त्यांना ही सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यासाठी १० आणि ११ ऑक्टोबर रोजी राज्यातील सर्व मतदान केंद्रांवर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या संधीचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घेऊन अंतिम मतदार यादीत आपले नाव निश्चित करावे, असे आवाहन राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

सुमारे ११ लाख अर्ज दाखल

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीनुसार राज्यभरात पुनरीक्षणाचे काम वेगाने सुरू आहे. ८ ऑक्टोबरपर्यंत प्राप्त माहितीनुसार, नवीन नाव नोंदणीसाठी (नमुना-६) तब्बल ७ लाख १९ हजार ३८२ नागरिकांनी अर्ज दाखल केले आहेत. याशिवाय मतदार यादीतील नोंदींमध्ये दुरुस्ती करण्यासाठी (नमुना-८) ३ लाख ९९ हजार ९२५, तर नावे वगळण्यासाठी (नमुना-७) १८ हजार ७४८ अर्ज प्रशासनाकडे प्राप्त झाले आहेत.

नवमतदारांना नाव नोंदणीची शेवटची संधी

१ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकास किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण केलेले नवमतदार आणि पात्र असूनही मतदार यादीत नाव नसलेले नागरिक नमुना-६ भरून आपले नाव नोंदवू शकतात. त्यासाठी आवश्यक ती घोषणापत्रे आणि कागदपत्रे जोडणे अनिवार्य आहे.

अर्ज कसा आणि कुठे करावा ?

नागरिक आपले अर्ज संबंधित मतदार नोंदणी अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी किंवा मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्याकडे प्रत्यक्ष जाऊन सादर करू शकतात. याशिवाय १० व ११ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या विशेष शिबिरांमध्येही हे अर्ज स्वीकारले जातील. ज्यांना घरबसल्या ऑनलाईन अर्ज करायचा आहे, ते भारत निवडणूक आयोगाच्या https://voters.eci.gov.in/ या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन नोंदणी करू शकतात.

नोटीस मिळालेल्या मतदारांसाठी महत्त्वाची सूचना

मागील विशेष सखोल पुनरीक्षणादरम्यान ज्या मतदारांच्या नोंदींमध्ये जुळवणी झालेली नाही (नो मॅपिंग) किंवा तार्किक विसंगती (लॉजिकल डिस्क्रिपन्सी) आढळल्यामुळे ज्यांना नोटिसा मिळाल्या आहेत, अशा




मतदारांनाही या दोन दिवसीय विशेष शिबिरांमध्ये आपली कागदपत्रे सादर करता येतील. निवडणूक आयोगाने दिलेल्या १३ प्रकारच्या कागदपत्रांपैकी एखादे कागदपत्र उपलब्ध नसल्यास अन्य वैध पुरावे सादर करण्याची मुभा देण्यात आली असून, यासाठी बीएलओ पवर (BLO App) 'Any Other Documents' हा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने १२ ऑक्टोबरची अंतिम मुदत लक्षात घेऊन सर्व पात्र मतदारांनी वेळेत अर्ज सादर करावेत आणि विशेष शिबिरांचा लाभ घ्यावा, असे पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे.

# संक्षिप्त

## श्री सप्तशृंगीगडावर खासगी वाहनांना प्रवेशबंदी !

**नाशिक:** नवरात्रोत्सव आणि कोजागिरी पौर्णिमेनिमित्त श्री सप्तशृंगीगडावर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन प्रशासनाने वाहतुकीसंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. नांदुरी ते सप्तशृंगीगड या घाटमार्गावर ठरावीक कालावधीत खासगी वाहनांच्या प्रवेशावर निर्बंध घालण्यात आले आहेत. भाविकांची सुरक्षितता, वाहतूक कोंडी टाळणे आणि घाटमार्गावरील अपघातांचा धोका कमी करणे, हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे. या कालावधीत एसटी बस आणि अत्यावश्यक वाहनांना नियमानुसार प्रवेश दिला जाणार आहे.

सप्तशृंगीगडावर कधी असणार खासगी वाहनांना बंदी ?

नाशिकचे अपर जिल्हा दंडाधिकारी रोहितकुमार राजपूत यांनी यासंदर्भात आदेश जारी केला आहे. त्यानुसार, पुढील कालावधीत नांदुरी ते सप्तशृंगीगड घाटमार्गावर खासगी वाहनांच्या प्रवेशावर निर्बंध लागू राहणार आहेत.

– ८ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर: ८ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजल्यापासून २० ऑक्टोबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंत.

– २५ आणि २६ ऑक्टोबर: २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजल्यापासून २६ ऑक्टोबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंत.

## विंडीजला ७६ धावांचा फटका, पूरनची चूक पडली महागात!

### संजू सॅमसनने केलं संधीचं सोनं

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात दुसरा टी२० सामना रांचीत सुरू आहे. या सामन्यात भारताने नाणेफेकीचा कौल गमावला आणि वाटेला प्रथम फलंदाजी आली. भारताकडून अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन ही जोडी मैदानात उतरली. या जोडीकडून आक्रमक खेळीची अपेक्षा होती. पण मैदान थोडं ओलं असल्याने चेंडू बॅटवर येताना अडचण येत होती. त्यात वेस्ट इंडिजने पहिलं षटकापासून फिरकीला प्राधान्य दिलं. पहिलं षटक अकील होसेनच्या हाती सोपवलं त्यामुळे दोन्ही फलंदाजांना आक्रमक फटकेबाजी करण्यात अडचण आली. त्यात अभिषेक शर्मांने फटकेबाजी केली. पण संजू सॅमसनने थोडा वेळ घेतला. संजू सॅमसनने ४ चेंडूत ६ धावा केल्या होत्या. सामन्यातील पाचवा चेंडू खेळताना संजू सॅमसनने चॅन्स घेण्याचा प्रयत्न केला आणि पॉइंटच्या दिशेने जोरात फटका मारला. खरं तर हा चेंडू थेट पूरनच्या हातात होता. मात्र हा झेल पकडताना चाचपडला आणि झेल सोडला. त्यामुळे संजू सॅमसनला अवघ्या ६ धावा असताना जीवदान मिळालं. या सधीचं त्याने सोनं केलं आणि नंतर जोरदार फटकेबाजी केली. संजू सॅमसन ८२ धावांची खेळी करून बाद झाला, पण विंडिजला ७६ धावांचा फटका बसला.

## पहिल्या षटकात षटकार मारताच अभिषेक शर्माच्या नावावर वर्ल्ड रेकॉर्ड

भारत वेस्ट इंडिज दुसरा टी२० सामना रांचीत सुरू आहे. या सामन्यात मोठी खेळी करण्यात अभिषेक शर्मा अपयशी ठरला. त्याचा खेळ फक्त २० धावांवर आटोपला. पण त्याने एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. अभिषेक शर्माने पहिल्या षटकाच्या सहाव्या चेंडूवर षटकार मारला आणि विश्वविक्रम आपल्या नावावर केला. पहिल्या षटकात सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम त्याने आपल्या नावावर केला. त्याने आपल्या कारकिर्दीत पहिल्या षटकात १४ षटकार मारले. अभिषेक शर्माने या षटकारासह पॉल स्टर्लिंगचा विश्व विक्रम मोडला. त्याने टी२० क्रिकेटमध्ये पहिल्या षटकात १३ षटकार मारण्याच विक्रम केला होता. तसेच या विक्रमाची एविन लुईस याने बरोबरी केली होती. आता संजू सॅमसन त्यांच्या पुढे निघून गेला आहे. अभिषेक शर्माने पहिल्या षटकात षटकार मारून विश्वविक्रम रचला. पण मोठी खेळी करण्यात त्याला अपयश आलं. कारण २० धावा करून तंबूत परतला.

# शेताच्या बांधावर पोहोचले केंद्रीय पथक

## शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकून दुष्काळाच्या झळांची घेतली प्रत्यक्ष अनुभूती

**करपलेली पिके, कोरडे तलाव अन् बंद पडलेले पोल्ट्री फार्म पाहून दुष्काळाचे वास्तव जाणून घेतले; शेतकऱ्यांकडून तातडीच्या मदतीची मागणी**

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

दुष्काळाची तीव्रता केवळ आकडेवारीतून समजत नाही, तर शेताच्या बांधावर उभे राहून शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकल्यानंतरच त्याची खरी दाहकता जाणवते. पावसाअभावी करपलेली पिके, पाण्याअभावी कोरडे पडलेले तलाव आणि दुष्काळाच्या संकटामुळे अडचणीत आलेले शेतीपूरक व्यवसाय... या परिस्थितीचे प्रत्यक्ष चित्र शुक्रवारी केंद्र शासनाच्या आंतरमंत्रालयीन पथकाने अनुभवले. पथकातील अधिकाऱ्यांनी शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांची भेट घेतली, त्यांच्या अडचणी समजून घेतल्या आणि पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकून दुष्काळाची तीव्रता जाणून घेण्याबरोबरच पाणी, चारा आणि आर्थिक मदतीबाबत त्यांच्या अपेक्षाही समजून घेतल्या.

खरीप हंगाम २०२६ मधील दुष्काळसदृश परिस्थिती आणि पीक नुकसानीची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी केंद्र शासनाचे आंतरमंत्रालयीन पथक शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. पथकप्रमुख के. पोन्नुसामी (संचालक, केंद्रीय पीक विभाग) यांच्या नेतृत्वाखाली पथकाने कृषी आयुक्त सुरज मांढरे यांच्या सह चास, निमगाव वाघा, कर्जत तालुक्यातील टाकळी खंडेश्वरी, चिंचोली काळदात, वालवड आणि रेहेकुरी या गावांमध्ये प्रत्यक्ष भेटी देऊन परिस्थितीची पाहणी केली.

**करपलेल्या पिकांतून दुष्काळाची दाहकता स्पष्ट**

पथकाने चास येथे बाजरी, तूर आणि कांदा या पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. विठ्ठल गवळी, पोपट गवळी, भिकाजी सहादू देवकर, अनिल देवकर आणि श्रीपती देवकर या शेतकऱ्यांशी संवाद साधत पिकांची स्थिती आणि शेतीतील अडचणी जाणून घेतल्या. पावसाच्या कमतरतेमुळे पिकांवर झालेला परिणाम आणि अपेक्षित उत्पादन घटल्याने शेतकऱ्यांसमोर उभ्या राहिलेल्या आर्थिक अडचणींची माहिती यावेळी देण्यात आली.

निमगाव वाघा शिवारातील कोरड्या पडलेल्या पाझर तलावाची पाहणी करत पथकाने पाणी उपलब्धतेच्या परिस्थितीचा आढावा घेतला. पावसाअभावी जलस्रोतांवर झालेला परिणाम आणि त्याचा शेतीवर होणारा परिणाम समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**शेतकऱ्यांशी थेट संवाद; पीक नुकसानीची घेतली माहिती**

कर्जत तालुक्यातील टाकळी खंडेश्वरी येथे पथकाने दुष्काळामुळे बाधित झालेल्या बाजरी आणि तूर पिकांची पाहणी केली. यावेळी पांडुरंग चांडे, सागर ढोबळे, बाळासाहेब सपकाळ, नंदलाल, किरण पाटील आणि आबा काळदाते यांच्याशी संवाद साधण्यात आला. पेरणीसाठी केलेला खर्च, पिकांपासून अपेक्षित असलेले उत्पन्न आणि प्रत्यक्ष झालेली हानी याबाबत पथकातील अधिकाऱ्यांनी माहिती घेतली.

चिंचोली काळदात येथे कोरड्या तलावाची पाहणी करताना दादा ढोबे, सरपंच सुधीर फडतरे, राजेंद्र काळदाते, बापूसाहेब काळदाते आणि दत्तात्रय काळदाते यांच्याशी पथकाने संवाद साधला. दुष्काळाच्या झळांमुळे बाधित झालेल्या सीताफळ बागेचीही पाहणी करण्यात आली. पाण्याअभावी बागेचे नुकसान झाल्याने फळबाग लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेल्या अडचणींची माहिती घेण्यात आली. दुष्काळाचा परिणाम केवळ पिकांपुरता मर्यादित न राहता शेतीपूरक व्यवसायांवरही होत असल्याचे यावेळी समोर आले. दुष्काळी परिस्थितीमुळे पोल्ट्री फार्म बंद पडल्याची माहिती शेतकऱ्यांनी पथकाला दिली. तसेच प्रमिला मनोहर लाळगे यांच्या तूर पिकाची पाहणी करून त्यांच्याशी संवाद साधण्यात आला.

**पाणी, चारा आणि मदतीसाठी शेतकऱ्यांची आर्त मागणी**

वालवड येथे पाणीपुरवठ्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विहिरीची पाहणी करून पथकाने पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेची स्थिती जाणून घेतली. त्यानंतर रेहेकुरी शिवारात नारायण सिताराम वाघमोडे यांच्या मका पिकाची शेतात उतरून पाहणी करण्यात आली.





या दौऱ्यात पथकातील अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना पेरणीसाठी किती खर्च झाला, पिके चांगली आली असती तर किती उत्पन्न मिळाले असते, जनावरांसाठी चारा उपलब्ध आहे का, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कशी आहे, दुष्काळामुळे दूध उत्पादनावर काय परिणाम झाला आणि पीक नुकसानीचे पंचनामे झाले आहेत का, असे प्रश्न विचारले. या प्रश्नांच्या माध्यमातून शेतीचे नुकसान, आर्थिक फटका आणि दुष्काळामुळे निर्माण झालेल्या दैनंदिन अडचणींची माहिती घेण्यात आली.

'चारा-पाण्याची स्थिती गंभीर आहे. गावाची वाढलेली लोकसंख्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा पुरवठा वाढवावा आणि शासनाकडून मदतीच्या उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करावी,' अशी मागणी शेतकऱ्यांनी पथकाकडे केली. दुष्काळाच्या परिस्थितीत शेतीचे नुकसान सहन करताना जनावरांच्या चाऱ्याची आणि पिण्याच्या पाण्याची सोय करणेही आव्हानात्मक बनल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

**जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा**

क्षेत्रीय पाहणीपूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात आढावा बैठक झाली. या बैठकीत जिल्ह्यातील पावसाची स्थिती, पीक नुकसान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि दुष्काळाशी संबंधित परिस्थितीबाबत माहिती सादर करण्यात आली.

या दौऱ्यात कृषी आयुक्त सूरज मांढरे, प्रभारी जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, नगरचे प्रांताधिकारी सुधीर पाटील, कर्जतचे प्रांताधिकारी नितीन पाटील, नगर तालुक्याचे तहसीलदार मिलिंद कुलथे, कर्जत तालुक्याचे तहसीलदार रवींद्र सतवण आदी अधिकारी उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांची विचारपूस करणे, प्रत्यक्ष नुकसान झालेल्या पिकांची पाहणी करणे आणि पाणी व चाऱ्याच्या प्रश्नांबाबत माहिती घेणे, या माध्यमातून केंद्रीय पथकाने जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती समजून घेतली. या पाहणीदरम्यान संकलित केलेल्या माहितीच्या आधारे पथक केंद्र शासनाला अहवाल सादर करणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष अनुभवातून समोर आलेल्या समस्या आणि जिल्ह्यातील दुष्काळाचे वास्तव केंद्र शासनापर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे.

# सेवा संकल्प अभियान अंतर्गत आळंदी येथे मियावाकी पद्धतीने ५ हजार रोपांचे वृक्षारोपण

आळंदी (समर्थ गांवकरी)



महाराष्ट्र शासनाच्या सेवा संकल्प अभियान अंतर्गत पर्यावरण संवर्धन, लोकसहभाग आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी सिद्धबेट, आळंदी येथे मियावाकी पद्धतीने ५ हजार रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले.

हा उपक्रम वोडाफोन इंटेलिजंट सोल्युशन्स यांच्या कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (CSR) उपक्रमांतर्गत राबविण्यात आला असून, वोडाफोन आयडिया फाउंडेशन यांनी या उपक्रमाची संकल्पना व अंमलबजावणी केली आहे. तसेच इंडिव्ह कन्सल्टन्सी यांनी अंमलबजावणी भागीदार म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली अशी माहिती माधव खांडेकर मुख्याधिकारी आळंदी नगरपरिषद यांनी दिली.

**मियावाकी वनाची संकल्पना**

सिद्धबेट परिसरात विकसित करण्यात येत असलेले हे मियावाकी वन अल्प जागेत कमी कालावधीत दाट, स्वयंपूर्ण आणि स्थानिक जैवविविधतेने समृद्ध जंगल निर्माण करण्याच्या उद्देशाने उभारले जात आहे. या पद्धतीत स्थानिक वृक्षप्रजातींची दाट लागवड केली जाते, त्यामुळे झाडांची वाढ वेगाने होते आणि काही वर्षांत नैसर्गिक जंगलासारखी समृद्ध वनराई विकसित होण्यास मदत होते.

या वनाचा उद्देश शहरातील हरित क्षेत्र वाढविणे, कार्बन डायऑक्साइड शोषून हवेची गुणवत्ता सुधारणे, पक्षी, फुलपाखरे व इतर जीवांसाठी नैसर्गिक अधिवास निर्माण करणे, शहरी तापमान कमी करणे तसेच ध्वनी व धूळ प्रदूषण कमी करण्यास हातभार लावणे हा आहे. भविष्यात हे वन कमी देखभालीत टिकणारे स्वयंपूर्ण पर्यावरणीय क्षेत्र म्हणून विकसित होणार आहे.

**लोकसहभागातून साकारलेला उपक्रम**

या महत्त्वपूर्ण सीएसआर उपक्रमासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी हितेश वधवानी यांनी विशेष पुढाकार घेत समन्वयाची भूमिका पार पाडली. वृक्षारोपण प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी लावलेल्या प्रत्येक रोपाचे नियमित संगोपन करण्याचा संकल्प केला आणि प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे जतन करण्याचे आवाहन केले.

सिद्धबेट, आळंदी येथे विकसित होणारे हे मियावाकी वन भविष्यात शहरासाठी हरित फुफ्फुस (त्रीशशप डींपस) ठरणार असून, स्वच्छ, हरित आणि पर्यावरणपूरक आळंदी घडविण्याच्या दिशेने हा उपक्रम एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.

# सेवा संकल्प अभियानांतर्गत कन्या विद्यालयात भव्य रांगोळी स्पर्धा!

**विद्यार्थिनींनी साकारल्या आकर्षक रांगोळ्या; इंद्रायणी पाचपुते यांनी केले कलागुणांचे कौतुक**

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' श्रीगोंदा शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या श्रीमंत राजमाता विजयराजे शिंदे कन्या विद्यालय व महादजी शिंदे विद्यालय येथे विद्यार्थिनींसाठी भव्य रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थिनींनी विविध विषयांवर आकर्षक रांगोळ्या साकारत आपल्या कलात्मक कौशल्याचे दर्शन घडविले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परिक्रमा इन्स्टिट्यूटचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) तथा युवा नेते प्रतापसिंह बबनराव पाचपुते यांच्या पत्नी व परिक्रमा इन्स्टिट्यूटच्या संचालिका सौ. इंद्रायणी प्रतापसिंह पाचपुते उपस्थित होत्या. त्यांच्या उपस्थितीत विद्यार्थिनींच्या कलागुणांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम उत्साहात पार पडला.

रांगोळी ही भारतीय संस्कृती आणि परंपरेचा महत्त्वपूर्ण भाग असून, तिच्या माध्यमातून कल्पकता, सौंदर्यदृष्टी आणि सर्जनशीलतेला अभिव्यक्ती मिळते. या स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थिनींनी विविध रंगांचा सुरेख वापर करत मनमोहक रांगोळ्या साकारल्या. विद्यार्थिनींनी सादर केलेल्या या कलाकृतींचे इंद्रायणी पाचपुते यांनी विशेष कौतुक केले. तसेच विद्यार्थिनींना त्यांच्या कलागुणांच्या विकासासाठी प्रोत्साहन देत पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

**विद्यार्थिनींच्या कलागुणांना प्रोत्साहन**

शैक्षणिक उपक्रमांसोबतच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या अशा स्पर्धा त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरतात. विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कल्पकतेची चुणूक दाखविली. सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून सेवा, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीची भावना



रुजविण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. विद्यालयाला सदिच्छा भेट दिल्याबद्दल प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने सौ. इंद्रायणी पाचपुते यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

# महाराजा कॉलेजच्या संदेश डफळ व सार्थक काळे यांची ज्युदो स्पर्धेत तृतीय क्रमांकाची कामगिरी

**सोलापूर येथे झालेल्या शालेय विभागीय स्पर्धेत दोन्ही खेळाडूंनी प्रत्येकी दोन सामने जिंकले**



श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

सोलापूर येथे ४ ऑक्टोबर २०२६ रोजी पार पडलेल्या शालेय विभागीय ज्युदो स्पर्धेत श्रीमंत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या संदेश डफळ व सार्थक काळे या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला. दोन्ही खेळाडूंनी आपापल्या वजन गटांत प्रत्येकी दोन सामने जिंकत यश संपादन केले.या स्पर्धेत संदेश डफळ याने ७३ किलो वजन गटात, तर सार्थक काळे याने ९० किलो वजन गटात सहभाग घेतला. दोघांनीही प्रतिस्पर्ध्यांवर मात करत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले आणि विभागीय स्तरावर तृतीय क्रमांक मिळवून महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात भर घातली.

या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष माजी मंत्री बबनराव पाचपुते, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य बाबासाहेब भोस, माजी आमदार राहुल जगताप, सदस्य महावीर पटवा, क्रीडा समितीचे अध्यक्ष सचिन जामदार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, वरिष्ठ उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. श्रीकांत थोरात, पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे, विविध विभागांचे प्रमुख, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या खेळाडूंना क्रीडा शिक्षक संजय डफळ, क्रीडा संचालिका कल्पना बागुल आणि प्रशिक्षक आदित्य धोपावकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# महिलांच्या कलागुणांना व्यासपीठ देण्यासाठी हेमांगी प्रशांत ओगले यांचा पुढाकार

## सखी सन्मती फाउंडेशनतर्फे १४ ऑक्टोबरला श्रीगोंद्यात भव्य दिव्य दांडिया स्पर्धा; विजेत्यांना १० हजार १ रुपयांचे प्रथम पारितोषिक

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

महिलांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, त्यांच्या आत्मविश्वासाला नवी उभारी मिळावी आणि पारंपरिक संस्कृतीचे जतन व्हावे, या उद्देशाने सखी सन्मती फाउंडेशनच्या संस्थापिका हेमांगी प्रशांत ओगले यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या संकल्पनेतून बुधवार, दि. १४ ऑक्टोबर २०२६ रोजी श्रीगोंदा शहरात भव्य दिव्य दांडिया स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. नवरात्रोत्सवाच्या उत्साहात रंगणाऱ्या या सांस्कृतिक सोहळ्यामुळे महिला आणि युवतींना आपले नृत्यकौशल्य, कलात्मकता आणि सर्जनशीलता सादर करण्याची संधी मिळणार आहे.

महिलांना केवळ मनोरंजनापुरते मर्यादित न ठेवता, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणारे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या हेतूने हेमांगी ओगले यांनी हा उपक्रम हाती घेतला आहे. पारंपरिक गरबा आणि दांडियाच्या माध्यमातून सांस्कृतिक परंपरेचा जागर करतानाच महिलांच्या सहभागाला प्राधान्य देण्याचा प्रयत्न या स्पर्धेतून केला जाणार आहे.

**अभिनेत्री रेवती लेले यांची प्रमुख उपस्थिती**

या स्पर्धेचे प्रमुख आकर्षण अभिनेत्री रेवती लेले यांची उपस्थिती असणार आहे. श्रीगोंद्यातील नक्षत्र लॉन्स येथे सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत हा कार्यक्रम रंगणार आहे. आकर्षक रोषणाई, पारंपरिक वेशभूषा, तालबद्ध नृत्य आणि दांडियाच्या उत्साहातून श्रीगोंद्यात सांस्कृतिक पर्वणी अनुभवायला मिळणार आहे.

**प्रथम क्रमांकासाठी १० हजार १ रुपयांचे पारितोषिक**

स्पर्धकांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजकांनी आकर्षक बक्षिसांची घोषणा केली आहे. प्रथम क्रमांकाच्या विजेत्याला १० हजार १ रुपये व आकर्षक चषक, द्वितीय क्रमांकासाठी ७ हजार १ रुपये व चषक, तर तृतीय क्रमांकासाठी ५ हजार १ रुपये व आकर्षक चषक देण्यात येणार आहे. तसेच सर्व सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला फाउंडेशन च्या वतीने भेटवस्तू देण्यात येणार आहे.

याशिवाय सर्वोत्तम गरबा नृत्य (वैयक्तिक व समूह), सर्वोत्तम पोशाख आणि प्रत्येक महिलेसाठी आकर्षक बक्षीस अशा विविध श्रेणींमधून सहभागी महिलांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. त्यामुळे स्पर्धेत केवळ नृत्यकौशल्यच नव्हे, तर पारंपरिक वेशभूषा आणि सादरीकरणातील वेगळेपणही महत्त्वाचे ठरणार आहे.

**महिलांच्या सहभागातून सांस्कृतिक चळवळीला बळ**

आजच्या बदलत्या काळात महिलांना स्वतःची कला सादर करण्यासाठी संधी आणि प्रोत्साहन मिळणे आवश्यक आहे.




याच विचारातून हेमांगी प्रशांत ओगले यांनी सखी सन्मती फाउंडेशनच्या माध्यमातून या दांडिया स्पर्धेचे आयोजन केले आहे. महिलांचा उत्स्फूर्त सहभाग, सांस्कृतिक परंपरेची जपणूक आणि सामाजिक एकोपा या तीन बाबींना या उपक्रमातून चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

**नावनोंदणीसाठी संपर्क साधण्याचे आवाहन**

या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महिला व युवतींनी तसेच अधिक माहिती जाणून घेण्यासाठी ८०१०३५०५३१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजक हेमांगी प्रशांत ओगले यांनी केले आहे. श्रीगोंदा शहरासह परिसरातील दांडियाप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या सांस्कृतिक सोहळ्याला प्रतिसाद द्यावा, असेही आवाहन सखी सन्मती फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

**अगस्ति सहकारी साखर कारखाना लि, अगस्तिनगर**
**ता. अकोले, जि. अहिल्यानगर, पिन ४२२६०१**
फोन नं. २२२७१४, २२२७७५ ईमेल – agastisakhar@rediffmail.com

**हंगामी कामगारांसाठी जाहिर नोटीस**

आपले अगस्ति कारखान्याच्या सन २०२६–२७ चा गळीत हंगाम १५ ऑक्टोबरचे दरम्यान सुरु होणार आहे. तरी मागील वर्षाचा हंगाम संपलेमुळे सेवामुक्त करण्यात आलेल्या हंगामी कामगारांनी त्यांचे संपुर्ण नांव, पत्ता व मागील हंगामात कोणत्या खात्यात काम केले त्याचा खुलासा करुन चालू हंगामात काम करण्यास तयार असल्याबाबतची माहिती कारखान्याच्या टाईम ऑफिसमध्ये समक्ष अगर रजिस्टर पोस्टाने दि. १५/१०/२०२६ पर्यंत अगर तत्पूर्वी नोंदवावी.

जे कामगार माहिती नोंदविणार नाहीत व माहिती नोंदवूनही काम सुरु झालेल्या तारखेस कामावर हजर होणार नाहीत त्यांनी स्वखुषीने आपला नोकरीवरील हक्क सोडला असे समजून त्यांचे जागी दुसऱ्या कोणत्याही ईसमाची रितसर नेमणुक केली जाईल व त्यानंतर त्याबद्दल कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही, याची संबंधीत कामगारांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

| (सुधीर कापडणीस) | (श्रीमती सुनीतातार्इ भांगरे) | (सिताराम पा. गायकर) |
|---|---|---|
| कार्यकारी संचालक | व्हा. चेअरमन | चेअरमन |

# महाराष्ट्रात ऑक्टोबर हिटचा तडाखा वाढणार

## पावसाची शक्यता कमी

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

राज्यातून मान्सूनने माघार घेतल्यानंतर आता ऑक्टोबर महिन्यात उन्हाचा चटका वाढू लागला आहे. अनेक भागांमध्ये पावसाने उघडीप दिल्याने उष्णता आणि दमट हवामानाचा त्रास जाणवत आहे. येत्या काही दिवसांत राज्यातील बहुतांश भागांत पावसाची शक्यता कमी असून, कमाल तापमानात वाढ होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांना 'ऑक्टोबर हिट'चा सामना करावा लागू शकतो.

**'पावसाची उघडीप, उन्हाचा चटका वाढण्याची शक्यता'**

ऑक्टोबर महिन्यात पावसाळा संपल्यानंतर वातावरणात बदल होऊ लागतो. मात्र, यंदा अनेक भागांत तापमान वाढल्याने दिवसा उन्हाची तीव्रता जाणवत आहे. विशेषतः दुपारच्या वेळी उकाडा वाढत असून, नागरिकांना घराबाहेर पडताना काळजी घ्यावी लागत आहे.

हवामानाच्या अंदाजानुसार, ९ ते ११ ऑक्टोबरदरम्यान महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता कमी आहे. त्यामुळे पुढील काही दिवस कोरडे हवामान राहण्याची शक्यता असून, काही भागांत तापमानाचा पारा चढू शकतो.

**'मुंबईसह कोकणात उष्ण आणि दमट हवामान'**

मुंबई आणि कोकण किनारपट्टीवरील भागांत उष्णतेसोबत दमट हवामानाचाही त्रास जाणवू शकतो. अशा वातावरणात प्रत्यक्ष तापमानापेक्षा अधिक उकाडा जाणवतो. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि दिवसभर उन्हात काम करणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे.

हवामान विभागाने मुंबईसह काही जिल्ह्यांमध्ये उष्णतेबाबत सतर्कतेचा इशारा दिल्याचे वृत्त आहे. त्यामुळे स्थानिक हवामान विभागाच्या सूचनांकडे लक्ष देणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**'विदर्भ आणि मराठवाड्यातही उष्णतेची झळ'**

विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भागांतही कमाल तापमान सरासरीपेक्षा अधिक नोंदवले जात आहे. पावसाचे प्रमाण कमी असलेल्या भागांत वाढत्या उष्णतेमुळे शेती, पाणीपुरवठा आणि दैनंदिन जनजीवनासमोर आव्हाने निर्माण होऊ शकतात. राज्यात सर्वत्र एकसारखे हवामान राहणार नसल्याने जिल्हानिहाय अंदाज तपासणे आवश्यक आहे.

**नागरिकांनी काय काळजी घ्यावी?**

वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी दुपारच्या कडक उन्हात अनावश्यक बाहेर जाणे टाळावे. पुरेसे पाणी प्यावे, हलके कपडे वापरावेत आणि उन्हात काम करताना वेळोवेळी सावलीत विश्रांती घ्यावी. चक्कर येणे, अशक्तपणा किंवा उष्णतेचा त्रास जाणवल्यास त्वरित वैद्यकीय मदत घ्यावी.

**पुढील काही दिवस हवामान कसे राहणार?**

राज्यातील अनेक भागांत पावसाची शक्यता कमी असल्याने ऑक्टोबर हिटचा प्रभाव कायम राहण्याची शक्यता आहे. मात्र, काही जिल्ह्यांमध्ये स्थानिक हवामान परिस्थितीनुसार पावसाच्या सरी पडू शकतात. त्यामुळे पाऊस पूर्णपणे थांबेल, असा निष्कर्ष काढण्याऐवजी हवामान विभागाच्या ताज्या जिल्हानिहाय अंदाजावर लक्ष ठेवणे महत्त्वाचे आहे.

# पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या मीनाक्षी मिश्रा यांना 'अहिल्यानगर मधील सर्वोत्कृष्ट प्राचार्य' पुरस्कार!

संगमनेर (समर्थ गांवकरी)



पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेरच्या प्राचार्या सौ. मीनाक्षी मिश्रा यांना Star Education Awards 2026 अंतर्गत 'The Best Principal in CBSE School – Ahilyanagar' या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी नेस्को सेंटर येथे झालेल्या सोहळ्यात ESFE यांच्या वतीने आणि The Times of India यांच्या सहयोगाने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शैक्षणिक गुणवत्तेला प्राधान्य देणारे नेतृत्व, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न, शिक्षकांना मार्गदर्शन आणि शाळेच्या शैक्षणिक प्रगतीसाठी राबविलेले विविध उपक्रम यांची दखल घेत त्यांना हा सन्मान मिळाला. त्यांच्या नेतृत्वामुळे शिक्षकांना नवी प्रेरणा मिळत असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच व्यक्तिमत्त्व विकासालाही प्रोत्साहन मिळत आहे.

या यशाबद्दल शाळेचे उपप्राचार्य श्री. योगेश आवारी, कार्यालयीन प्रशासक श्री. सागर नेरपगार, मुख्याध्यापिका मयुरा निजामपूरकर, सर्व समन्वयक आणि शिक्षकवृंद यांनी सौ. मीनाक्षी मिश्रा यांचे अभिनंदन केले. या पुरस्कारामुळे पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांच्या यशाचे शैक्षणिक क्षेत्रातून कौतुक होत आहे.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### सह्याद्री व्हॅली कॉलेजमध्ये विद्यार्थी सहभाग परिसंवाद स्पर्धेचे भव्य आयोजन



आळेफाटा (समर्थ गांवकरी)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत, महारिया चॅरिटेबल ट्रस्ट संचलित सह्याद्री व्हॅली कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, राजुरी–पुणे येथे दोन दिवसीय 'भव्य विद्यार्थी सहभाग परिसंवाद (सेमिनार) स्पर्धा २०२६–२७' चे उत्साहात आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली, ही स्पर्धा ८ व ९ ऑक्टोबर २०२६ दरम्यान पार पडली. या प्रसंगी महारिया चॅरिटेबल ट्रस्टचे खजिनदार मा. श्री. सचिन चव्हाण, प्राचार्य मा. प्रा. डॉ. संजय झोपे व उपप्राचार्य मा. प्रा. पी. बालारामडू यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे संयोजन संगणक अभियांत्रिकी विभाग प्रमुख प्रा. तेजस नलावडे आणि प्रा. वैभव नांगरे यांनी केले आहे. स्पर्धेत 'शाश्वत विकास', 'महिला सुरक्षा', 'करिअरची ब्लू प्रिंट' आणि 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' यांसारख्या ६ महत्त्वपूर्ण विषयांवर विद्यार्थी आपले सादरीकरण करत आहेत. उत्कृष्ट सादरीकरणासाठी प्रथम ₹३,०००, द्वितीय ₹२,००० आणि तृतीय ₹१,००० ची रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत. प्रसंगी प्रमुख अतिथी प्रा. डॉ. रतिलाल रामचंद्र बाबेल (अध्यक्ष – जुन्नर तालुका विज्ञान अध्यापक संघ) आजच्या या तंत्रज्ञानाच्या युगात केवळ पुस्तकी ज्ञान मिळवणे पुरेसे नाही, तर आपल्यात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन आपल्या भाषणातून व्यक्त केले. प्रा. डॉ. केशव नामदेव बोरकर (कवी, निवेदक, व्याख्याते व सॉफ्ट स्कील ट्रेनर)यांनी आपल्या भाषणातून तांत्रिक शिक्षणासोबतच 'सॉफ्ट स्कील्स' , प्रभावी संवादकौशल्य आणि सकारात्मक विचारसरणी हीच तुमच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख निर्माण करते. तसेच आपले व्यक्तिमत्त्व विकास कसा करावा ह्या बद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रमुख पाहुणे आणि परीक्षक यांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ पार पडला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. दिव्या रहाणे, प्रा.पूजा बोरचटे,प्रा.हांडे यांनी मानले.

### राज्यातील १,०५८ आश्रमशाळांमध्ये एकाच दिवशी पट पडताळणी

मुंबई (समर्थ गांवकरी)

आदिवासी विकास विभागाच्या वतीने राज्यातील शासकीय व अनुदानित अशा एकूण १,०५८ आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या पटसंख्येची अचूकता तपासण्यासाठी एकाच दिवशी विशेष पटपडताळणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ५०० शासकीय आणि ५५८ अनुदानित आश्रमशाळांचा समावेश होता. आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती आणि शालेय अभिलेखांतील नोंदी यांची पडताळणी करण्यासाठी आदिवासी विकास आयुक्तालयामार्फत या मोहिमेचे नियोजन करण्यात आले होते. आदिवासी विकास आयुक्त लीना बनसोड यांनी ३० सप्टेंबर २०२६ अखेरच्या विद्यार्थी पटसंख्येच्या अनुषंगाने विशेष पटपडताळणी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अपर आयुक्त आणि प्रकल्प अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील आश्रमशाळांची तपासणी करण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली होती. पटपडताळणीदरम्यान प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांची वर्गनिहाय व तुकडीनिहाय स्वतंत्र मोजणी करण्यात आली. तसेच, संबंधित विद्यार्थ्यांचे नाव शाळेच्या जनरल रजिस्टरमध्ये नोंदविले असल्याची खात्री करण्यात आली. मोजणीच्या वेळी प्रत्येक विद्यार्थ्याला उभे करून त्याचे पूर्ण नाव विचारण्यात आले. त्यानंतर वर्गहजेरीमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदवून शालेय नोंदवहीतील माहिती आणि प्रत्यक्ष उपस्थिती यांची पडताळणी करण्यात आली. ही प्रक्रिया शिक्षक व संबंधित कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पूर्ण करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला सर्वोच्च प्राधान्य

आश्रमशाळांमधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला सर्वोच्च प्राधान्य आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण आणि आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांची अचूक पटसंख्या व प्रत्यक्ष उपस्थिती निश्चित करणे महत्वाचे आहे.

# पिंपळगाव नाकविंदा येथे महालक्ष्मी माता नवरात्रोत्सवाचे आयोजन

राजूर (समर्थ गांवकरी)



अकोले तालुक्यातील पिंपळगाव नाकविंदा येथे श्री विठ्ठल मंदिर देवस्थान ट्रस्ट आयोजित श्री महालक्ष्मी माता नवरात्र उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वधर्मानुरागी भाविकांना कळविण्यात अत्यानंद होतो की सालाबाद प्रमाणे याही वर्षी प्रभू श्रीराम चंद्राच्या दंडकारण्यामध्ये महर्षी अगस्ती मुनी,राजा हरिश्चंद्र व छत्रपती शिवाजी महाराज आणि महालक्ष्मी माता यांच्या कृपा आशीर्वादाने परिसरातील सर्व भाविकांच्या सहकार्याने शारदीय नवरात्र उत्सव आयोजित केला आहे.दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक भक्त महालक्ष्मी माता नवरात्र उत्सव निमित्त दर्शनासाठी येत असतात. सकाळी चार ते सहा काकडा,सकाळी पाच ते सहा अभिषेक आरती तसेच सायंकाळी सहा ते सात हरिपाठचे आयोजन करण्यात येत असते. त्यानंतर सायंकाळी सात ते नऊ हरिकिर्तन व नंतर सर्व भाविकांना महाप्रसादाचा लाभ देण्यात येईल.

नवरात्रोत्सवा निमित्त

रविवार दिनांक.११/१०/२०२६ रोजी.ह.भ.प. ऋतुजाताई बगनर पिंपळगाव नाकविंदा,सोमवार दि.१२/१०/२०२६ ह.भ.प.पूजाताई कोंढार मवेशी,मंगळवार दि.१३/१०/२०२६ रोजी. ह.भ.प.विवेक महाराज केदार टाहाकारी ,बुधवार दि.१४/१०/२०२६ रोजी.ह.भ.प.प्रतिक्षा ताई जाधव शिर्डी,गुरुवार दि.१५/१०/२०२६ रोजी ह.भ.प.गिताताई घोरवडकर सिन्नर,शुक्रवार दि.१६/१०/२०२६ रोजी ह.भ.प.योगेश महाराज धात्रक त्र्यंबकेश्वर,शनिवार दि.१७/१०/२०२६ रोजी ह.भ.प.जयश्रीताई गावंडे नाशिक,रविवार दि.१८/१०/२०२६ रोजी ह.भ.प.डांगे महाराज शास्त्री आळंदी यांचे हरि किर्तन होईल,त्यानंतर सोमवार दिनांक.१९/१०/२०२६ रोजी ह.भ.प.दिनानाथ महाराज सावंत सटाणा यांचे काल्याचे कीर्तन होईल.तरी सर्व पिंपळगाव नाकविंदा येथील ग्रामस्थ तसेच महिलांनी उपस्थित रहावे,असे आवाहन श्री विठ्ठल मंदिर देवस्थान ट्रस्ट तसेच समस्थ ग्रामस्थ यांच्या वतीने करण्यात येत आहे. महालक्ष्मी पुजारी तसेच सर्व किर्तन सौजन्य तसेच अन्नदाते.मृदुंगमणी,विणेकरी, काकडा नियोजन, हार्मोनियम वादक,वारकरी व किर्तन भोजन व्यवस्था,पुष्पहार शाल सौजन्य,तसेच गायक चोपदार भालदार,हरिपाठ नियोजन आचारी,देवी पातळ सौजन्य,मंडप लाईट सौजन्य सर्वांचे सर्वत्र भरभरून कौतुक होत आहे.

# पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांची आ. विक्रम पाचपुते यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

## श्रीगोंदा–नगर मतदारसंघातील कायदा व सुव्यवस्थेसह नागरिकांच्या सुरक्षेबाबत चर्चा

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)



अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. मुम्मका सुदर्शन यांनी काष्टी येथील आमदार ड. विक्रमदादा बबनराव पाचपुते यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी आमदार पाचपुते यांनी पोलीस अधीक्षक सुदर्शन यांचे स्वागत करून श्रीगोंदा–नगर विधानसभा मतदारसंघातील विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली.

या भेटीदरम्यान मतदारसंघातील कायदा व सुव्यवस्था, नागरिकांची सुरक्षितता तसेच विविध भागांतील सद्यस्थिती याबाबत आढावा घेण्यात आला. नागरिकांना सुरक्षित आणि भयमुक्त वातावरण मिळावे, यासाठी पोलिसांकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबतही चर्चा झाली.

मतदारसंघातील संवेदनशील भागांमधील परिस्थिती, नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना आणि पोलिस प्रशासनाने अधिक प्रभावीपणे काम करण्याच्या अनुषंगाने विविध मुद्द्यांवर यावेळी विचारविनिमय झाला.

नागरिकांची सुरक्षितता ही आपली सर्वोच्च प्राथमिकता असून, मतदारसंघातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम ठेवण्यासाठी प्रशासनासोबत सातत्याने समन्वय साधला जाईल, असे आमदार ड. विक्रम पाचपुते यांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्यासोबत झालेला हा संवाद सकारात्मक राहिला असून, नागरिकांच्या प्रश्नांवर आणि सुरक्षेशी संबंधित बाबींवर पुढील काळातही समन्वयाने काम करण्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# अहिल्यानगर जिल्हास्तरीय जूनियर व सब जूनियर सिनियर नेटबॉल क्रीडा स्पर्धाचे आयोजन

राजूर (समर्थ गांवकरी)

अमॅच्युअर नेटबॉल स्पोर्ट असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेने व अहिल्यानगर जिल्हा हौशी नेटबॉल असोसिएशन अकोले यांच्या वतीने आगामी होणारी सब ज्युनियर/ जूनियर/ सिनियर जिल्हास्तरीय नेटबॉल स्पर्धा यांचे आयोजन करण्यात येणार आहे तरी महाराष्ट्र एमेच्योर नेटबॉल स्पोर्ट असोसिएशन ऑफ महाराष्ट्र चे महासचिव ऋतुराज यादव सर यांनी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा घेण्याचे आवाहन केले आहे . जिल्हास्तरीय क्रीडा या स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्ह्याच्या सब ज्युनियर/ज्युनियर/व सिनियर मुले / मुली सहभागी होणार आहे

या स्पर्धेची दिनांक ११ ऑक्टोबर २०२६ (रविवार ) अगस्ती कॉलेज अकोले पटांगणावर सकाळी ९ ते ११ च्या दरम्यान स्पर्धा होईल.

स्पर्धे मध्ये येताना सोबत आधार कार्डची झेरॉक्स ३ फोटो तसेच डिस्ट्रिक्ट रजिस्टर नंबर घेऊन यावे

या स्पर्धेसाठी जास्तीत जास्त खेळाडूंनी जिल्हा स्पर्धेकरीता प्रत्येक तालुक्याचा चा संघ घेऊन उपस्थित रहावे

असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष प्रदीप भोंडे उपाध्यक्ष अनिकेत जाधव व सचिव योगेश उगले यांनी केले आहे.

यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट स्पर्धा व उत्कृष्ट खेळाडूची निवड केली जाणार आहे .

**अधिक माहितीसाठी**
**पंकज धुमाळ ९६६५०१९१६९**
**ओम बाणाइत ९४२१५५२७८९**

# वाढदिवसाचा आनंद अंध–दिव्यांग बांधवांसोबत प्रथमेश आव्हाड यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीमती अश्विनी आव्हाड यांचा सामाजिक उपक्रम

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)



वाढदिवसाचा आनंद केवळ स्वतः पुरता मर्यादित न ठेवता तो गरजू व दिव्यांग बांधवांसोबत साजरा करण्याच्या उद्देशाने श्रीमती अश्विनी आव्हाड यांनी आपला मुलगा प्रथमेश आव्हाड यांच्या वाढदिवसानिमित्त अंध व दिव्यांग बांधवांना मिठाईचे वाटप केले. यावेळी अंधोजन मंडळाचे संभाजी भोर व उपस्थित मान्यवरांच्या उपस्थितीत हा उपक्रम पार पडला.

यावेळी श्रीमती अश्विनी आव्हाड म्हणाल्या, वाढदिवस हा प्रत्येकाच्या आयुष्यातील आनंदाचा दिवस असतो. हा आनंद गरजू आणि अंध–दिव्यांग बांधवांसोबत वाटून घेतल्याने या दिवसाचे समाधान अधिक वाढते. समाजातील गरजू घटकांसाठी आपल्या परीने काहीतरी करण्याची भावना प्रत्येकाने जपली पाहिजे.

अंधोजन मंडळाचे संभाजी भोर म्हणाले, अंध व दिव्यांग बांधवांसोबत वाढदिवसाचा आनंद साजरा करून श्रीमती अश्विनी आव्हाड यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे. अशा उपक्रमांमुळे दिव्यांग बांधवांना आधार आणि आपुलकीची भावना मिळते. समाजातील प्रत्येक घटकाने अशा प्रकारे संवेदनशीलता जपत गरजूंच्या आनंदात सहभागी व्हावे.

सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून अंध व दिव्यांग बांधवांसोबत आनंदाचे क्षण साजरे करण्यात आले. मिठाईचे वाटप होताच लाभार्थींच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. समाजातील गरजू घटकांच्या सुख–दुःखात सहभागी होऊन त्यांच्यासोबत आनंद वाटून घेण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# मातीच्या भांड्यांच्या कार्यशाळेतून विद्यार्थ्यांनी अनुभवले पारंपरिक कलेचे सौंदर्य!

## जवाहर नवोदय विद्यालयात कौशल्यविकास उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पारनेर (समर्थ गांवकरी)

भारतीय संस्कृतीतील पारंपरिक कलांचे जतन, विद्यार्थ्यांमध्ये हस्तकौशल्याचा विकास आणि श्रमप्रतिष्ठेची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने जवाहर नवोदय विद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे मातीची भांडी बनविण्याच्या पारंपरिक कौशल्यविकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी मातीची भांडी तयार करण्याचा आनंद घेतला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

विद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात आयोजित या कार्यशाळेचे उद्घाटन विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती श्वेता मुन्नरवार यांच्या हस्ते झाले. यावेळी पारंपरिक कुंभारकामाचे प्रात्यक्षिक सादर करण्यासाठी उपस्थित असलेले कुंभार श्री. राहुल मारुती ओव्हाळे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यशाळेदरम्यान श्री. ओव्हाळे यांनी विद्यार्थ्यांना मातीची निवड, माती मळण्याची पद्धत, मातीला योग्य आकार देण्याचे तंत्र आणि विविध प्रकारची मातीची भांडी तयार करण्याची प्रक्रिया याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे कुंभारकामातील बारकावे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वतः माती हाताळून विविध आकारांच्या वस्तू तयार करण्याचा प्रयत्न केला. पारंपरिक कलेचा प्रत्यक्ष अनुभव घेताना विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्सुकता दिसून आली.

पुस्तकी ज्ञानासोबत प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण

आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात पारंपरिक व्यवसायांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, तसेच त्यांच्यात सर्जनशीलता, संयम, निरीक्षणक्षमता आणि व्यावहारिक कौशल्ये विकसित व्हावीत, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.





कुंभारकामाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय लोककलेची ओळख झालीच; शिवाय कोणत्याही व्यवसायामागे असलेले परिश्रम, कौशल्य आणि अनुभव यांचे महत्त्वही समजले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील अनुभवाधारित शिक्षण आणि व्यावसायिक कौशल्यविकासाच्या संकल्पनेशी सुसंगत असलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याची संधी मिळाली. पारंपरिक कारागिरांच्या कौशल्याचा सन्मान करणे आणि नव्या पिढीला भारतीय ज्ञानपरंपरेची ओळख करून देणे, या दृष्टीनेही ही कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरली.

या कार्यशाळेचे प्रभारी शिक्षक म्हणून टीजीटी (इंग्रजी) श्री. पांडुरंग पवार आणि टीजीटी (मराठी) श्री. यू. जी. सोनपारखे यांनी नियोजन व आयोजनाची जबाबदारी पार पाडली. विद्यालयातील श्री. राजाराम फंड, श्री. विजय भोंडवे, सुश्री ममता, श्री. एम. एम. चौधरी, श्रीमती भाग्यरेखा तसेच इतर शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपक्रमाच्या यशस्वितेसाठी सहकार्य केले.

पारंपरिक कला आणि आधुनिक शिक्षण यांची सांगड घालणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आनंदासोबतच नवा अनुभव आणि व्यावहारिक ज्ञान मिळाले. अशा कौशल्यविकास कार्यशाळांमधून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

# अहिल्यानगर परीसरात दुष्काळाची धग, विविध पाहणीसाठी केंद्राचं पथक थेट बांधावर

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश्य परिस्थितीची केंद्र शासनाकडून गांभीर्याने दखल घेण्यात आली असून, दुष्काळाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्र शासनाचे पथक शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहे. पथकाकडून जिल्ह्यातील विविध भागांना प्रत्यक्ष भेटी देऊन दुष्काळी परिस्थिती, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, शेतीवरील परिणाम तसेच आवश्यक उपाययोजनांची पाहणी करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीची वस्तुस्थिती केंद्र शासनाच्या पथकाला प्रत्यक्ष पाहता यावी, यासाठी संबंधित यंत्रणांकडून आवश्यक माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पथकाकडून विविध ठिकाणी भेटी देऊन स्थानिक परिस्थितीची पाहणी तसेच संबंधित अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांकडून परिस्थितीची माहिती जाणून घेतली जाणार आहे. टंचाईग्रस्त गावांमध्ये पाणीपुरवठ्याचे नियोजन, टँकरद्वारे पाणीपुरवठा, उपलब्ध जलस्रोतांची स्थिती आदी बाबींचीही पाहणी होणार आहे. त्याचबरोबर पावसाअभावी शेतीपिकांवर झालेला परिणाम, पीक नुकसानीचे पंचनामे, चारा उपलब्धता आणि पशुधनासाठी आवश्यक उपाययोजना याबाबतची वस्तुस्थितीही पथकाच्या निदर्शनास आणून दिली जाणार आहे.

केंद्र शासनाचे पथक जिल्ह्यातील प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करून त्याचा सविस्तर अहवाल केंद्र शासनाला सादर करणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, त्याची तीव्रता आणि आवश्यक मदतीबाबतची वस्तुनिष्ठ माहिती केंद्र शासनापर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे.

'केंद्राचं पथक थेट बांधावर' कोणत्या जिल्ह्यांत कधी जाणार याबाबत

राज्यातील दुष्काळी पार्श्वभूमीवर केंद्रीय पथक उद्यापासून राज्याच्या दौऱ्यावर येत आहे. या दौऱ्यात हे पथक छत्रपती संभाजीनगर विभागातही पाहणी करणार आहे. हे पथक तीन दिवस राज्यात तीन वेगवेगळ्या गटांमध्ये पाहणी करणार आहे. दि. ८ ते ११ या कालावधीत ही पाहणी होईल.

– पथक क्र १– पश्चिम महाराष्ट्र: अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्याची पाहणी करणार.

– पथक २ – मराठवाडा: छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्याची पाहणी करणार.

– पथक ३ – विदर्भ: यवतमाळ, वाशिम आणि लगतच्या टंचाईग्रस्त भागाची पाहणी करणार.

पहिला दिवस, दि. ८ रोजी – सकाळी ७.३० वा. केंद्रीय पथकाचे सदस्य छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई येथे दाखल होतील. त्यानंतर सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत मंत्रालयात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक होईल. दुपारी २.३० नंतर सर्व पथके आपापल्या विभागाकडे रवाना होतील. उद्या संध्या. ७.३० वाजता नवी मुंबईहून विमानाने छत्रपती संभाजीनगरला प्रस्थान. रात्री ९ वाजता विश्रामगृहात आगमन आणि विभागीय आयुक्तांशी चर्चा.

दि.९ रोजी सकाळी ९ ते १२.४५ पर्यंत छत्रपती संभाजीनगर–शेंद्रा जालना– नानेगाव, किनगाव वाडी, जाम खेड ता. बदनापूर, अंबड) येथील कमी पावसाच्या तालुक्यांमध्ये प्रत्यक्ष शेतात पाहणी.

दुपारी २ ते ५ पर्यंत बीड जिल्ह्यातील गेवराई (अर्धमसला, पारगाव जप्ती) येथे पाहणी. बीड येथे मुक्काम .

दि.१० रोजी सकाळी ९ ते १२ पर्यंत बीड जिल्ह्यातील मंजरसुंभा, खंडाळा, वैद्य किन्ही, सोनेगाव, पाटोदा तालुक्यातील टंचाईग्रस्त भागाची पाहणी. दुपारी १२ ते १ बीड जिल्हाधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक. संध्याकाळी छत्रपती संभाजीनगर मार्गे नवी मुंबईला प्रयाण.

या पाहणीनंतर केंद्रीय पथक आपला अहवाल केंद्र सरकारला सादर करणार असून त्यानंतरच महाराष्ट्रासाठी छ्ळ्छ्रःच्या मदतीबाबत निर्णय होणार आहे.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### विकास चव्हाण यांचा कृषी क्षेत्रातील कार्यासाठी गौरव




**आळेफाटा (समर्थ गांवकरी)**

कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, कमी खर्चात अधिक उत्पादन, ऊस पाचट व्यवस्थापन, सुपर केन नर्सरी तंत्रज्ञान तसेच शाश्वत ऊस शेतीच्या प्रसारासाठी केलेल्या कार्याची दखल घेत स्मार्ट व्हिलेज पारगावचे सुपुत्र व श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे तज्ञ संचालक विकास हरिभाऊ चव्हाण यांचा जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीतर्फे सन्मान करण्यात आला. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या २४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेनिमित्त आयोजित कार्यक्रमात आमदार शरददादा सोनवणे यांच्या हस्ते चव्हाण यांना सन्म ानचिन्ह प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाजार समितीचे सभापती अॅड. संजय शिवाजीराव काळे होते. चव्हाण हे ऊस शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतकऱ्यांसाठी कमी खर्चातील उत्पादन पद्धतींच्या प्रसारासाठी कार्यरत आहेत. ऊस पाचट व्यवस्थापन, सुपर केन नर्सरी तंत्रज्ञान, उत्पादन खर्चात बचत आणि शाश्वत ऊस शेती याबाबत त्यांनी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती व मार्गदर्शन केले आहे. या वेळी माजी आमदार अतुल बेनके, बाजार समितीचे उपसभापती एन. एम. काळे, माजी उपसभापती प्रकाश शेठ ताजणे, श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक घोलप, कृषिरत्न अनिल तात्या मेहर, पंचायत समिती सदस्य संभाजीदादा चव्हाण, बळीराम चव्हाण तसेच जुन्नर–आंबेगाव ऊस उत्पादक संघाचे सदस्य उपस्थित होते. शेतीतील प्रयोगशीलता, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार आणि शेतकरी हितासाठीच्या त्यांच्या सातत्यपूर्ण योगदानाची विविध स्तरांतून दखल घेतली जात असून, चव्हाण यांच्या कार्याचे सर्वच स्तरांतून कौतुक होत आहे.

### वीरगाव शाळेत वन्यजीव सप्ताहानिमित्त पर्यावरण जनजागृती व पक्षी निरीक्षण उपक्रम!



**अकोले (समर्थ गांवकरी)**

वन विभागाच्या वन्यजीव सप्ताहांतर्गत वीरगाव (ता. अकोले) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पर्यावरण जनजागृती, पक्षी निरीक्षण आणि चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना निसर्ग, वन्यजीव आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून देण्यात आले. चित्रकला स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व शालेय साहित्य देऊन गौरविण्यात आले. पक्षीमित्र ओंकार अस्वले यांनी कळसूबाई–हरिश्चंद्रगड अभयारण्यात आढळणाऱ्या विविध पक्ष्यांची माहिती दिली, तर पर्यावरणप्रेमी राहुल राऊत यांनी पर्यावरण संवर्धनाविषयी मार्गदर्शन केले. वन विभागाच्या वतीने बिबट्यापासून बचाव करण्यासंदर्भातील चित्रफीत दाखवून विद्यार्थ्यांना सुरक्षिततेच्या उपाययोजनांची माहिती देण्यात आली. या वेळी राजूर वन्यजीव विभागाचे वनपाल राधाकिसन घोडसरे, वनरक्षक अरुण देशमुख, एस. के. बडे, वनसेवक बी. एन. थोरात, नवनाथ काळे, श्याम पथवे, ग्रामसेविका वर्षा नेहे, विस्तार अधिकारी अनिल गायकवाड, केंद्रप्रमुख नितीन पवार, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अनिल डोळस, मुख्याध्यापिका, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. निसर्ग आणि वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी प्रत्येकाने सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी केले.

### बनावट नोंदणीप्रकरणी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून कठोर कारवाई

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

परदेशी वैद्यकीय पदवीधरांच्या (एफएमजी) नोंदणीमध्ये बनावट कागदपत्रांचा वापर तसेच महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या (एमएमसी) ऑनलाइन नोंदणी पोर्टलमध्ये छेडछाड झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी परिषदेने तातडीने दखल घेतली असून, महाराष्ट्र सायबरमार्फत सखोल तपास सुरू आहे. दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची भूमिका परिषदेने स्पष्ट केली आहे.

परिषदेच्या अंतर्गत तपासणी आणि नोंदणी अभिलेखांच्या छाननीदरम्यान ही अनियमितता उघडकीस आली. प्राथमिक चौकशीत २२ संशयित परदेशी वैद्यकीय पदवीधर आढळून आले. यानंतर ऑनलाइन नोंदणी प्रणालीची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात आल्या. तसेच संबंधित व्यक्तींना मूळ कागदपत्रांसह पडताळणीसाठी परिषदेसमोर उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले. या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी परिषदेने १४ ऑगस्ट २०२६ रोजी महाराष्ट्र सायबरकडे अधिकृत तक्रार दाखल केली. तपासादरम्यान महत्वाचे धागेदोरे हाती लागले असून, पुढील तपास सुरू आहे. या तपासात परिषद संबंधित यंत्रणेला पूर्ण सहकार्य करीत आहे.

# पेमराज सारडा महाविद्यालयात नवमतदार नोंदणी व जनजागृती विशेष अभियान संपन्न

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**




पेमराज सारडा महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत मतदार म्हणून नोंदणी करण्याबाबत माहिती जाणून घेतली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मान्यवरांचे स्वागत महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा.डॉ.माहेश्वरी गावित यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी लोकशाहीमध्ये प्रत्येक मताचे मूल्य अनन्यसाधारण असते. देशाच्या विकासात तरुणांचा सहभाग वाढविणे अत्यंत महत्त्वाचे आहे असे नमूद करून नवमतदार हेच देशाचे भविष्य असून त्यांच्या मनात मतदार नोंदणीविषयी आणि या प्रक्रियेविषयी जागृती झाली पाहिजे.असे विचार मांडले.

कार्यक्रमास अहिल्यानगरचे मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी व प्रांताधिकारी श्री सुधीर पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सुधीर पाटील यांनी नवमतदारांशी संवाद साधत मतदार नोंदणीची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे,तसेच मतदानाचा अधिकार व त्याचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.१८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक पात्र युवक–युवतीने मतदार यादीत आपले नाव नोंदवून लोकशाही बळकट करण्यासाठी आपले कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी अप्पर तहसीलदार श्री.स्वप्नील ढवळे, इडज पर्यवेक्षक श्री. प्रशांत शेलार यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांच्या मतदार नोंदणी संदर्भातील अडचणी व शंकांचे निरसन करण्यात आले. महाविद्यालय प्रशासनानेही पात्र विद्यार्थ्यांची जास्तीत जास्त नोंदणी व्हावी यासाठी आवश्यक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या कार्यक्रमासाठी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष अँड.अनंत फडणीस,मानद सचिव सुमतीलाल कोठारी, कार्याध्यक्ष व वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई,कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा.डॉ.माहेश्वरी गावित, उपप्राचार्य प्रा.मिलिंद देशपांडे,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. प्रकाश जाधव,विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ.किरणकुमार साळवे , प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

## मधमाशांच्या थव्याचा शेतात काम करणाऱ्या कुटुंबावर हल्ला; चौघे जखमी

**मंचर (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र वडगाव काशिंबेग येथील घोडेकर मळ्यात शेतात काम करणाऱ्या एकाच कुटुंबातील चौघांवर मधमाशांच्या थव्याने शुक्रवार दिनांक ९ रोजी अचानक हल्ला केला. या घटनेत वैभव शंकर घोडेकर, मंदा घोडेकर, सुशील घोडेकर आणि निलेश घोडेकर हे जखमी झाले. त्यांच्यावर मंचर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून, वैभव घोडेकर यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळाली.

घोडेकर मळ्यात कुटुंबातील सदस्य नेहमीप्रमाणे शेतीची कामे करीत होते. वैभव घोडेकर आणि त्यांच्या आई मंदा घोडेकर भेंडी काढत होते, तर सुशील व निलेश घोडेकर जनावरांच्या चाऱ्यासाठी मका काढत होते. याच वेळी अचानक मधमाशांच्या मोठ्या थव्याने त्यांच्यावर हल्ला केला. वैभव घोडेकर यांना सर्वाधिक चावे बसले. मंदा घोडेकर यांनी स्वेटरने डोके व शरीर झाकून घेतल्याने त्यांना तुलनेने कमी इजा झाली. सुशील आणि निलेश यांच्या हातांना व पाठीला चावे बसले.

दरम्यान, पाण्याचा झडप बंद करण्यासाठी गेलेल्या प्रकाश घोडेकर यांनी पाण्याखाली आश्रय घेतल्याने त्यांचा बचाव झाला. मधमाशांचा थवा निघून गेल्यानंतर जखमींना चारचाकी वाहनातून तातडीने मंचर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय पथकाकडून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## अहिल्यानगर जिल्हा बँक निवडणूक ; एवढ्या जणांची माघार

**शेतीपूरक मतदारसंघातून त्रिंबक सरोदे यांचा उमेदवारी अर्ज मागे; अनेक मतदारसंघांत उमेदवार रिंगणात**

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याची घोषणा करण्यात आल्यानंतरही मोठ्या संख्येने उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. अर्ज छाननीनंतर वैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध झाली असून, माघारीच्या पहिल्या दोन दिवसांत अवघ्या एका उमेदवाराने आपला अर्ज मागे घेतला आहे. त्यामुळे निवडणूक बिनविरोध करण्याच्या प्रयत्नांदरम्यान अनेक मतदारसंघांत उमेदवार अद्याप निवडणूक रिंगणात कायम आहेत.

बँकेच्या निवडणुकीत माघारीच्या दोन दिवसांत शेतीपूरक मतदारसंघातून त्रिंबक सरोदे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. याशिवाय अन्य कोणत्याही उमेदवाराने अर्ज मागे घेतलेला नसल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली.




बिनविरोध निवडणुकीसाठी प्रयत्न सुरू असताना सुरुवातीच्या दोन दिवसांत केवळ एकच माघार झाल्याने उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम मुदतीपर्यंत कोणते उमेदवार माघार घेतात, याकडे राजकीय व सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. अनेक मतदारसंघांत उमेदवारांची संख्या कायम असल्याने निवडणुकीचे पुढील चित्र माघारीच्या अंतिम टप्प्यात स्पष्ट होणार आहे.

## अहिल्यानगरमध्ये बाराबलुतेदार महासंघातर्फे शिवाजी महाले यांची जयंती साजरी



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

छत्रपती शिवाजी महाराजांचे शूर शिलेदार मावळे शिवरत्न जिवाजी महाले यांची ३९१ वी जयंती अहिल्यानगर येथील बारा बलदार महासंघातर्फे साजरी करण्यात आली. शिवरत्न जिवाजी महाले यांच्या प्रतिमेस महासंघाचे जिल्हाध्यक्ष माऊली गायकवाड यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी कार्याध्यक्ष अनिल इंगळे सहसचिव चंद्रकांत पुंड जिल्हा संघटक सुधीर पुंड जिल्हा सरचिटणीस राजहंस देसाई शहर कार्याध्यक्ष भानुदास बनकर, नवनाथ खेडकर, मुकुंद शिंदे, गणेश पांड्याल, बापूसाहेब फुंदे, आबासाहेब कदम, संतोष भालेराव, सागर नांदुरकर, आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माऊली गायकवाड यांनी शिवरत्न जिवाजी महाले यांच्या बाबत इतिहास थोडक्यात सांगितला. होते जिवाजी म्हणून वाचले शिवाजी ही म्हण कशी प्रचलित झाली तर छत्रपती शिवाजी महाराजांचे शूर शिलेदार मावळे म्हणून जिवाजी महाले यांची ओळख होती. प्रतापगडाच्या युद्धा दरम्यान अफजलखानाचा वध केल्यानंतर त्याचा सरदार सय्यद बंडा याने शिवाजी महाराजांवर वार केला, तेव्हा जिवाजी महाले यांनी अत्यंत चतुराईने प्रसंगावधान राखून तो वार आपल्या अंगावर झेलत त्याचाही पराभव केला. यावेळी महाराजांचे प्राण वाचले व तेव्हापासून होते जिवाजी म्हणून वाचले शिवाजी ही म्हण प्रचलित झाली. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

# नवीन वीज जोडणी व भारवाढ होण्याकरीता उद्योजकांचा महावितरण कार्यालयावर मोर्चा, डिसेंबर पर्यंत होणार काम

**एमआयडीसीतील उद्योगांना अखंडित वीजपुरवठा देण्याची मागणी; अतिभाराने वारंवार वीजखंडित होत असल्याने आर्थिक नुकसानीचा फटका**

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर एमआयडीसी परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने औद्योगिक उत्पादनावर परिणाम होत असून उद्योजकांना आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. या समस्येकडे महावितरण प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी असोसिएशन ऑफ अहमदनगर मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीजच्या ( आमी) वतीने महावितरणच्या अहिल्यानगर येथील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता.

यावेळी आमीचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, उपाध्यक्ष राजेंद्र शुके,रोहन गांधी, सतिश गवळी, मिलिंद कुलकर्णी, राजेंद्र कटारिया, दिलीप अकोलकर, मिलिंद भद्रे,राजेंद्र कुलकर्णी ,

सुमित सोनवणे ,रोहन गांधी ,प्रवीण जुंदरे सतीश गवळी, अमोल घोलप ,नावंदर

आदींसह उघोजक यांनी महावितरणचे अधीक्षक अभियंता रमेश कुमार पवार यांना निवेदन दिले.

अहिल्यानगर एमआयडीसी परिसरात मागील सहा ते सात महिन्यापासून सातत्याने वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार घडत आहेत विशेषता डी एफ ए आणि एल ब्लॉक मध्ये दररोज वीजपुरवठा खंडित होत आहे यामुळे उद्योजकांना मोठी आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे तसेच एमआयडीसीतील इतर ब्लॉक मध्ये वीजपुरवठाच्या लपंडाव सुरू आहे.

जयद्रथ खाकाळ म्हणाले,

वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे उत्पादन प्रक्रियेत अडथळा निर्माण होत आहे मशीनरी बंद पडणे कच्च्या मालाची नुकसान होणे उत्पादन क्षमतेवर परिणाम होणे वेळेत ऑर्डर पूर्ण करण्यात अडचणी येत आहेत. याचा थेट परिणाम उद्योजकांच्या उत्पादन खर्चावर व आर्थिक व्यवहारावर होत आहे ही परिस्थिती अशीच राहिल्यास अनेक कारखाने बंद ठेवण्याची वेळ येऊ शकते.

अहिल्यानगर मध्ये उद्योगाची वाढती संख्या आणि विजेची वाढती मागणी लक्षात घेता परिसरात नवीन वीज उपकेंद्र उभारणे किंवा विद्यमान उपकेंद्र ची क्षमता व लोड वाढविणे अत्यंत आवश्यक आहे या संदर्भात आमी संघटनेच्या वतीने यापूर्वी पाठपुरावा केला आहे डिसेंबर पर्यंत हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन मिळाले आहे.

राजेंद्र शुक्रे म्हणाले उद्योगांना अखंडित वीज पुरवठा पूर्ण करून देणे ही औद्योगिक विकास साठी अत्यंत महत्त्वाचे बाब आहे वारंवार वीज पुरवठा खंडित होणे हे औद्योगिक उत्पादन, रोजगार आणि संपूर्ण औद्योगिक क्षेत्राच्या




विकासावर प्रतिकूल परिणाम होणार आहेत.

जवळपास तीस ते चाळीस हजार कामगार एमआयडीसीत कामाला आहेत त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे. आम्हाला मिळालेली कामे वेळेत पूर्ण होत नाहीत सातत्याने समस्या सामोरे जावे लागते उद्योग वाढवण्यापेक्षा समस्या लढणे हाच मोठा उद्योग होऊन बसलाय नगरपेक्षा इतर शहरं पुढे गेले आहेत नवीन उद्योग वाढले नाहीत उलट नगर शहराच्या बाहेर उद्योग गेले. नगरमध्ये जे ३० हजार कामगार आहेत ते कमीत कमी लाखभर कामगार असते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

# दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी जिल्हा प्रशासनाचे नियोजन

## पिण्याचे पाणी, पीक नुकसान आणि चारा व्यवस्थापनावर भर



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती, शेतीपिकांचे नुकसान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जनावरांसाठी चारा व्यवस्थापन आणि आगामी काळातील संभाव्य टंचाईचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने नियोजन केले आहे. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देत टँकरद्वारे पाणीपुरवठा, पीक नुकसानीचे सर्वेक्षण, पीक विम्याशी संबंधित कार्यवाही आणि चारा उपलब्धतेचा आढावा घेण्यात येत आहे. या उपाययोजनांची माहिती प्रभारी जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांनी केंद्रीय पथकासमोर सविस्तर सादरीकरणाद्वारे दिली.

खरीप हंगाम २०२६ मधील दुष्काळी परिस्थिती आणि पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्र शासनाचे आंतरमंत्रालयीन पथक शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले. पथकप्रमुख के. पोन्नुसामी (संचालक, केंद्रीय पीक विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात आढावा बैठक झाली. पथकात अबसर अहमद खान (केंद्रीय पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग) आणि सुमीत शर्मा (सहायक संचालक, केंद्रीय अन्न विभाग) यांचा समावेश होता.

**जिल्ह्यात सरासरीच्या ६६ टक्के पाऊस**

प्रभारी जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांनी जिल्ह्यातील पावसाची सद्यस्थिती, हवामानातील बदल, अल निनोचा संभाव्य परिणाम आणि शेतीपिकांच्या नुकसानीची तांत्रिक माहिती सादर केली. जिल्ह्यात आतापर्यंत २९९ मिलिमीटर म्हणजेच सरासरीच्या ६६ टक्के पावसाची नोंद झाली आहे. पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने विशेषतः धरणांच्या लाभक्षेत्रात अपेक्षित पाऊस न झाल्याचा परिणाम शेती आणि पाणी उपलब्धतेवर झाला आहे.

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात टंचाई आढावा बैठका घेतल्या असून, शेतांमध्ये प्रत्यक्ष भेट देऊन पीक नुकसानीची पाहणी

**केंद्रीय पथकासमोर अहिल्यानगर जिल्ह्यातील पावसाची स्थिती, शेतीचे नुकसान आणि टंचाई निवारणाच्या उपाययोजनांचे सविस्तर सादरीकरण**

केली असल्याची माहितीही श्री. हिंगे यांनी दिली. दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी तसेच शेतीवर अवलंबून असलेल्या शेतमजुरांसमोर निर्माण झालेल्या अडचणींचाही आढावा सादरीकरणात घेण्यात आला.

जिल्ह्यातील भंडारदरा धरण १०० टक्के, मुळा धरण ७४ टक्के आणि निळवंडे धरण ८० टक्के भरले आहे. मात्र, धरणांमध्ये पाणीसाठा उपलब्ध असला तरी लाभक्षेत्रात पावसाचे प्रमाण कमी असल्याने पाण्याचे काटेकोर नियोजन करण्याची आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत ठेवण्यास प्रशासनाने प्राधान्य दिले आहे.

**१५८ गावांना १६४ टँकरद्वारे पाणीपुरवठा**

जिल्ह्यातील ग्रामीण भागातील पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेऊन सध्या १५८ गावांना १६४ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. टँकरद्वारे सुरू असलेला पाणीपुरवठा, मागील वर्षाच्या तुलनेतील पाण्याची स्थिती आणि आगामी काळात टँकरची आवश्यकता भासू शकणाऱ्या गावांचा आढावा केंद्रीय पथकाला सादर करण्यात आला. पाणीटंचाई निर्माण होणाऱ्या गावांमध्ये आवश्यकतेनुसार उपाययोजना करता याव्यात, यासाठी प्रस्तावित टँकरची गरज आणि उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन यांची माहितीही बैठकीत देण्यात आली. टंचाईच्या काळात नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांमध्ये समन्वय ठेवून कार्यवाही करण्यात येत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

**पीक नुकसानीची वस्तुनिष्ठ माहिती सादर**

कृषी विभागाच्या वतीने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी तालुकानिहाय पावसाची स्थिती, खरीप पिकांचे नुकसान आणि पीक पाहणी अहवाल यांची माहिती सादर केली. बहूवार्षिक फळपीकांचे होत असलेले अतोनात नुकसान, पीक विमा आणि नुकसानीशी संबंधित बाबींचाही आढावा घेण्यात आला. येत्या रब्बी हंगामात पिक निहाय पेरणीच्या क्षेत्रात येणारी घट देखील केंद्रीय पथकाचे निर्दशनास आणून देण्यात आली. जिल्ह्यात सूरू असलेल्या पिकांचे पंचनामा बाबतचा आढावा बैठकीत घेण्यात आला. प्रत्यक्ष परिस्थितीच्या आधारे नुकसानीचे स्वरूप समजून घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याच्या दृष्टीने ही माहिती महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**जनावरांच्या चाऱ्यासाठीही नियोजन**

पशुसंवर्धन विभागाच्या वतीने उपायुक्त श्री. पाटील यांनी जिल्ह्यातील जनावरांच्या चाऱ्याची सद्यस्थिती आणि आगामी काळात उद्भवू शकणाऱ्या गरजांची माहिती दिली. पावसातील तूट कायम राहिल्यास चाऱ्याच्या उपलब्धतेवर होणारे संभाव्य परिणाम लक्षात घेऊन परिस्थितीवर लक्ष ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. पिण्याचे पाणी, शेती आणि पशुधनाच्या गरजा यांचा समन्वित विचार करून टंचाई व्यवस्थापनाचे नियोजन करण्यावर भर देण्यात आला.

**कायमस्वरूपी उपाययोजनांवर भर देण्याची सूचना**

केंद्रीय पथकाने जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेत प्रशासनाकडून टंचाई निवारणासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना आणि आगामी काळातील नियोजनाची माहिती जाणून घेतली. भविष्यात अशा परिस्थितीचा सामना करण्यासाठी तातडीच्या उपाययोजनांसोबतच कायमस्वरूपी उपाययोजनांवर भर देण्याची सूचनाही पथकाने केली.

बैठकीत कृषी आयुक्त सूरज मांढरे, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, विभागीय कृषी सहसंचालक, पुणे श्री. काटकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता श्री. शेटे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधीक्षक अभियंता श्रीमती नरवडे, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त श्री. पाटील, जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. आराळकर, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे, उपजिल्हाधिकारी रोहयो श्रीमती पवार, मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील, कुकडी पाटबंधारे विभाग क्रमांक २ चे कार्यकारी अभियंता श्री. घोरपडे, श्री. बेडवाल आणि भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे वरिष्ठ भूवैज्ञानिक उपस्थित होते.

# पवित्र पोर्टलद्वारे जिल्हा परिषदेत दुसऱ्या टप्प्यात ५३ शिक्षकांची भरती प्रक्रिया पूर्ण

## मराठी व उर्दू माध्यमातील पात्र शिक्षकांना तालुकानिहाय समुपदेशनातून पदस्थापना

**ठाणे (समर्थ गांवकरी)**

पवित्र पोर्टलमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षक भरती प्रक्रियेअंतर्गत शिफारस झालेल्या उमेदवारांचे समुपदेशन व पदस्थापना प्रक्रिया आज बी. जे. हायस्कूल येथे पार पडली. मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पारदर्शक पद्धतीने राबविण्यात आलेल्या या प्रक्रियेद्वारे मराठी व उर्दू माध्यमातील एकूण ५३ पात्र उमेदवारांना उपलब्ध रिक्त पदांनुसार पदस्थापना देण्यात आली.

पवित्र पोर्टलवरील जाहिरातीत मराठी माध्यमासाठी ४९९, तर उर्दू माध्यमासाठी २७ पदे प्रसिद्ध करण्यात आली होती. दुसऱ्या टप्प्यात मराठी माध्यमासाठी इयत्ता पहिली ते पाचवी सर्व विषयांच्या २ शिफारसींपैकी २ उमेदवार पात्र ठरले. इयत्ता सहावी ते आठवी विज्ञान-गणित विषयाच्या ४६ शिफारसींपैकी ३७, तर भाषा विषयाच्या १३ शिफारसींपैकी ११ उमेदवार पात्र ठरले. अशा प्रकारे या टप्प्यात मराठी माध्यमासाठी एकूण ८१ शिफारसींपैकी ५० उमेदवार पात्र ठरले.

उर्दू माध्यमात इयत्ता सहावी ते आठवी विज्ञान-गणित आणि समाजशास्त्र विषयांसाठी प्रत्येकी एक शिफारस करण्यात आली होती. त्यापैकी एक उमेदवार पात्र ठरला. याशिवाय पहिल्या टप्प्यात कागदपत्रांमधील त्रुटींमुळे अपात्र ठरलेल्या ११ उमेदवारांपैकी २ उमेदवारांनी आक्षेपांची पूर्तता केल्याने त्यांना पात्र घोषित करण्यात आले. अशा प्रकारे एकूण ५३ पात्र उमेदवारांची समुपदेशन प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

पदस्थापनेनुसार मराठी माध्यमातील शिक्षकांना अंबरनाथ तालुक्यात ७, भिवंडी येथे १४, कल्याण येथे ६, शहापूर येथे २ आणि मुरबाड येथे २३ पदस्थापना देण्यात आल्या. यापैकी २ शिक्षकांना पेसा क्षेत्रात, तर ५० शिक्षकांना नॉन-पेसा क्षेत्रात पदस्थापना देण्यात आली. उर्दू माध्यमातील एका शिक्षकाला भिवंडी तालुक्यातील नॉन-पेसा क्षेत्रात पदस्थापना देण्यात आली.

या प्रक्रियेदरम्यान उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) शुभांगी बडे, सर्व तालुक्यांचे



गटशिक्षणाधिकारी, सहाय्यक प्रशासन अधिकारी (शिक्षण) योगिता धीवर तसेच शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या पद भरतीमुळे शाळांना पुरेशा प्रमाणात शिक्षक उपलब्ध होत असून शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यास मदत होत आहे. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून भरती प्रक्रियेत पारदर्शकता राखून पात्र उमेदवारांना समुपदेशनाद्वारे पदस्थापना देण्यात आली. या प्रक्रियेमुळे उमेदवारांना उपलब्ध रिक्त पदांनुसार तालुकानिहाय नियुक्तीची संधी मिळाली. समुपदेशन प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडल्याने उपस्थित उमेदवारांनी समाधान व्यक्त केले.

# दुष्काळातही मोहटादेवी गडावर हिरवाईची चादर; नवरात्रोत्सवासाठी जय्यत तयारी

**पाथर्डी (समर्थ गांवकरी)**

यावर्षी तालुक्यात पावसाने दडी मारली असल्याने सर्वत्र दुष्काळाचे गंभीर सावट पसरले आहे. मात्र, अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही तालुक्यातील प्रसिद्ध मोहटादेवी गड परिसराने निसर्गरम्य हिरवा शालू पांघरला असून, गडावर अत्यंत प्रसन्न वातावरण निर्माण झाले आहे. देवस्थान विश्वस्त मंडळाच्या दूरदृष्टीमुळे आणि नियोजनबद्ध प्रयत्नांमुळेच हे शक्य झाले आहे. मागील काही वर्षांपूर्वी देवस्थान समितीच्या वतीने मोहटादेवी गडावर मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले होते. लावलेली ही झाडे केवळ लावून सोडून न देता ती टँकरच्या पाण्याने तसेच ठिबक सिंचनच्या (ड्रिप) सहाय्याने अत्यंत जतन करून जगवण्यात आली आहेत. त्यामुळेच आज संपूर्ण गड परिसर हिरवाईने नटलेला पाहायला मिळत आहे. येत्या रविवारी दि. ११ ऑक्टोबर २०२६ रोजी शारदीय नवरात्रोत्सवाला सुरुवात होत असून या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुढील पंधरा दिवस राज्यभरातून लाखो भाविक देवीच्या दर्शनासाठी गडावर हजेरी लावणार आहेत. गडावरील हे निसर्गरम्य आणि प्रसन्न वातावरण नवरात्रोत्सवासाठी येणाऱ्या भाविकांचे मन प्रफुल्लित करणारे ठरणार आहे.

या शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त मोहटादेवी देवस्थान समितीच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी जय्यत तयारी पूर्ण करण्यात आली आहे. गडावर येणाऱ्या लाखो भाविकांना सुलभ आणि सुरक्षित दर्शन घेता यावे, यासाठी विविध सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यामध्ये पिण्याचे पाणी, दर्शन रांगा, चोख सुरक्षा व्यवस्था आणि अखंड स्वच्छता यांवर देवस्थान समितीने



विशेष भर दिला असून उत्सव शांततेत आणि उत्साहात पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. या संपूर्ण तयारीचा आढावा घेण्यासाठी देवस्थान समितीचे अध्यक्ष तथा अहिल्यानगरचे धर्मदाय उपायुक्त नवनाथ जगताप व विश्वस्त मंडळ यांनी दोन दिवसांपूर्वीच गड परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. याप्रसंगी सर्व विभागांची विशेष बैठक घेऊन नवरात्रोत्सवाच्या पूर्वतयारीचा सविस्तर आढावा घेतला, तसेच गडावर येणाऱ्या भाविकांना दर्शनासाठी कोणताही त्रास होणार नाही याची काटेकोर काळजी घेण्याच्या महत्वपूर्ण सूचना त्यांनी सर्व संबंधित विभागांना दिल्या आहेत.

# गोरेगाव गावठाण ते पाटील वस्ती रस्ता पूर्ण करा

**गोरेगाव (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील गोरेगाव येथील एसटी स्टँड ते पाटील मळा वस्ती रस्त्यावर खड्डे पडल्यामुळे या रस्त्याची दुरावस्था झालेली आहे. हा रस्ता पूर्ण करण्याची मागणी शिवबा संघटनेच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता वसईकर साहेब यांना निवेदनाद्वारे करण्यात आलेली आहे.

या निवेदनात म्हटले की, भाळवणी ते कान्हुर पठार हा मुख्य रस्ता असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत गेली चार वर्षांपासून या रस्त्याचे काम चालू आहे मात्र गोरेगाव येथील एसटी स्टँड ते पाटील मळा वस्ती या ठिकाणी मुख्य रस्त्यावर खडीकरण करून काम बंद झाले आहे यामुळे या रस्त्यावर खड्डे पडले आहेत.

हा रस्ता परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असून या रस्त्यावर दररोज मोठ्या प्रमाणात नागरिकांची, शेतकरी, व्यापारी , विद्यार्थी यांची ये - जा असते. रस्त्याचे काम अपूर्ण असल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

रस्त्यावर मोठमोठे खड्डे निर्माण होऊन अपघात होऊन अनेक नागरिकांना अपंगत्व आलेले आहे. तरी सदर रस्त्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावून त्वरित काम सुरू करून रस्त्याचे काम दर्जेदार पद्धतीने करण्यात यावे अशी विनंती शिवबा संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

या निवेदनाला उत्तर देताना सार्वजनिक



बांधकाम विभागाचे उपअभियंता वसईकर साहेब म्हणाले की येत्या एक ते दीड महिन्यामध्ये या रस्त्याचे काम पूर्ण करण्याचे करू असे आश्वासन त्यांनी शिवबा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना दिले आहे.

# शेतकऱ्यांचा संताप महावितरणच्या दारात! वीज समस्यांचा पाढा वाचताच अधिकारी अवाक्; पालकमंत्री विखे पाटील यांच्या सूचनेने तक्रार निवारण कॅम्प

**अकोले (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील वीज ग्राहक व शेतकऱ्यांच्या विविध वीज समस्यांचे तातडीने निराकरण व्हावे, यासाठी पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सूचनेनुसार अकोले येथील महावितरण कार्यालयात वीज तक्रार निवारण बैठक घेण्यात आली. कार्यकारी अधीक्षक अभियंता श्री. रमेश पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीस आजी-माजी आमदारांसह विविध गावांतील शेतकरी, वीज ग्राहक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीत नागरिकांनी वीज वितरणाच्या कारभारासंदर्भात अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले. वाढीव वीजबिले, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, अपुऱ्या दाबाने होणारा वीजपुरवठा, वेळेवर वीजबिले न मिळणे, त्यामुळे ग्राहकांना होणारा नाहक भुर्दंड, तसेच अधिकारी व अभियंते कार्यालयात व संबंधित गावांमध्ये उपलब्ध नसल्याच्या तक्रारी नागरिकांनी मांडल्या.

पिंपळगाव खांड धरणातून पिण्याच्या पाण्यासाठी पाणी उचलण्यासही वीज मिळत नसल्याचा गंभीर प्रश्न यावेळी उपस्थित करण्यात आला. गेल्या चार दिवसांपासून केवळ दोन तास वीज मिळत असल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे या समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी करण्यात आली.

तालुक्यातील देवठाण सबस्टेशनचे काम लवकर पूर्ण करून ते कार्यान्वित करावे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. तसेच अकोले शहरातील रस्त्याच्या कडेला असलेले विजेचे पोल नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने शिफ्ट करावेत, अशी मागणी करण्यात आली.

महावितरणचे अधिकारी व अभियंते कामानिमित्त बाहेर गेले असल्याचे सांगितले जाते; मात्र त्याची कार्यालयातील नोंदवहीत नोंद आढळत नसल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. ज्या अधिकाऱ्यांकडे संबंधित गावांची जबाबदारी आहे, ते त्या गावांमध्ये प्रत्यक्ष पाहणीसाठी किंवा ग्राहकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी दिसत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली.

कळस बुद्रुक येथील दलित वस्तीतील स्ट्रीट लाईटच्या पोलवर विनापरवाना सिंगल फेजच्या पाच तारा टाकण्यात आल्याचा मुद्दाही ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे मांडला. या प्रकाराची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

बैठकीत नागरिकांनी विविध समस्यांचा अक्षरशः पाढाच वाचल्याने महावितरणचे कार्यकारी अधीक्षक अभियंता श्री. पवार यांच्यासमोर प्रश्नांचा भडिमार झाला. नागरिक व शेतकऱ्यांनी विचारलेल्या गंभीर प्रश्नांची दखल घेत श्री. पवार यांनी प्रत्येक प्रश्नाला समाधानकारक उत्तरे देण्याचा प्रयत्न केला तसेच संबंधित समस्या सोडविण्याबाबत कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

दरम्यान, पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सूचनेनुसार वीज तक्रार निवारणासाठी हा कॅम्प आयोजित केल्याबद्दल भाऊसाहेब वाकचौरे व दिलीप कोटकर यांनी पालकमंत्री विखे पाटील यांचे अभिनंदन केले. अधिकारी कार्यालयात नियमित उपस्थित राहत नसल्याचा गंभीर आरोप निखिल जगताप यांनी यावेळी केला.

या बैठकीस माजी आमदार वैभवराव

**■ अकोले महावितरण कार्यालयात वीज समस्यांचा पाढा**
**■ पाणीपुरवठ्याला वीज मिळत नसल्याने नागरिक संतप्त; वाढीव वीजबिले, कमी दाब, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा यांसह विविध प्रश्नांवर अधिकाऱ्यांना जाब**



पिचड, आमदार डॉ. किरण लहामटे, कार्यकारी अभियंता रमेश पवार,

संगमनेर कार्यकारी अभियंता श्री. सोनवणे,उप कार्यकारी अभियंता,नामदेव शेळके, राजूर उप कार्यकारी अभियंता श्री सोनवणे,अकोले सहाय्यक अभियंता विवेक शिंदे, अकोले शहराचे सहाय्यक अभियंता योगेश गुडगे,भूषण गोगे, भारती मॅडम

सीताराम भांगरे, सुरेश नवले, भाऊसाहेब वाकचौरे,बाळासाहेब सावंत, दिनेश शहा, शिवाजी पाटोळे, केशव बोडके, नामदेव निसळ, अतुल लोटे, रवी देशमुख, संतोष नवले, विनय वाकचौरे, निखिल जगताप, भाऊ मामा खरात, चक्रधर सदगीर, राहुल देशमुख, अशोक आवारी, सोपान देशमुख, बाळासाहेब भोर, गणेश पापळ, रेश्मा गोडसे, अमोल गोडसे आदींसह आदिवासी भागातील शेतकरी व वीज ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वीज समस्यांवर केवळ बैठका न घेता प्रत्यक्षात तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा उपस्थित शेतकरी व वीज ग्राहकांनी व्यक्त केली. यावेळी तालुक्यातील शेतकऱ्यांनी वीजपुरवठा, विद्युत वाहिन्या, ट्रान्सफॉर्मर तसेच विजेसंदर्भातील विविध अडचणी व प्रलंबित प्रश्न मांडले.

शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेत अधीक्षक अभियंता श्री. रमेश पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देत प्रश्न तात्काळ मार्गी लावण्याचे निर्देश दिले.व देवठाण चे सबस्टेशन एक वर्षाच्या आत पूर्ण करून देणार असल्याचे सांगितले.